मूळ संस्कृत श्लोकांसह

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ऋग्वेद

चतुर्थ मंडलम्

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥

चतुर्थ मंडलम्

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – श्री. श्रीपाद काळे

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥

चतुर्थ मंडलम्

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ७ जून २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

पहिल्या मंडलाचे मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व "शांखायन" अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला "शाकल संहिता" असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी

भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

मनोगत

रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र पाडव्यापासून ऋग्वेदातील पहिला भाग ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केला. त्यानंतर गेल्या वर्ष अखेरी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १९१ सूक्ते आणि त्यातील २००६ ऋचाचा अनुवाद ई साहित्य प्रतिष्ठान यांनी ९ भागात प्रकाशित केला. पहिल्या भागातील सर्व १९१ सूक्त एकत्र घेऊन संपूर्ण पहिले मंडल सुद्धा ई साहित्य प्रतिष्ठानी प्रकाशित केले.

पहिले मंडल प्रकाशित करताना अनेक वाचकांनी अमूल्य अभिप्राय कळवला. त्यामुळे पुढील मंडल अनुवादित करण्यास ऊर्जा मिळत आहे

जानेवारी २०२६ पासून दुसऱ्या व तिसऱ्या मंड्लाचे काम पूर्ण केले. ही सर्व सूक्त एकच भागात प्रकाशित करत आहोत.

मे महिन्या पासून चवथे मंडल दोन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील हा पहिला भाग आहे.

श्रीपाद काळे

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे

संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

ऋग्वेदा बद्दल काही उपयुक्त माहिती

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरु परंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. त्यामध्ये "आश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व शांखायन सारख्या ऋषींनी श्लोकांची मांडणी केली परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे आपण ज्या ऋग्वेद पठण करतो ते शाकल ऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहेत शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला शाकल संहिता असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडळ असे म्हणतात. शाकल ऋषींनी श्लोकाची विभागणी केली त्याला मंडळ म्हणतात. मंडळातील प्रत्येक मंडळामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले . प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात . सर्व ऋचा या पद्य स्वरूपाच्या आहेत. शक्कल ऋषींनी तयार केलेल्या ऋग्वेदात १० मंडले, १०२८ सूक्ते, १०५५२ ऋचा आहेत.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३११

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२, फोन नं. : २५४१५५४/२५४०३५२.

E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

विश्वावसु नाम संवत्सर शके १९४७ आषाढ शु. १२ सोमवार दि. ७/७/२०२५

श्री. डॉ. विंझे हेमंत लक्ष्मण
मुंबई.
मो. ७६७८०९१६२९

पीठस्थ देवतेचे उत्तम आशिर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात तेही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय स्फुरणही आहे.

खरे तर आपण ऑर्थोपेडिक सर्जन. अनेकांची ऑपरेशन करत आपण त्या त्या लोकांनी आरोग्य प्राप्ती करून दिली. व त्या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृध्दांचे आशीर्वादही घेतले. परिणाम असा झाला की व्यावहारिक निवृत्तीनंतरही आपण आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धं सत्कर्मी म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लागला. खरं तर ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व संतांच्या भाषेतील आत्यंतिक सुख आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुध्दा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुळकर्णी यांनी यशस्वी केला. व ऋग् यजु: साम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या प्रेस आले. आमची रोज ६ तास बसून (वय ८८ वर्षे) ते अर्थर्वाचे भाषांतर करत होते असो. कदाचित ती कांही गरजेचे असेल पण आपलीही काही कमी नाही.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच पीठस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा पीठस्थ देवतेचे अनेक आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण सर्वांस विदीत व्हावे.

महानुशासनम् वर्तीर्ते
श्री. जगद्गुरु शंकराचार्य.
करवीर पीठ.
कोल्हापूर.

ऋग्वेद संहिता

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१

ऋषि- वामदेव गौतम

देवता – अग्नि, २-५ अग्नि अथवा अग्नीवरुण **छन्द** - त्रिष्टुप्, १ अष्टि , २ अति जगती, ३ धृति

त्वां ह्यग्ने सदमित्समन्यवो देवासो देवमरतिं न्येरिर इति क्रत्वा न्येरिरे । अमर्त्यं यजत मर्त्येष्वा देवमादेवं जनत प्रचेतसं विश्वमादेवं जनत प्रचेतसम्॥१॥

हे अग्निदेवा ! सर्व देवतांनी एकाच विचाराने आणि एकाच बुद्धीने आपली दूत म्हणून स्थापना केली आहे. यज्ञ करण्यास योग्य, अमर, परम ज्ञानाचे धनी हे अग्निदेवा ! देवतांनी आपल्याला विविध यज्ञांमध्ये उपस्थित राहण्यासाठी पृथ्वीवर प्रकट केले आहे. ॥१॥

स भ्रातरं वरुणमग्न आ ववृत्स्व देवाँ अच्छा सुमती यज्ञवनसं ज्येष्ठं यज्ञवनसम् । ऋतावानमादित्यं चर्षणीधृतं राजानं चर्षणीधृतम् ॥२॥

हे अग्निदेवा ! वरुणदेव आपले बंधु आहेत. यज्ञाचे प्रेमी, सत्याचे पालन करणाऱ्या आदित्यपुत्र असलेल्या, सर्व मानवांचे रक्षक आणि पालनकर्त्या, प्रकाशमान वरुणदेवांना आम्हा भक्तगणांकडे आपण घेऊन यावे ही विनंती. ॥२ ॥

सखे सखायमभ्या ववृत्स्वाशुं न चक्रं रथ्येव रंह्यास्मभ्यं दस्म रंह्या । अग्ने मृळीकं वरुणे सचा विदो मरुत्सु विश्वभानुषु । तो

काय तुजे शुशुचान शं कृध्यस्मभ्यं दस्म शं कृधि॥३॥
हे परममित्र अग्निदेवा ! ज्याप्रमाणे रथाचे चाक आपल्या लक्ष्याकडे वळते त्याप्रमाणे आपण आपल्या मित्र असलेल्या वरुणदेवांना, आम्हा भक्तगणांकडे वळवावे ही विनंती. हे अद्भुत कर्म करणाऱ्या अग्निदेवा ! वरुणदेव आणि सर्वव्यापी प्रकाशमान मरुद्गणांच्या सोबत राहून आम्हाला सुख मिळवून द्यावे तसेच आमच्या पुत्र-पौत्रांना आनंदित करून त्यांचे कल्याण करावे ही विनंती. ॥३ ॥

त्वं नो अग्ने वरुणस्य विद्वान्देवस्य हेळोऽव यासिसीष्ठाः ।
यजिष्ठो वह्नितमः शोशुचानो विश्वा द्वेषांसि प्र मुमुग्ध्यस्मत्॥४ ॥
हे सर्वज्ञ, विद्वान अग्निदेवा ! आपण वरुणदेवांचा क्रोध आम्हा भक्तगणांपासून दूर ठेवावा ही विनंती. आपण सर्वश्रेष्ठ यज्ञकर्ते, देवतांपर्यंत आहुती पोचवणारे आणि तेजस्वी आहात. आपण आमच्या शत्रूंना आमच्यापासून पूर्णपणे दूर करून आम्हाला मुक्त करावे ही विनंती ॥४॥.

स त्वं नो अग्नेऽवमो भवोती नेदिष्ठो अस्या उषसो व्युष्टौ ।
अव यक्ष्व नो वरुणं रराणो वीहि मृळीकं सुहवो न एधि॥५ ॥
हे अग्निदेवा ! उष:कालाच्या समाप्तीच्या वेळेला आपण आपल्या संरक्षणात्मक शक्तींनी आमच्या जवळ यावे ही विनंती. आम्हा भक्तगणांवर प्रसन्न होऊन वरुणदेवांच्या क्रोधाला शांत करावे, आमच्या हविष्यान्नाच्या आहुतींचा स्वीकार करून आम्हाला सुख प्रदान करावे आणि आमच्या हाकेला धावून यावे ही विनंती ॥५॥

अस्य श्रेष्ठा सुभगस्य संदृग्देवस्य चित्रतमा मर्त्येषु ।
शुचि घृतं न तप्तमघ्न्यायाः स्पार्हा देवस्य मंहनेव धेनोः॥६॥

या सौभाग्यशाली आणि दर्शनीय अग्निदेवांचे रूप आम्हा भक्तगणांमध्ये सर्वात श्रेष्ठ आणि अत्यंत अद्भुत आहे. मारण्यास योग्य नसलेल्या आणि पवित्र गायींचे दूध आणि शुद्ध तूप स्पृहणीय असते, त्याचप्रमाणे या अग्निदेवांचे तेज आणि त्यांची कृपा अत्यंत मोहक आणि वंदनीय आहे ॥६॥.

त्रिरस्य ता परमा सन्ति सत्या स्पार्हा देवस्य जनिमान्यग्नेः ।
अनन्ते अन्तः परिवीत आगाच्छुचिः शुक्रो अर्यो रोरुचानः॥७॥
अग्निदेवांची तीन प्रकारची उत्पत्ती स्थाने (पार्थिव, अंतरिक्ष आणि दिव्य) अत्यंत श्रेष्ठ सत्य आणि सर्वांना प्रिय वाटणारी आहेत. सर्वत्र व्यापलेले, अत्यंत शुद्ध, तेजस्वी, पूजनीय आणि दैदिप्यमान अग्निदेव आमच्या यज्ञस्थळी येवोत ही विनंती ॥७॥

स दूतो विश्वेदभि वष्टि सद्मा होता हिरण्यरथो रंसुजिह्वः ।
रोहिदश्वो वपुष्यो विभावा सदा रण्वः पितुमतीव संसत्॥८॥
देवतांचे दूत, सोन्याच्या रथावर आरूढ होणारे, अत्यंत तेजस्वी ज्वाळा असलेले अग्निदेव, सर्व यज्ञस्थळांना व्यापून टाकतात. आरक्तवर्णी अश्वांवर आरूढ होणारे, अत्यंत सुंदर आणि तेजस्वी अग्निदेव, अन्नाने समृद्ध असलेल्या घराप्रमाणे यज्ञस्थळी सदैव आनंददायी वाटतात ॥८॥ .

स चेतयन्मनुषो यज्ञबन्धुः प्र तं मह्या रशनया नयन्ति ।
स क्षेत्यस्य दुर्यासु साधन्देवो मर्तस्य सधनित्वमाप॥९॥
अग्निदेव, भक्तगणांच्या यज्ञातील मित्र असून सर्वांना सन्मार्ग दाखवणारे आणि जागृत करणारे आहेत. भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांच्या लांब दोरीने अग्निदेवांना यज्ञस्थळी आणतात. अग्निदेव भक्तगणांच्या घरामध्ये राहून त्यांच्या इच्छा पूर्ण करतात आणि भक्तगणांना समृद्धी व देवांचे सान्निध्य प्राप्त करून देतात ॥९॥

स तू नो अग्निर्नयतु प्रजानन्नच्छा रत्नं देवभक्तं यदस्य ।
धिया यद्विश्वे अमृता अकृण्वन्द्यौष्पिता जनिता सत्यमुक्षन्॥१०॥
मार्गदर्शक, अधिपती, सर्व काही यथार्थपणे ज्ञात असलेले अग्निदेव, देवतांना अत्यंत प्रिय वांछनीय आणि उपभोग्य, अशी जगातील मौल्यवान रत्नयुक्त संपत्तीकडे आम्हा भक्तगणांना घेऊन जावोत ही विनंती. आकाशलोक, अग्निदेवांचे पिता आणि पोषणकर्ता आहेत आणि त्या अग्निदेवांचे यज्ञकर्ते भक्तगण घृताच्या आहुतीने पूजन करतात ॥१०॥

स जायत प्रथमः पस्त्यासु महो बुध्ने रजसो अस्य योनौ ।
अपादशीर्षा गुहमानो अन्तायोयुवानो वृषभस्य नीळे॥११॥
अग्निदेव सर्वप्रथम भक्तगणांच्या घरामध्ये यज्ञवेदीमध्ये उत्पन्न झाले, त्यानंतर अग्निदेवांनी विशाल अंतराळात आणि पृथ्वीवर पुनर्जन्म घेतला. पाय आणि डोके नसलेले अग्निदेव स्वतःचे रूप लपवत सर्वांच्या अंतरात निवास करतात. अग्निदेव विजेच्या रूपात ढगामध्ये हालचाल करतात ॥११॥

प्र शर्ध आर्त प्रथमं विपन्याँ ऋतस्य योना वृषभस्य नीळे ।
स्पार्हो युवा वपुष्यो विभावा सप्त प्रियासोऽजनयन्त वृष्णे ॥१२ ॥
विद्वानांच्या स्तुतीमुळे सत्याच्या नियमांचे पालन करणाऱ्या अग्निदेवांमध्ये सामर्थ्य प्रकट झाले. सर्वांना हवे-हवेसे वाटणारे, चिरतरुण, देखण्या, अग्निदेवांना सप्तऋत्विजांनी सामर्थ्यवान देवतांसाठी उत्पन्न केले ॥१२॥

अस्माकमत्र पितरो मनुष्या अभि प्र सेदुऋतमाशुषाणाः ।
अश्मव्रजाः सुदुघा वव्रे अन्तरुदुस्रा आजन्नुषसो हुवानाः॥१३॥
आम्हा भक्तगणांच्या पूर्वजांनी सत्याची जोपासना करणाऱ्या यज्ञाच्या साहाय्याने अग्निदेवांना प्राप्त केले. त्यांनी उषादेवतेची प्रार्थना केली आणि दगडांच्या गुहेत कोंडलेल्या दुधारू गायींना मुक्त केले ॥१३ ॥

ते मर्मृजत ददृवांसो अद्रिं तदेषामन्ये अभितो वि वोचन् ।
पश्चयन्त्रासो अभि कारमर्चन्विदन्त ज्योतिश्चकृपन्त धीभिः॥१४॥
आम्हा भक्तगणांच्या ज्या पूर्वजांनी पर्वताचा नाश करून अग्निदेवांना शुद्ध केले, त्यांच्या या कृत्याची महती सर्वत्र सांगितली जाते. मंत्रांच्या शक्तीने युक्त असलेल्या त्या पूर्वजांनी पूजनीय कर्मांद्वारे दैवी प्रकाश शोधून काढला आणि आपल्या प्रज्ञावान बुद्धीने त्या दिव्य ज्योतीला धारण केले.॥१४॥

ते गव्यता मनसा दृध्रमुब्धं गा येमानं परि षन्तमद्रिम् ।
दृळ्हं नरो वचसा दैव्येन व्रजं गोमन्तमुशिजो वि वव्रुः ॥१५॥
गायी मिळवण्याच्या इच्छेने ज्या वीरपूर्वजांनी आपल्या दिव्य मंत्रांनी आणि एकाग्र मनाने, गायींना कोंडून ठेवणाऱ्या ठेवणाऱ्या त्या दृढ आणि अभेद्य पर्वताला उघडले आणि त्यांनी गायींनी यक्त असलेल्या त्या दिव्य गुहेचा मार्ग मोकळा केला ॥१५॥

ते मन्वत प्रथमं नाम धेनोस्त्रिः सप्त मातुः परमाणि विन्दन् ।
तज्जानतीरभ्यनूषत व्रा आविर्भुवदरुणीर्यशसा गोः॥१६॥
हे अग्निदेवा ! ऋषींच्या समूहाला पहिल्यांदा मातृतुल्य वाणीचे रहस्य उमजले आणि त्यांनी एकवीस उत्कृष्ट श्लोकांची निर्मिती केली. हे सर्व काही कळताच देवतांच्या समूहांनी आनंद व्यक्त केला आणि आरक्तवर्णीय उषादेवता आपल्या दिव्य प्रकाशाने आणि वैभवाने प्रकट झाली ॥१६॥

नेशत्तमो दुधितं रोचत द्यौरुद्देव्या उषसो भानुरर्त ।
आ सूर्यो बृहतस्तिष्ठदज्राँ ऋजु मर्तेषु वृजिना च पश्यन्॥१७॥

उषादेवतेने रात्रीचा अंधार नाहीसा केला आणि आकाश प्रकाशमान झाले, त्यामुळे उषादेवतेचे तेज दिसून आले. मानवांच्या चांगल्या आणि वाईट कर्मांचे निरीक्षण करून, सूर्यदेव पर्वतांच्या शिखरावर नभोमंडळात प्रकट झाले ॥१७॥

आदित्पश्चा बुबुधाना व्यख्यन्नादिद्रत्नं धारयन्त द्युभक्तम् ।
विश्वे विश्वासु दुर्यासु देवा मित्र धिये वरुण सत्यमस्तु॥१८॥
जागृत ज्ञानी लोकांनी (बुबुधाना) अग्निदेवांचे तेज स्पष्टपणे पाहिले आणि अग्निदेवांना प्रज्ज्वलित केले. हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! सर्व लोकांच्या घराघरात या अग्निदेवांच्या दिव्य शक्तीचा वास होवो आणि आपल्या उपासना करणाऱ्या आम्हा भक्तगणांच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत ॥१८॥

अच्छा वोचेय शुशुचानमग्निं होतारं विश्वभरसं यजिष्ठम् ।
शुच्यूधो अतृणन्न गवामन्धो न पूतं परिषिक्तमंशोः॥१९॥
आम्ही भक्तगण सर्वात तेजस्वी, देवांना आवाहन करणाऱ्या, विश्वाचे पालनपोषण करणाऱ्या आणि यज्ञांचा महान कर्ता असलेल्या अग्निदेवांना आमची स्तुती अर्पण करतो. हे अग्निदेवा! यज्ञकर्त्या भक्तगणांनी गायींच्या आचळातून पवित्र दूध काढले नाही किंवा आपल्याला अर्पण करण्यासाठी सोमरस शुद्ध केला नाही तरीही त्या भक्तगणांच्या प्रार्थना आपण स्वीकारता ॥१९ ॥

विश्वेषामदितिर्यज्ञियानां विश्वेषामतिथिर्मानुषाणाम् ।
अग्निर्देवानामव आवृणानः सुमृळीको भवतु जातवेदाः॥२० ॥
अग्निदेव सर्व यज्ञीय देवतांमध्ये आदितीदेवतेंप्रमाणे पूजनीय आहेत आणि सर्व भक्तगणांचे प्रिय अतिथी आहेत. देवतांना रक्षण प्रदान करणारे अत्यंत दयाळू अग्निदेव आम्हा भक्तगणंना प्रसन्न होवोत ही विनंती ॥२० ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – अग्नि, **छन्द** - त्रिष्टुप्,

यो मर्त्येष्वमृत ऋतावा देवो देवेष्वरतिर्निधायि ।
होता यजिष्ठो मह्ना शुचध्यै हव्यैरग्निर्मनुष ईरयध्यै ॥१॥
मनुष्यांमध्ये सत्यवादी असलेले, अमर, महिमाशाली आणि सर्व देवतांचे दूत(अरतिः) असणारे अग्निदेव आपल्या महान तेजाने सर्वांना शुद्ध करतात. श्रेष्ठ यज्ञकर्ते अग्निदेव हविष्यान्नाच्या आहुतींद्वारे भक्तगणांना शुभ कर्मासाठी प्रेरित करतात ॥१॥.

इह त्वं सूनो सहसो नो अद्य जातो जाताँ उभयाँ अन्तरग्ने ।
दूत ईयसे युयुजान ऋष्व ऋजुमुष्कान्वृषणः शुक्राँश्च॥२ ॥
हे शक्तिमान अग्निदेवा ! आपण आमच्या यज्ञवेदी मध्ये प्रकट झाला आहात. शक्तिशाली, तेजस्वी आणि सरळ गतीने जाणाऱ्या अश्वांना आपल्या रथाला जुंपून आकाशातील देवतांमध्ये आणि मानवांमध्ये हविष्यान्नाची आहुती वाहून नेणारे दूत म्हणून आपण संचार करता ॥२ ॥

अत्या वृधस्नू रोहिता घृतस्नू ऋतस्य मन्ये मनसा जविष्ठा ।
अन्तरीयसे अरुषा युजानो युष्माँश्च देवान्विश आ च मर्तान् ॥३॥
हे अग्निदेवा ! आपल्या रथाला जुंपलेल्या आरक्त वर्णीय, घृताने माखलेल्या, मनापेक्षा ही वेगवान असलेल्या अश्वांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुती करतो. आपल्या या तेजस्वी अश्वांना रथाला जुंपून आपण देवतांमध्ये आणि मानवांमध्ये डौलदारपणे संचार करता ॥३॥.

अर्यमणं वरुणं मित्रमेषामिन्द्राविष्णू मरुतो अश्विनोत ।
स्वश्वो अग्ने सुरथः सुराधा एदु वह सुहविषे जनाय॥४ ॥
उत्तम अश्व, उत्तम रथ आणि उत्तम समृद्धी देणाऱ्या हे अग्निदेवा ! उत्तम हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या आम्हा भक्तगणांसाठी अर्यमा, वरुणदेव , मित्रदेव , इंद्रदेव , विष्णुदेव, मरुद्गण आणि अश्विनीकुमार या सर्व देवांना आपण घेऊन यावे ही विनंती. ॥४॥

गोमाँ अग्नेऽविमाँ अश्वी यज्ञो नृवत्सखा सदमिदप्रमृष्यः ।
इळावाँ एषो असुर प्रजावान्दीर्घो रयिः पृथुबुध्नः सभावान्॥५ ॥
हे शक्तिमान अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांच्या या यज्ञामध्ये गायी, मेंढ्या आणि अश्व यांचा समावेश असो. सदैव अजिंक्य असणाऱ्या, हे सामर्थ्यवान अग्निदेवा! आम्हा भक्तगणांचा हा यज्ञ आहुतींनी परिपूर्ण, पुत्र-पौत्रांनी युक्त तसेच निरंतर, समृद्धी, संपत्ती आणि समाजात कीर्ती मिळवून देणारा असो॥५॥

यस्त इध्मं जभरत्सिष्विदानो मूर्धानं वा ततपते त्वाया ।
भुवस्तस्य स्वतवाँः पायुरग्ने विश्वस्मात्सीमघायत उरुष्य॥६॥
हे अग्निदेवा! जे भक्तगण आपल्यासाठी परिश्रमपूर्वक घाम गाळून समिधा घेऊन येतात, आपल्याला प्राप्त करताना तपश्चर्येच्या श्रमामुळे नतमस्तक होतात, अशा भक्तगणांना आपण समृद्धी देता, त्यांचे पालन पोषण करता आणि त्यांचे, वाईट चिंतणाऱ्यांपासून रक्षण करता ॥६॥

यस्ते भरादन्नियते चिदन्नं निशिषन्मन्द्रमतिथिमुदीरत् ।
आ देवयुरिनधते दुरोणे तस्मिन्नयिर्ध्रुवो अस्तु दास्वान्॥७॥
हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला हविष्यान्नाची आहुती देऊन सेवा करतात, घरात आनंद देणाऱ्या अतिथीच्या रूपात आपल्याला प्रदीप्त

करतात, देवत्वाची इच्छा बाळगणाऱ्या अशा भक्तगणांना शाश्वत, स्थिर आणि विपुल संपत्ती प्राप्त होवो ही विनंती ॥७॥

यस्त्वा दोषा य उषसि प्रशंसात्प्रियं वा त्वा कृणवते हविष्मान् ।
अश्वो न स्वे दम आ हेम्यावान्तमंहसः पीपरो दाश्वांसम्॥८ ॥
हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण रात्री आणि उषःकाली आपली स्तुती करतात, यज्ञामध्ये मधुर हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात अशा दानशूर भक्तगणांना आपण पापांतून आणि संकटांतून मुक्त करावे ही विनंती. ज्याप्रमाणे एक वेगवान तेजस्वी अश्व आपल्या मालकाच्या घरी सुरक्षित पोहोचतो, त्याप्रमाणे आपण भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती ॥८ ॥

यस्तुभ्यमग्ने अमृताय दाशद्दुवस्त्वे कृणवते यतस्रुक् ।
न स राया शशमानो वि योषन्नैनमंहः परि वरदघायोः॥९॥
हे अमर अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण हातामध्ये स्रुवा धारण करून आपल्याला हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात आणि आपली मनोभावे सेवा-पूजा करतात, असे भक्तगण कधीही ऐश्वर्यापासून वंचित होत नाहीत आणि दुष्ट वृत्तीच्या मनुष्यांचे पाप किंवा संकट त्यांना कधीही स्पर्श करू शकत नाही ॥९ ॥

यस्य त्वमग्ने अध्वरं जुजोषो देवो मर्तस्य सुधितं रराणः ।
प्रीतेदसद्धोत्रा सा यविष्ठासाम यस्य विधतो वृधासः॥१०॥
हे अत्यंत ऊर्जावान अग्निदेवा ! आपण एखाद्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञाचा, प्रसन्न होऊन स्वीकार करता तेव्हा, आपली दिव्यशक्ती त्या यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रसन्नता आणि समृद्धी प्रदान करते. आपल्या उपासनेमुळे आणि

मदतीमुळे त्या भक्तगणांची प्रगती वृद्धिंगत होते . आम्ही सुद्धा अशाच प्रकारे आपली सेवा करून प्रगतीपथावर जाऊ ॥१० ॥

चित्तिमचित्तिं चिनवद्वि विद्वान्पृष्ठेव वीता वृजिना च मर्तान् ।
राये च नः स्वपत्याय देव दितिं च रास्वादितिमुरुष्य॥११ ॥
उत्कृष्ट - निष्कृष्ट अश्व ज्याप्रमाणे अश्वपाल सहजपणे एकमेकांपासून वेगळे करतो त्याप्रमाणे ज्ञानी अग्निदेव माणसांमधील ज्ञान आणि अज्ञान तसेच सत्य आणि असत्य एकमेकांपासून वेगळे करतात. हे अग्निदेवा! आम्हा भक्तगणांना सुंदर संतती आणि संपत्तीचा आशीर्वाद द्यावा, दानशूरांना संपत्ती प्रदान करावी आणि कृतघ्नांपासून संपत्तीचे रक्षण करावे ही विनंती. ॥११ ॥

कविं शशासुः कवयोऽदब्धा निधारयन्तो दुर्यास्वायोः ।
अतस्त्वं दृश्याँ अग्न एतान्पड्भिः पश्येरद्धुताँ अर्य एवैः॥१२ ॥
अहिंसक आणि तेजस्वी अशा ज्ञानी ऋषींनी भक्तगणांच्या यज्ञवेदीमध्ये अग्निदेवांना प्रस्थापित केले आहे. हे श्रेष्ठ अग्निदेवा ! आपल्या आश्चर्यकारक आणि दर्शनीय तेजाने दृश्य मानवांचे आणि अदृश्य देवतांचे अवलोकन करावे ही विनंती. ॥१२ ॥

त्वमग्ने वाघते सुप्रणीतिः सुतसोमाय विधते यविष्ठ ।
रत्नं भर शशमानाय घृष्वे पृथु श्चन्द्रमवसे चर्षणिप्राः॥१३ ॥
हे अत्यंत तरुण, नित्य नूतन, तेजस्वी अग्निदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या आणि सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तगणांना आपण उत्तम मार्गदर्शन करणारे आहात. रक्षण करणाऱ्या हे अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांच्या रक्षणासाठी आम्हाला विशाल, आनंददायी आणि मौल्यवान ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥१३॥

अधा ह यद्वयमग्ने त्वाया पड्भिर्हस्तेभिश्चकृमा तनूभिः ।
रथं न क्रन्तो अपसा भुरिजोऋतं येमुः सुध्य आशुषाणाः॥१४ ॥
ज्याप्रमाणे कारागीर आपल्या हातांच्या कौशल्याने रथ निर्माण करतात, त्याप्रमाणे शुद्ध बुद्धी असलेल्या, सत्कर्मी, यज्ञविधी मध्ये मग्न असलेल्या यज्ञकर्त्या भक्तगणांनी त्यांच्या हातांनी, पायांनी आणि शरीराच्या इतर अवयवांनी कष्ट करून अरणीच्या मंथनातून आपल्याला निर्माण केले. ॥१४॥

अधा मातुरुषसः सप्त विप्रा जायेमहि प्रथमा वेधसो नॄन् ।
दिवस्पुत्रा अङ्गिरसो भवेमाद्रिं रुजेम धनिनं शुचन्तः॥१५ ॥
माता उषादेवतेच्या कुशीतून आम्ही सात बुद्धिमान(अङ्गिरस ऋषींच्या कुळातील सहा ऋषी आणि सातवे वामदेव) जन्माला आलो. तेजस्वी प्रकाशाचे पुत्र असलेले आम्ही, अङ्गिरस आणि वामदेव, आम्हाला पवित्र आणि प्रकाशमान करत संपत्तीने भरलेला पर्वत फोडून टाकू. ॥१५ ॥

अधा यथा नः पितरः परासः प्रत्नासो अग्न ऋतमाशुषाणाः ।
शुचीदयन्दीधितिमुक्थशासः क्षामा भिन्दन्तो अरुणीरप व्रन्॥१६ ॥
हे अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांच्या पूर्वजांनी सत्याचे पालन करत आणि स्तोत्रांचे पठण करत एक श्रेष्ठ स्थान आणि तेज प्राप्त केले. आमच्या पूर्वजांनी स्तोत्रांच्या पठणाने अंध:काराचा नाश केला आणि पणींनी चोरलेल्या गायींना मुक्त केले. ॥१६॥

सुकर्माणः सुरुचो देवयन्तोऽयो न देवा जनिमा धमन्तः ।
शुचन्तो अग्निं ववृधन्त इन्द्रमूर्वं गव्यं परिषदन्तो अग्मन्॥१७ ॥
उत्तम कर्मे करणारे, तेजस्वी आणि देवत्वाची ओढ असलेले यज्ञकर्ते भक्तगण लोखंडाला, भट्टीत तापवून शुद्ध करावे, त्याप्रमाणे आपल्या जीवनाला तपाने

उजळून टाकतात. यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांचे तेज वाढवून इंद्रदेवांना समृद्ध करतात. भक्तगणांनी यज्ञवेदीला चौफेर घेरून महान गोधनाची (ज्ञानाची) प्राप्ती केली. ॥१७॥

आ यूथेव क्षुमति पश्वो अख्यद्देवानां यज्जनिमान्त्युग्र ।
मर्तानां चिदुर्वशीरकृप्रन्वृधे चिदर्य उपरस्यायोः॥१८॥
हे तेजस्वी अग्निदेवा ! अन्नाने परिपूर्ण असलेल्या घरामध्ये पशुधन स्पष्टपणे दिसते त्याप्रमाणे, आपण आपले दिव्य स्वरूप प्रकट केले आहे. आपण भक्तगणांमध्ये दिव्य प्रेरणा निर्माण केली आहे, जेणेकरून भक्तगण आपल्या संततीचे पालन पोषण करण्यास आणि प्रगती करण्यास सक्षम होतील ॥१८॥

अकर्म ते स्वपसो अभूम ऋतमवस्रन्नुषसो विभातीः ।
अनूनमग्निं पुरुधा सुश्चन्द्रं देवस्य मर्मृजतश्चारु चक्षुः॥१९॥
हे अग्निदेवा ! उत्तम कर्म करणाऱ्या आम्ही भक्तगणांनी आपल्या सेवेचे कार्य पूर्ण केले आहे. तेजस्वी उषादेवता (पहाट) आपले तेज सर्वत्र पसरवते आणि अग्निदेवांना उजळून टाकते. या तेजस्वी आणि दोषरहित अग्निदेवांच्या सुंदर डोळ्यांप्रमाणे भासणाऱ्या तेजाची आम्ही भक्तगण उपासना करू ॥१९॥.

एता ते अग्न उचथानि वेधोऽवोचाम कवये ता जुषस्व ।
उच्छोचस्व कृणुहि वस्यसो नो महो रायः पुरुवार प्र यन्धि ॥२०॥
हे ज्ञानी अग्निदेवा ! आम्ही भक्तगणांनी आपल्यासाठी स्तुतियुक्त स्तोत्रांची रचना केली आहे त्याचा आपण आनंदाने स्वीकार करावा ही विनंती. हे बहुतांकडून प्रार्थिलेल्या अग्निदेवा ! आपण अधिक तेजाने प्रदीप्त होऊन आम्हा यज्ञकर्त्यांना महान ऐश्वर्य आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती ॥२०॥.

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – अग्नि, **छन्द** - त्रिष्टुप्,

आ वो राजानमध्वरस्य रुद्रं होतारं सत्ययजं रोदस्योः ।
अग्निं पुरा तनयित्नोरचित्ताद्धिरण्यरूपमवसे कृणुध्वम् ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! आकाशलोक आणि पृथ्वीलोक या दोन्ही लोकांमध्ये पसरलेल्या, यज्ञाचे अधिपती असलेल्या, सुवर्णासारखे तेजस्वी रूप असलेल्या अग्निदेवांची आपल्या संरक्षणासाठी प्रार्थना करावी. हे भक्तगणांनो ! मेघांतील विजेच्या अनपेक्षित गर्जनेपूर्वीच त्या प्रकाशमान यज्ञाच्या अधिपतीला तुम्ही प्रसन्न करून घ्यावे. ॥१॥

अयं योनिश्चकृमा यं वयं ते जायेव पत्य उशती सुवासाः ।
अर्वाचीनः परिवीतो नि षीदेमा उ ते स्वपाक प्रतीचीः ॥२॥
हे उत्तमकृत्य करणाऱ्या अग्निदेवा ! ज्याप्रमाणे सुंदर अलंकृत वस्त्रे परिधान केलेली आणि पतीवर प्रेम करणारी पत्नी आपल्या पतीसाठी घर सजवते, त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी आपल्यासाठी ही यज्ञवेदी तयार केली आहे. आपण सर्व बाजूनी अलंकृत होऊन आमच्या यज्ञस्थळी यावे आणि समोर पसरलेल्या आसनावर विराजमान व्हावे ही विनंती. ॥२॥

आशृण्वते अदृपिताय मन्म नृचक्षसे सुमृळीकाय वेधः ।
देवाय शस्तिममृताय शंस ग्रावेव सोता मधुषुद्यमीळे ॥३ ॥
हे ययज्ञकर्त्या भक्तगणांनो ! सर्व काही श्रवण करणाऱ्या, जे कधीही गर्विष्ठ होत नाहीत अशा अहंकाररहित, जगावर मायेची दृष्टी ठेवणाऱ्या, सर्वदृष्ट्या, सुख प्रदान करणाऱ्या, अमर अग्निदेवांची स्तुतियुक्त स्तोत्रे, आपण पठण करावीत.

जे भक्तगण दगडांच्या भांड्यांमध्ये मधुर सोमरस सिद्ध करतात ते भक्तगण सुद्धा भक्तिपूर्वक अग्निदेवांची स्तुती करतात ॥३ ॥

त्वं चिन्नः शम्या अग्ने अस्या ऋतस्य बोध्यृतचित्स्वाधीः ।
कदा त उक्था सधमाद्यानि कदा भवन्ति सख्या गृहे ते ॥४॥
हे सुबुद्ध आणि सत्याला जाणणाऱ्या अग्निदेवा ! आपण आमच्या या कर्मयुक्त उपासना जाणून घ्याव्यात ही विनंती. हे अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी आपल्यासाठी पठण केलेली स्तुतियुक्त स्तोत्रे आम्हाला कधी आनंद देतील? आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आपली मैत्री केव्हा प्राप्त होईल ? ॥४ ॥

कथा ह तद्वरुणाय त्वमग्ने कथा दिवे गर्हसे कन्न आगः ।
कथा मित्राय मीळ्हुषे पृथिव्यै ब्रवः कदर्यम्णे कद्भगाय ॥५॥
हे अग्निदेवा! आपण वरुणदेवांपाशी आमची तक्रार का करता ? आपण आकाशलोकांपाशी आमचा असा कोणता अपराध सांगितला ? आपण आमची पापकर्मे, फळे देणाऱ्या मित्रदेव, पृथ्वीदेवता, अर्यमा आणि भगदेवांना का सांगितलीत ? ॥५ ॥

कद्विष्ण्यासु वृधसानो अग्ने कद्वाताय प्रतवसे शुभंये ।
परिज्मने नासत्याय क्षे ब्रवः कदग्ने रुद्राय नृघ्ने ॥६॥
हे यज्ञवेदी मध्ये वृद्धिंगत होणाऱ्या (वृधसानो) अग्निदेवा ! अत्यंत बलशाली शुभ फळ देणाऱ्या सर्वत्र संचार करणाऱ्या वायुदेवांना आपण काय सांगितले? पृथ्वीवर राहणाऱ्या अश्विनीकुमारांसाठी आणि शत्रूंचा नाश करणाऱ्या रुद्रदेवांसाठी आपण आम्हा भक्तगणांच्या कोणत्या स्तुती पोहोचवाल ? ॥६ ॥

कथा महे पुष्टिम्भराय पूष्णे कद्रुद्राय सुमखाय हविर्दे ।
कद्विष्णव उरुगायाय रेतो ब्रवः कदग्ने शरवे बृहत्यै ॥७॥
हे अग्निदेवा ! आपण महान आणि पोषण करणाऱ्या पूषन् देवांना आमच्याबद्दल काय सांगितले ? यज्ञातील आहुतींचे फळ देणाऱ्या रुद्रदेवांना आपण काय अर्पण करता? ज्याची कीर्ती सर्वत्र गायली जाते अशा विष्णुदेवांच्या सामर्थ्याबद्दल आपले काय म्हणणे आहे? आपण त्या महान हिंसक शक्ती बद्दल काय सांगाल? ॥७॥

कथा शर्धाय मरुतामृताय कथा सूरे बृहते पृच्छ्यमानः ।
प्रति ब्रवोऽदितये तुराय साधा दिवो जातवेदश्चिकित्वान् ॥८॥
हे अग्निदेवा! बलवान आणि अमर मरुद्गण, महान सूर्यदेव, आदिती देवता, वेगवान वायुदेव या सर्व देवतांनी प्रश्न विचारले असता आपण त्यांना काय उत्तर देता? हे सर्वज्ञ जातवेदा अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांचे सर्व ज्ञान घेऊन आमचे कार्य सिद्ध करावे ही विनंती. ॥८॥.

ऋतेन ऋतं नियतमीळ आ गोरामा सचा मधुमत्पक्वमग्ने ।
कृष्णा सती रुशता धासिनैषा जामर्येण पयसा पीपाय ॥९॥
हे अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाशी निगडित असलेल्या गायींच्या मधुर आणि शक्तीवर्धक दुधाची नित्य प्रार्थना करतो. त्या गायी रंगाने काळ्या असूनही, मानवांचे पोषण करणाऱ्या आणि त्यांना अमरत्व देणाऱ्या आपल्या पांढऱ्या शुभ्र दुधाने सर्वांना पुष्ट करतात. ॥९ ॥

ऋतेन हि ष्मा वृषभश्चिदक्तः पुमाँ अग्निः पयसा पृष्ठ्येन ।
अस्पन्दमानो अचरद्वयोधा वृषा शुक्रं दुदुहे पृश्निरूधः ॥१०॥

सत्याच्या नियमाशी निगडित असलेल्या, सामर्थ्यवान हे अग्निदेवा! आपण यज्ञामध्ये अर्पण केलेल्या दुधाने परिपूर्ण आहात. अन्नदान करत शक्तिशाली अग्निदेव स्थिर राहून कार्य करतात. जलाचा वर्षाव करणारे सूर्यदेव पाण्याचा वर्षाव करत शुद्ध आणि तेजस्वी शक्ती प्रदान करतात ॥१०॥

ऋतेनाद्रिं व्यसन्भिदन्तः समङ्गिरसो नवन्त गोभिः ।
शुनं नरः परि षदन्नुषासमाविः स्वरभवज्जाते अग्नौ ॥११॥
यज्ञाच्या सामर्थ्याने आङ्गिरस ऋषींनी गायींना अडवून ठेवणाऱ्या पर्वताचा भेद करून त्याला उखडून टाकले आणि आपल्या गायींपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. या तेजस्वी आङ्गिरसऋषींनी उषादेवतेला प्राप्त केले. अरणीच्या मंथनातून अग्निदेवांना प्रकट केले आणि त्यानंतर सूर्यदेव सर्वत्र दृश्यमान झाले ॥११॥

ऋतेन देवीरमृता अमृक्ता अर्णोभिरापो मधुमद्भिरग्ने ।
वाजी न सर्गेषु प्रस्तुभानः प्र सदमित्स्रवितवे दधन्युः ॥१२॥
सत्याच्या नियमाशी निगडित असलेल्या हे अग्निदेवा! ज्याप्रमाणे एखादा अश्व, शर्यतीत सोडल्यावर वेगाने धावतो, त्याप्रमाणे कधीही खंडित न होणाऱ्या, मधुर जलाने भरलेल्या नद्या अविरतपणे वेगाने वाहत राहतात ॥१२॥

मा कस्य यक्षं सदमिद्धुरो गा मा वेशस्य प्रमिनतो मापेः ।
मा भ्रातुरग्ने अनृजोऋणं वेर्मा सख्युर्दक्षं रिपोर्भुजेम ॥१३॥
हे अग्निदेवा! आमच्या हातून कोणाही पूजनीय व्यक्तीची किंवा प्राण्याची हिंसा घडू नये ही विनंती. आपण हिंसक दुष्ट मनाच्या आमच्या शेजाऱ्यांच्या यज्ञामध्ये कधी सहभागी होऊ नका, आमच्या कुटील मनाच्या भावांची

आहुती स्वीकारू नका ही विनंती. आमच्या मित्राच्या सामर्थ्याचा किंवा धनाचा उपभोग घेण्याची, ते हडपण्याची शत्रूंसारखी बुद्धी आम्हाला होऊ नये ही विनंती.॥१३ ॥

रक्षा णो अग्ने तव रक्षणेभी रारक्षाणः सुमख प्रीणानः ।
प्रति ष्फुर वि रुज वीड्वंहो जहि रक्षो महि चिद्वावृधानम् ॥१४॥
हे महान शक्तिमान अग्निदेवा! आपण आमच्यावर प्रसन्न होऊन आपल्या विविध संरक्षण साधनांनी आमचे निरंतर रक्षण करावे, आमची दु:खदायक आणि कठीण संकटे दूर करून ती नष्ट करावीत ही विनंती. अत्यंत बलवान होऊन वाढलेल्या दुष्टशक्तींचा पूर्ण विनाश करावा ही विनंती. ॥१४ ॥

एभिर्भव सुमना अग्ने अर्कैरिमान्त्स्पृश मन्मभिः शूर वाजान् ।
उत ब्रह्माण्यङ्गिरो जुषस्व सं ते शस्तिर्देववाता जरेत ॥१५॥
हे अग्निदेवा! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपण प्रसन्न व्हावे. आम्ही मनःपूर्वक केलेल्या केलेल्या प्रार्थना स्वीकार करून, आम्हाला समृद्धी प्रदान करावी ही विनंती. देवतांना प्रेरित करणारी आमची ही स्तुतियुक्त स्तोत्रे आपले सामर्थ्य वाढवो. ॥१५॥

एता विश्वा विदुषे तुभ्यं वेधो नीथान्यग्ने निण्या वचांसि ।
निवचना कवये काव्यान्यशंसिषं मतिभिर्विप्र उक्थैः ॥१६ ॥
सृष्टिकर्त्या, यज्ञविधींचे जाणकार आणि दूरदर्शी अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी आमच्या बुद्धीने आपल्यासाठी रहस्यमय, गूढ आणि स्पष्ट अर्थ असलेली स्तोत्रे रचली आहेत त्याचे आम्ही पठण करतो ॥१६ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – रक्षोहा(राक्षसांचा नाश करणारा) अग्नि, **छन्द** - त्रिष्टुप्,

कृणुष्व पाजः प्रसितिं न पृथ्वीं याहि राजेवामवाँ इभेन ।
तृष्वीमनु प्रसितिं द्रूणानोऽस्तासि विध्य रक्षसस्तपिष्ठैः ॥१॥
हे अग्निदेवा ! पक्ष्यांना पकडण्यासाठी शिकारी जसा आपले जाळे पसरवतो त्याप्रमाणे आपण आपले तेज चहूबाजूला पसरवावे ही विनंती. एखादा पराक्रमी राजा हत्तीवर स्वार होऊन शत्रूवर चालून जातो, त्याप्रमाणे आपण शत्रूंवर चालून जावे. आपल्या वेगाने शत्रूंचा पाठलाग करत एखाद्या धनुर्धारीप्रमाणे आपण आपल्या अत्यंत दाहक तेजाने राक्षसांचा नाश करावा ही विनंती. ॥१॥

तव भ्रमास आशुया पतन्त्यनु स्पृश धृषता शोशुचानः ।
तपूंष्यग्ने जुह्वा पतंगानसंदितो वि सृज विष्वगुल्काः ॥२॥
हे अग्निदेवा ! आपल्या वेगवान आणि तापदायक ज्वाळा शत्रूंवर वेगाने झेपावत आहेत. आपल्या अत्यंत तेजस्वी संहारक तेजाने शत्रूंचा पाठलाग करून त्यांना भस्मसात करावे ही विनंती. हे अग्निदेवा ! कोणाकडून न रोखल्या जाणाऱ्या आपल्या ज्वाळा उल्के प्रमाणे सर्वत्र पसरतात आणि शत्रूंचा नाश करतात. ॥२॥

प्रति स्पशो वि सृज तूर्णितमो भवा पायुर्विशो अस्या अदब्धः ।
यो नो दूरे अघशंसो यो अन्त्यग्ने माकिष्टे व्यथिरा दधर्षीत् ॥३ ॥

हे अत्यंत शक्तिशाली अग्निदेवा ! आपली वेगवान, शत्रूंना रोखणारी किरणे सर्वत्र पसरवावी त्यामुळे आपण आम्हा भक्तगणांचे अजिंक्य रक्षक बनाल. हे अग्निदेवा ! आमचे वाईट चिंतणाऱ्या किंवा आम्हाला कोणत्याही पीडा देणाऱ्या जवळच्या किंवा दूरच्या सर्व शत्रूंना आम्हाला त्रास देण्याची हिंमत होऊ नये ही विनंती. ॥३ ॥

उदग्ने तिष्ठ प्रत्या तनुष्व न्यमित्राँ ओषतात्तिग्महेते ।
यो नो अरातिं समिधान चक्रे नीचा तं धक्ष्यतसं न शुष्कम् ॥४॥
हे तीक्ष्ण शस्त्रांनी युक्त अग्निदेवा ! आपण प्रदीप्त व्हावे आणि आपले तेज सर्वत्र पसरवावे ही विनंती. आमच्या शत्रूंना पूर्णपणे जाळून टाकावे, आमच्याशी वैर बाळगणाऱ्या दुष्ट प्रवृत्तीच्या शत्रूंना वाळलेल्या लाकडाप्रमाणे भस्मसात करावे ही विनंती. ॥४॥ .

ऊर्ध्वो भव प्रति विध्याध्यस्मदाविष्कृणुष्व दैव्यान्यग्ने ।
अव स्थिरा तनुहि यातुजूनां जामिमजामिं प्र मृणीहि शत्रून् ॥५॥
हे अग्निदेवा ! आपण संरक्षणासाठी सज्ज होऊन आमच्या शत्रूंवर प्रहार करावा आणि आपले सामर्थ्य प्रकट करावे ही विनंती. वाईट शक्तींनी प्रेरित झालेल्या राक्षसांच्या धनुष्याची प्रत्यंचा सैल करावी ही विनंती. आम्हा भक्तगणांच्या जवळच्या किंवा दूरच्या सर्व शत्रूंचा आपण नाश करावा ही विनंती. ॥५॥

स ते जानाति सुमतिं यविष्ठ य ईवते ब्रह्मणे गातुमैरत् ।
विश्वान्यस्मै सुदिनानि रायो द्युम्नान्यर्यो वि दुरो अभि द्यौत् ॥६॥
हे नित्य नूतन अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपली मनःपूर्वक स्तुती करतात, त्यांना आपली कृपा प्राप्त व्हावी आणि त्यांचे प्रगतीचे मार्ग उघडले

जावेत ही विनंती. आशा भक्तगणांचे सर्व दिवस शुभकारक आणि कल्याणकारी असतात आणि आपण त्यांची ऐश्वर्य, तेज आणि यशाची सर्व द्वारे प्रकाशमान करता॥६॥

सेदग्ने अस्तु सुभगः सुदानुर्यस्त्वा नित्येन हविषा य उक्थैः ।
पिप्रीषति स्व आयुषि दुरोणे विश्वेदस्मै सुदिना सासदिष्टिः ॥७॥
हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला निरंतर हविष्यान्नाची आहुती देऊन आणि स्तुतियुक्त मंत्रांनी आपल्याला प्रसन्न करतात, ते भक्तगण ऐश्वर्यवान आणि सुखी होवोत. अशा भक्तगणांचे सर्व दिवस सौभाग्यशाली होवोत आणि त्याच्या सर्व इच्छा फलदायी ठरोत ही विनंती. ॥७॥.

अर्चामि ते सुमतिं घोष्यर्वाक्सं ते वावाता जरतामियं गीः ।
स्वश्वास्त्वा सुरथा मर्जयेमास्मे क्षत्राणि धारयेरनु द्यून् ॥८ ॥
हे अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या कृपापूर्ण ज्ञानाची स्तुती करतो. आपल्याला प्राप्त करण्याच्या उद्देशाने उच्चारलेली आमची स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्यापर्यंत पोहचली जावोत. आम्ही भक्तगण आपली उत्तम अश्वांनी आणि देखण्या रथांनी सेवा करू. आपण आम्हाला दररोज समृद्ध करावे ही विनंती. ॥८॥

इह त्वा भूर्या चरेदुप त्मन्दोषावस्तर्दीदिवांसमनु द्यून् ।
क्रीळन्तस्त्वा सुमनसः सपेमाभि द्युम्ना तस्थिवांसो जनानाम् ॥९॥
रात्रीच्या अंधाराचा नाश करून प्रकाशमान होणाऱ्या दैदिप्यमान अग्निदेवा ! या जगामध्ये आपल्या सान्निध्यात राहून अनेक भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांद्वारे आपली उपासना करतात. आम्ही भक्तगण प्रसन्न आणि शुद्ध मनाने आपली

कृपा प्राप्त करण्याची इच्छा बाळगतो आणि आमच्या शत्रूंचे ऐश्वर्य आम्हाला मिळो ही विनंती. ॥९॥

यस्त्वा स्वश्वः सुहिरण्यो अग्न उपयाति वसुमता रथेन ।
तस्य त्राता भवसि तस्य सखा यस्त आतिथ्यमानुषग्जुजोषत् ॥१०॥
हे अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण उत्तम अश्व आणि सुवर्णयुक्त अशा वैभवशाली रथातून आपल्याकडे येतात, त्यांचे आपण मित्रासारखे रक्षण करावे ही विनंती. जे भक्तगण आपल्या आदरातिथ्याचा पाहुणचार घेतात त्यांच्या पाठीशी आपण सदैव उभे राहता. ॥१० ॥

महो रुजामि बन्धुता वचोभिस्तन्मा पितुर्गोतमादन्वियाय ।
त्वं नो अस्य वचसश्चिकिद्धि होतर्यविष्ठ सुक्रतो दमूनाः ॥११॥
हे यज्ञकर्त्या, नित्य तरुण, मोहक अग्निदेवा ! आम्हा भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी आमचे पूर्वज गौतम ऋषींकडून मिळालेल्या बंधुत्वाच्या नात्याचे आम्ही वर्णन करत आहोत. हे बुद्धिमान आणि घराचे रक्षक असलेल्या अग्निदेवा ! आपण आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांतील शब्द नीट समजावून घ्यावेत ही विनंती ॥११॥

अस्वप्नजस्तरणयः सुशेवा अतन्द्रासोऽवृका अश्रमिष्ठाः ।
ते पायवः सध्र्यञ्चो निषद्याग्ने तव नः पान्त्वमूर ॥१२॥
हे ज्ञानी, जागरूक, संकटातून तारुन नेणाऱ्या, कधीही न थकणाऱ्या, आळस नसलेल्या, अहिंसक अग्निदेवा ! आपली किरणे (ज्वाळा) आमच्या यज्ञवेदी मध्ये विराजमान होऊन आमचे रक्षण करोत ही विनंती ॥१२ ॥

ये पायवो मामतेयं ते अग्ने पश्यन्तो अन्धं दुरितादरक्षन् ।

ररक्ष तान्त्सुकृतो विश्ववेदा दिप्सन्त इद्रिपवो नाह देभुः ॥१३॥
हे अग्निदेवा ! आपल्या संरक्षक आणि करुणामय शक्तीने ममतेचा अंधपुत्र दीर्घतमाऋषींचे अंधत्व आपण दूर करून त्यांना शाप मुक्त केले. हे सर्वज्ञ अग्निदेवा !आपण सत्कर्म करणाऱ्या भक्तगणांचे रक्षण करता. आपल्याला हानी पोहोचवणारे दुष्ट शत्रु कधी आपला किंवा आपल्या भक्तगणांचा पराभव करू शकत नाही. ॥१३ ॥

त्वया वयं सधन्यस्त्वोतास्तव प्रणीत्यश्याम वाजान् ।
उभा शंसा सूदय सत्यतातेऽनुष्ठुया कृणुह्यह्रयाण ॥१४॥
हे अग्निदेवा ! आपल्या मार्गदर्शनानुसार आणि आपल्याकडून रक्षण केलेले आम्ही भक्तगण आपले सहकारी होऊन विपुल ऐश्वर्य प्राप्त करू. सत्याचा प्रसार करणाऱ्या आणि पापांचा नाश करणाऱ्या हे अग्निदेवा! आपण आमच्या जवळच्या आणि दूरच्या शत्रूंचा नाश करावा , आणि आमची सर्व कार्ये क्रमशः पूर्ण करावीत ही विनंती ॥१४ ॥

अया ते अग्ने समिधा विधेम प्रति स्तोमं शस्यमानं गृभाय ।
दहाशसो रक्षसः पाह्यस्मान्द्रुहो निदो मित्रमहो अवद्यात् ॥१५॥
हे अग्निदेवा !आम्ही यज्ञकर्ते भक्तगण या समिधा अर्पण करून आपली सेवा करत आहोत. आम्ही करत असलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा आपण स्वीकार करावा ही विनंती. हे मित्रवत, तेजस्वी अग्निदेवा ! दुष्ट प्रवृत्तींच्या राक्षसांना आपण भस्मसात करावे, विश्वासघातकी निंदा करणाऱ्यांपासून तसेच सर्व पापांपासून आम्हा भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती. ॥१५॥.

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – वैश्वानर अग्नि, **छन्द** - त्रिष्टुप्,

वैश्वानराय मीळ्हुषे सजोषाः कथा दाशेमाग्नये बृहद्भाः ।
अनूनेन बृहता वक्षथेनोप स्तभायदुपमिन्न रोधः ॥१॥
सर्व मानवांचे कल्याण करणाऱ्या आणि कृपेचा वर्षाव करणाऱ्या वैश्वानर अग्निदेवांना आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी कशाप्रकारे आहुती द्यावी ? ज्याप्रमाणे एखादा भक्कम खांब (उपमित) घराला आधार देतो, त्याप्रमाणे त्या महान आणि ज्याच्या मध्ये कोणताही दोष नाही अशा अग्निदेवांनी, आपल्या तेजाच्या बळावर आकाशलोकांना आणि पृथ्वीलोकांना आधार दिला आहे. ॥१॥.

मा निन्दत य इमां मह्यं रातिं देवो ददौ मर्त्याय स्वधावान् ।
पाकाय गृत्सो अमृतो विचेता वैश्वानरो नृतमो यह्वो अग्निः ॥२॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! मर्त्य मानवांना ज्ञानाची देणगी देणाऱ्या, स्वतःच्या सामर्थ्याने युक्त अशा वैश्वानर अग्निदेवांची कधीही निंदा करू नका. वैश्वानर अग्निदेव अत्यंत बुद्धिमान, सर्वज्ञ, मानवांमध्ये श्रेष्ठ आणि महान आहेत. ॥२॥

साम द्विबर्हा महि तिग्मभृष्टिः सहस्रेता वृषभस्तुविष्मान् ।
पदं न गोरपगूळ्हं विविद्वानग्निर्मह्यं प्रेदु वोचन्मनीषाम् ॥३॥
पृथ्वीलोक आणि आकाशलोक या दोन्ही लोकांत महान असणारे, तेजस्वी तेज असलेले, सर्जनशील शक्ती आलेले, वृषभाप्रमाणे सामर्थ्याचे प्रतीक असलेले अग्निदेव, गाईंच्या पावलांच्या ठशांप्रमाणे गूढ आहेत. विद्वानांच्या सहयोगाने आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांचे ज्ञान प्राप्त करतो. ॥३॥

प्र ताँ अग्निर्बभसत्तिग्मजम्भस्तपिष्ठेन शोचिषा यः सुराधाः ।
प्र ये मिनन्ति वरुणस्य धाम प्रिया मित्रस्य चेततो ध्रुवाणि ॥४॥
तेजस्वी ज्वाळांचे दात असलेले, उत्तम धन अर्पण करणारे अग्निदेव, आपल्या प्रखर तेजाने, ज्ञानी मित्रदेवांच्या आणि वरुणदेवांच्या अढळ अशा वैश्विक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या लोकांना भस्मसात करोत ॥४ ॥

अभ्रातरो न योषणो व्यन्तः पतिरिपो न जनयो दुरेवाः ।
पापासः सन्तो अनृता असत्या इदं पदमजनता गभीरम् ॥५॥
नातेवाईकांचा आधार नसलेल्या इकडे-तिकडे आधारासाठी भटकत असणाऱ्या स्त्रिया, आपल्या पतीची प्रतारणा करणाऱ्या चुकीच्या मार्गावरून जाणाऱ्या स्त्रिया, तसेच पापी, ज्यांचे विचार असत्य आहेत आणि जे कायम असत्यच बोलतात अशा व्यक्ती स्वतःसाठी विनाशाच्या खोल नरकात पडतात. ॥५॥.

इदं मे अग्ने कियते पावकामिनते गुरुं भारं न मन्म ।
बृहद्दधाथ धृषता गभीरं यह्वं पृष्ठं प्रयसा सप्तधातु ॥६॥
हे पवित्र करणाऱ्या अग्निदेवा ! ज्याप्रमाणे एखादा जड भार एखाद्या दुर्बल व्यक्तीवर टाकला जातो, त्याप्रमाणे आपली उपासना करण्याचे कर्म आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी खूप कठीण आहे तरीही आम्ही त्याचा त्याग करणार नाही. आपण आम्हा भक्तगणांना विपुल, अथांग, महान आणि सातधातूंनी युक्त असे ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥६॥.

तमिन्त्वेव समना समानमभि क्रत्वा पुनती धीतिरश्याः ।
ससस्य चर्मन्नधि चारु पृश्नेरग्रे रुप आरुपितं जबारु ॥७॥

एकाच ध्येयाने, निश्चितपणे , पवित्र करणाऱ्या बुद्धीने त्या परम वैश्वानर अग्निदेवांना यज्ञकर्ते भक्तगण प्राप्त करून घेतात. जसे सुंदर पृथ्वीदेवतेच्या पृष्ठभागावर अन्नधान्य निर्माण होते त्याचप्रमाणे सृष्टीच्या प्रारंभी वैश्वानर अग्निदेवांचे अत्यंत तेजस्वी रूप अग्रभागी प्रकट होते. ॥७॥ .

प्रवाच्यं वचसः किं मे अस्य गुहा हितमुप निणिग्वदन्ति ।
यदुस्रियाणामप वारिव व्रन्पाति प्रियं रुपो अग्रं पदं वेः ॥८॥
ज्याप्रमाणे गायींचे काढले दूध लपविले जाते त्याप्रमाणे ज्ञानी, श्रेष्ठ रूप असलेल्या, उत्तम स्थानाचे रक्षण करणाऱ्या वैश्वानर अग्निदेवांचे रहस्य गुप्त ठिकाणी लपवून ठेवले जाते . आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या या वक्तव्याचे रहस्य काय सांगावे?॥८ ॥ .

इदमु त्यन्महि महामनीकं यदुस्रिया सचत पूर्व्यं गौः ।
ऋतस्य पदे अधि दीद्यानं गुहा रघुष्यद्रघुयद्विवेद ॥९॥
ज्याप्रमाणे गायींचे दूध काढले जाते त्याप्रमाणे ज्ञानरूपी दूध काढणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांनी वैश्वानर अग्निदेवांचे अत्यंत तेजस्वी, सत्याच्या गुहेत वेगाने फिरणाऱ्या तेजाला शोधून काढले. ॥९ ॥

अध द्युतानः पित्रोः सचासामनुत गुह्यं चारु पृश्नेः ।
मातुष्पदे परमे अन्ति षद्गोर्वृष्णः शोचिषः प्रयतस्य जिह्वा ॥१०॥
आपली माता आणि पिता असलेल्या आकाशदेवतेच्या आणि पृथ्वीदेवतेच्या सानिध्यात असलेल्या प्रकाशमान वैश्वानर अग्निदेवांनी गूढ रहस्य प्राप्त केले. बलवान तेजस्वी वैश्वानर अग्निदेवांची जीभ उत्कृष्ट स्थानावर असलेल्या ज्ञानरूपी दूध प्राशन करण्याची इच्छा बाळगते. ॥१०॥ .

ऋतं वोचे नमसा पृच्छयमानस्तवाशसा जातवेदो यदीदम् ।
त्वमस्य क्षयसि यद्ध विश्वं दिवि यदु द्रविणं यत्पृथिव्याम् ॥११॥
हे जातवेद इंद्रदेवा ! आपल्या आशीर्वादाने प्रेरित होऊन आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्यापुढे नतमस्तक होऊन असे सत्य सांगतो की, "या विश्वात जे काही ऐश्वर्य आहे, आकाशलोकामध्ये आणि पृथ्वीलोकामध्ये जे काही धन आहे, त्या सर्वावर केवळ आपलेच आधिपत्य आहे." ॥११॥

किं नो अस्य द्रविणं कद्ध रत्नं वि नो वोचो जातवेदश्चिकित्वान् ।
गुहाध्वनः परमं यन्नो अस्य रेकु पदं न निदाना अगन्म ॥१२॥
हे ज्ञानी, जातवेद इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना, जगातील खरे धन काय आहे?, श्रेष्ठ आनंद कुठे आहे? या अत्यंत गूढ प्रश्नांचे उत्तर समजावून सांगावे. हे सर्व ज्ञान मिळवण्यासाठी आम्हा भक्तगणांना स्पष्ट मार्ग सांगा जेणेकरून आम्ही ध्येयापासून भरकटणार नाही आणि बंधनात अडकणार नाही. ॥१२॥

का मर्यादा वयुना कद्ध वाममच्छा गमेम रघवो न वाजम् ।
कदा नो देवीरमृतस्य पत्नीः सूरो वर्णेन ततनन्नुषासः ॥१३॥
हे अग्निदेवा ! ज्ञानाचे नियम कोणते आहेत आणि त्या ज्ञानाच्या मर्यादा कोणत्या आहेत ? ज्याप्रमाणे वेगवान अश्व रणांगणावर पोहोचतो त्याप्रमाणे या ज्ञानाचे नियम आणि मर्यादा पालन करून आम्ही यज्ञकर्ते भक्तगण समृद्धीकडे धाव घेऊ शकू. अमरत्वाच्या स्वामिनी असलेल्या दिव्य उषादेवी, सूर्यदेवांच्या तेजाने आपले रूप कधी विस्तारतील?" ॥१३ ॥

अनिरेण वचसा फल्गवेन प्रतीत्येन कृधुनातृपासः ।
अधा ते अग्ने किमिहा वदन्त्यनायुधास आसता सचन्ताम् ॥१४ ॥

हे अग्निदेवा ! जे लोक चैतन्यहीन, पोकळ आणि भ्रामक शब्दांचा आधार घेतात आणि आपल्या तुच्छ किंवा अपुऱ्या ज्ञानानेच स्वतःला तृप्त मानतात, ते लोक काय बोलणार? ज्ञानाचे कोणतेही सामर्थ्य जवळ नसलेले असे लोक केवळ एकत्र बसून राहतात. ॥१४॥

अस्य श्रिये समिधानस्य वृष्णो वसोरनीकं दम आ रुरोच ।
रुशद्वसानः सुदृशीकरूपः क्षितिर्न राया पुरुवारो अद्यौत् ॥१५॥
प्रदीप्त झालेले, सामर्थ्यवान, सर्वांना आश्रय देणारे अग्निदेवांचे तेज यज्ञगृहाला प्रकाशमान करते. तेजस्वी, आनंददायक शक्तीने युक्त आणि असंख्य शृंगारिकांनी गौरवलेले अग्निदेव, अश्व आणि इतर खजिन्यासारख्या संपत्तीने सुशोभित झालेल्या राजाप्रमाणे तळपतात. ॥१५॥ .

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-६

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – वैश्वानर अग्नि, **छन्द** - त्रिष्टुप्

ऊर्ध्व ऊ षु णो अध्वरस्य होतरग्ने तिष्ठ देवताता यजीयान् ।
त्वं हि विश्वमभ्यसि मन्म प्र वेधसश्चित्तिरसि मनीषाम् ॥१॥
हे यज्ञाचे मुख्य ऋत्विज आणि श्रेष्ठ पूजनीय अग्निदेवा ! आपण आमच्या यज्ञामध्ये विराजमान व्हावे ही विनंती. आपण आमच्या सर्व विचारांना जाणणारे आहात. आपण विद्वान यज्ञकर्त्या भक्तगणांची बौद्धिक क्षमता वाढवणारे आहात.॥१॥

अमूरो होता न्यसादि विक्ष्वग्निर्मन्द्रो विदथेषु प्रचेताः ।
ऊर्ध्वं भानुं सवितेवाश्रेन्मेतेव धूमं स्तभायदुप द्याम् ॥२॥
मोह नसलेले, यज्ञकार्य प्रसन्न करणारे, ज्ञानसंपन्न, अग्निदेव यज्ञकार्यात भक्तगणांसोबत आसनस्थ झाले आहेत. ज्याप्रमाणे सूर्यदेवता आपला प्रकाश सर्वत्र पसरवतात त्याप्रमाणे अग्निदेवांच्या ऊर्ध्वगामी ज्वाळांचा धूर एखाद्या खांबा प्रमाणे आकाशापर्यंत घेऊन जातात. (आपली ऊर्जा आकाशा पर्यंत पोहोचवतात)॥२॥

यता सुजूर्णी रातिनी घृताची प्रदक्षिणिद्देवतातिमुराणः ।
उदु स्वरुर्नवजा नाक्रः पश्वो अनक्ति सुधितः सुमेकः ॥३ ॥
घृताने माखलेली आणि प्रदीप्त ज्वाळेप्रमाणे तेजस्वी असलेली ही यज्ञीय आहुती हातात घेऊन यज्ञकर्ते भक्तगण यज्ञवेदी सभोवती प्रदक्षिणा घालत आहे. नव्याने तयार केलेला, भक्कम पाया असलेला, उत्तम प्रकारे स्थापित

केलेला यज्ञस्तंभ एका एखाद्या नेत्याप्रमाणे बळीच्या पशूंना घृताने माखवून स्वतःला उभा करत आहे. ॥३॥.

स्तीर्णे बर्हिषि समिधाने अग्ना ऊर्ध्वो अध्वर्युर्जुजुषाणो अस्थात् ।
पर्यग्निः पशुपा न होता त्रिविष्ट्येति प्रदिव उराणः ॥४ ॥
यज्ञवेदीवर कुशाचे दर्भ पसरून अग्निदेवांना प्रदीप्त करून यज्ञकर्ते भक्तगण ऋत्विज अग्निदेवांना प्रसन्न करण्यासाठी उभे राहतात. ज्याप्रमाणे गुराखी आपल्या पशूंचे रक्षण करतो, त्याचप्रमाणे आहुती देणारे यज्ञकर्ते भक्तगण प्राचीन विधीनुसार तीन वेळा अग्निदेवांभोवती प्रदक्षिणा घालतात आणि यज्ञाचे रक्षण करतात. ॥४॥

परि त्मना मितद्रुरेति होताग्निर्मन्द्रो मधुवचा ऋतावा ।
द्रवन्त्यस्य वाजिनो न शोका भयन्ते विश्वा भुवना यदभ्राट् ॥५॥
मधुर वाणी असलेले, सत्यनिष्ठ, आनंददायक, यज्ञाचेस्वामी, यज्ञकर्ते अग्निदेव सर्वत्र संचार करतात. अग्निदेवांच्या ज्वाळा वेगवान अश्वांप्रमाणे चहूकडे पसरतात. जेव्हा अग्निदेव तेजस्वीपणे प्रदीप्त होतात तेव्हा सर्व प्राणिमात्र भयभीत होतात. ॥५॥.

भद्रा ते अग्ने स्वनीक संदृग्घोरस्य सतो विषुणस्य चारुः ।
न यत्ते शोचिस्तमसा वरन्त न ध्वस्मानस्तन्वी रेप आ धुः ॥६॥
हे सुंदर ज्वालांच्या, भयंकर आणि सर्वव्यापी अग्निदेवा आपले दर्शन अत्यंत सुंदर आणि अतिशय कल्याणकारी आहे. अंध:कार आपल्या तेजाला रोखू शकत नाही आणि विनाशकारी राक्षस आपल्या देहावर कोणताही डाग लावू शकत नाहीत.॥६॥

न यस्य सातुर्जनितोरवारि न मातरापितरा नू चिदिष्टौ ।
अधा मित्रो न सुधितः पावकोऽग्निर्दीदाय मानुषीषु विक्षु ॥७॥
हे इंद्रदेवा ! आपल्या दातृत्वाचे सामर्थ्य कोणीही थांबवू शकत नाहीत. आई-वडिलांप्रमाणे असलेले आकाशलोक आणि पृथ्वीलोक आपल्याला अडवू शकत नाहीत. पवित्र करणारे अग्निदेव एका हितचिंतक मित्राप्रमाणे यज्ञकर्त्या भक्तगणांच्या घरांमध्ये प्रस्थापित होऊन प्रकाशमान होतात. ॥७॥

द्विर्यं पञ्च जीजनन्त्संवसानाः स्वसारो अग्निं मानुषीषु विक्षु ।
उषर्बुधमथर्यो न दन्तं शुक्रं स्वासं परशुं न तिग्मम् ॥८॥
एकत्र राहणाऱ्या दहा भगिनींनी (बोटांनी) दोन अरणीच्या मंथनातून पहाटे जागरूक होणाऱ्या अग्निदेवांना जन्म दिला. हविष्यान्नाच्या आहुतीचे भक्षण करणारे, सुंदर मुख असलेले अग्निदेव एखाद्या तीक्ष्ण कुऱ्हाडीप्रमाणे सामर्थ्यवान आणि धारदार आहेत ॥८॥

तव त्ये अग्ने हरितो घृतस्ना रोहितास ऋज्वञ्चः स्वञ्चः ।
अरुषासो वृषण ऋजुमुष्का आ देवतातिमह्वन्त दस्माः ॥९॥
हे अग्निदेवा ! आपले प्रसिद्ध, आरक्त वर्णीय, तुपासारखे चमकदार, सरळ मार्गाने चालणारे अत्यंत वेगवान, सामर्थ्यवान आणि तेजस्वी अश्व भक्तगणांच्या यज्ञासाठी आमंत्रित केले जातात. ॥९॥

ये ह त्ये ते सहमाना अयासस्त्वेषासो अग्ने अर्चयश्चरन्ति ।
श्येनासो न दुवसनासो अर्थं तुविष्वणसो मारुतं न शर्धः ॥१०॥
हे अग्निदेवा ! शत्रूंना पराभूत करणाऱ्या, सतत गतिमान असणाऱ्या आणि अत्यंत तेजस्वी अशा आपल्या ज्वाळा सर्वत्र पसरतात. ज्याप्रमाणे शिकारी श्येन (ससाणा) वेगाने आपल्या लक्ष्याकडे झेप घेतो, त्याप्रमाणे कडाडणारा

आवाज करणाऱ्या आपल्या या ज्वाळा मरुद्गणांच्या सैन्यासारख्या शक्तिशाली आणि वेगवान आहेत. ॥१०॥

अकारि ब्रह्म समिधान तुभ्यं शंसात्युक्थं यजते व्यू धाः ।
होतारमग्निं मनुषो नि षेदुर्नमस्यन्त उशिजः शंसमायोः ॥११॥
हे प्रदीप्त अग्निदेवा! आपल्यासाठी हे स्तोत्र रचले आहे. यज्ञकर्ते भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत यज्ञकर्म करतात. यज्ञस्थळी देवतांना बोलावणाऱ्या हे अग्निदेवा! वंदन करणारे, शुभ फळाची इच्छा बाळगणारे आम्ही भक्तगण आपल्या सभोवती बसलो आहोत. आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा आपण स्वीकार करावा ही विनंती. ॥११ ॥.

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-७

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – वैश्वानर अग्नि, **छन्द** - १ - जगती, २ - ६ अनुष्टुप् त्रिष्टुप्,

अयमिह प्रथमो धायि धातृभिर्होता यजिष्ठो अध्वरेष्वीड्यः ।
यमप्नवानो भृगवो विरुरुचुर्वनेषु चित्रं विभ्वं विशेविशे ॥१॥
यज्ञ करणाऱ्या ऋत्विजांनी या श्रेष्ठ, यज्ञकुशल आणि वंदनीय अग्निदेवांना यज्ञवेदी मध्ये स्थापित केले आहे. ज्या अद्भुत, वैभवशाली आणि सर्वव्याप्त अग्निदेवांना अप्नवानऋषींनी आणि भृगुऋषींनी वनामध्ये प्रदीप्तकेले तेच अग्निदेव प्रत्येक यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी यज्ञवेदी मध्ये प्रदीप्त झाले आहेत. ॥१॥

अग्ने कदा त आनुषग्भुवद्देवस्य चेतनम् । अधा हि त्वा जगृभ्रिरे मर्तासो विक्ष्वीड्यम् ॥२॥
हे तेजस्वी आणि पूजनीय अग्निदेवा ! आपले ते दिव्य आणि निरंतर चैतन्यशील तेज कधी प्रदीप्त होईल? कारण सर्व यज्ञकर्त्या भक्तगणांनी आपल्या घराघरांमध्ये एक वंदनीय, पूजनीय देवता म्हणून स्थापित केले आहे. ॥२॥

ऋतावानं विचेतसं पश्यन्तो द्यामिव स्तृभिः । विश्वेषामध्वराणां हस्कर्तारं दमेदमे ॥३॥
ताऱ्यांनी भरलेले आकाश सुशोभित होते, त्याप्रमाणे कार्यक्षमता वाढवणाऱ्या, यज्ञवेदीला सुशोभित करणाऱ्या, मायामुक्त, विशेष ज्ञानसंपन्न, अग्निदेवांना यज्ञकर्त्या भक्तगणांनी यज्ञस्थळी पाहिले. ॥३॥.

आशुं दूतं विवस्वतो विश्वा यश्चर्षणीरभि । आ जभ्रुः केतुमायवो भृगवाणं विशेविशे ॥४॥

विवस्वानांचे (सूर्यदेवांचे) वेगवान दूत असलेल्या मानवांवर अधिराज्य गाजवणाऱ्या, अग्निदेवांना सर्व मानवांनी (यज्ञकर्त्या भक्तगणांनी) आपआपल्या घरामध्ये स्थापन केले आहे. अग्निदेव भृगुऋषींप्रमाणे देदीप्यमान असून, ज्ञानाचे ध्वज (केतू) आहेत. ॥४॥

तमीं होतारमानुषक्चिचकित्वांसं नि षेदिरे । रण्वं पावकशोचिषं यजिष्ठं सप्त धामभिः ॥५॥

यज्ञकर्त्या भक्तगणांनी, आनंददायक, पवित्र प्रकाश देणाऱ्या, यज्ञामध्ये मुख्य ऋत्विज असणाऱ्या, सात रूपांनी युक्त असलेल्या अग्निदेवांची स्थापना केली. ॥५ ॥

तं शश्वतीषु मातृषु वन आ वीतमश्रितम् । चित्रं सन्तं गुहा हितं सुवेदं कूचिदर्थिनम् ॥६॥

कायम मातांमध्ये (समिधांमध्ये), जलाशयांमध्ये आणि वृक्षांमध्ये वास्तव्य करणारे, गूढ ठिकाणी लपलेले, उत्तम ज्ञान असलेले अग्निदेव त्यांचा शोध घेणाऱ्या भक्तगणांना सहजपणे प्राप्त होतात. ॥६॥

ससस्य यद्वियुता सस्मिन्नूधन्नृतस्य धामन्रणयन्त देवाः ।
महाँ अग्निर्नमसा रातहव्यो वेरध्वराय सदमिदृतावा ॥७॥

जेव्हा देवता, निद्रेचा त्याग करून उष:काली जागृत होतात, तेव्हा देवता सत्याच्या निवासस्थानी असलेल्या अग्निदेवांच्या सान्निध्यात प्रसन्न होतात. हे महान, सत्यवान आणि श्रेष्ठ अग्निदेवा ! हविष्यान्नाची आहुती अर्पण

असलेल्या करत असलेल्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञाला ओळखून त्याचा स्वीकार करावा आणि आम्हाला मार्गदर्शन करावे ही विनंती. ॥७॥

वेरध्वरस्य दूत्यानि विद्वानुभे अन्ता रोदसी संचिकित्वान् ।
दूत ईयसे प्रदिव उराणो विदुष्टरो दिव आरोधनानि ॥८॥
यज्ञाचे विद्वान दूत,सर्व कर्माचे जाणकार, पृथ्वीलोक आणि आकाशलोक या दोन्ही लोकांतील सीमांना उत्तम प्रकारे जाणणाऱ्या, पुरातन काळापासून व्यापक स्वरूपात पसरलेल्या हे अग्निदेवा ! आपण स्वर्गाच्या उंच शिखरांपर्यंत आणि मार्गांपर्यंत संचार करता ॥८॥

कृष्णं त एम रुशतः पुरो भाश्चरिष्णवर्चिर्वपुषामिदेकम् ।
यदप्रवीता दधते ह गर्भं सद्यश्चिज्जातो भवसीदु दूतः ॥९॥
हे तेजस्वी अग्निदेवा ! आपला मार्ग कृष्णवर्णी असला तरी आपले रूप अत्यंत शुभ आणि प्रकाशमान आहे. आपले तेजस्वी गमनशील रूप अद्वितीय आहे. जेव्हा दोन अरणींमध्ये आपली गर्भधारणा होते तेव्हा आपण त्वरीत प्रकट होऊन यज्ञकर्त्या भक्तगणांचे दूत होता. ॥९ ॥

सद्यो जातस्य ददृशानमोजो यदस्य वातो अनुवाति शोचिः ।
वृणक्ति तिग्मामतसेषु जिह्वां स्थिरा चिदन्ना दयते वि जम्भैः ॥१०॥
अरणिमंथनात प्रदीप्त झालेल्या अग्निदेवांचे तेज सर्वत्र दृश्यमान होते. जेव्हा वायु अग्निदेवांच्या ज्वाळांच्या मागे वाहू लागतो तेव्हा अग्निदेवांच्या तीक्ष्ण जिह्वा, वाळलेल्या गवतात आणि काट्याकुट्यांत पसरतात. अग्निदेव आपल्या जिह्वांनी अत्यंत कठीण लाकडाला सुद्धा लीलया भस्मसात करतात ॥१० ॥

षु यदन्ना तृषुणा ववक्ष तृषुं दूतं कृणुते यह्वो अग्निः ।
वातस्य मेळिं सचते निजूर्वन्नाशुं न वाजयते हिन्वे अर्वा ॥११ ॥

जेव्हा अग्निदेव तीव्र इच्छेने आपल्या अन्नाचा (समिधांचा) स्वीकार करतात तेव्हा अग्निदेव वेगवान दूताचे रूप धारण करतात. शुष्क लाकडांना जाळत असताना अग्निदेव वायूच्या वेगाशी आणि आवाजाशी एकरूप होतात. ज्याप्रमाणे एखादा स्वार आपल्या वेगवान घोड्याला प्रेरणा देऊन धावतो, त्याचप्रमाणे अग्निदेव वेगाने पुढे जातात. ॥११ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-८

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – वैश्वानर अग्नि, **छन्द** – गायत्री

दूतं वो विश्ववेदसं हव्यवाहममर्त्यम् । यजिष्ठमृञ्जसे गिरा ॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, अमर, देवांचे दूत, सर्व विश्वाचे ज्ञाता, यज्ञातील हविष्यान्नाच्या आहुती देवतांपर्यंत घेऊन जाणाऱ्या, यज्ञकार्य पार पाडण्यास श्रेष्ठ असलेल्या अग्निदेवांना, आमच्या कल्याणासाठी स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत अग्निदेवांना प्रसन्न करतो. ॥१॥

स हि वेदा वसुधितिं महाँ आरोधनं दिवः । स देवाँ एह वक्षति ॥२॥
यज्ञकर्त्या भक्तगणांना संपत्ती प्रदान करणारे आणि स्वर्गाचा मार्ग जाणणारे अग्निदेव सर्व देवतांना यज्ञस्थळी घेऊन येवोत ही विनंती. ॥२ ॥

स वेद देव आनमं देवाँ ऋतायते दमे । दाति प्रियाणि चिद्वसु ॥३॥
प्रकाशमान अग्निदेव सर्व देवतांना यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी आणण्यासाठी अनुकूल करतात. अग्निदेव सत्याचे आचरण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी राहून त्यांना सर्व प्रिय वस्तू आणि उत्तम धन प्रदान करतात. ॥३ ॥

स होता सेदु दूत्यं चिकित्वाँ अन्तरीयते । विद्वाँ आरोधनं दिवः ॥४॥
पृथ्वी आणि स्वर्ग यांच्यामध्ये संचार करणारे मध्यस्थ अग्निदेव दूत कार्य अतिशय सहजपणे पार पाडतात. विद्वान अग्निदेवांना स्वर्गापर्यंत पोहोचण्याचा मार्ग उत्तमरीत्या ज्ञात आहे. ॥४ ॥

ते स्याम ये अग्नये ददाशुर्हव्यदातिभिः । य ईं पुष्यन्त इन्धते ॥५ ॥
हविष्यान्नाची आहुती अर्पण करून प्रसन्न करणाऱ्या, समिधा अर्पण करून अग्निदेवांना प्रदीप्त करून त्यांची वाढ करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांसारखे आम्ही होऊ. ॥५॥

ते राया ते सुवीर्यैः ससवांसो वि शृण्विरे । ये अग्ना दधिरे दुवः ॥६ ॥
जे यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांची सेवा आणि भक्ती करतात ते सर्व भक्तगण ऐश्वर्याने आणि पराक्रमी पुत्रांच्या जोरावर सर्वत्र विख्यात होतात. ॥६ ॥

अस्मे रायो दिवेदिवे सं चरन्तु पुरुस्पृहः । अस्मे वाजास ईरताम् ॥७॥
हे अग्निदेवा ! अनेकांनी इच्छा केलेले ते विपुल ऐश्वर्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सतत प्राप्त होवो. सर्व प्रकारचे अन्न आणि सामर्थ्य आम्हाला प्राप्त होवो ही विनंती ॥७ ॥

स विप्रश्चर्षणीनां शवसा मानुषाणाम् । अति क्षिप्रेव विध्यति ॥८ ॥
हे तेजस्वी, ज्ञानी अग्निदेवा ! आपण आपल्या सामर्थ्याने यज्ञकर्त्या भक्तगणांमधील संकटांना वेगाने सुटलेल्या बाणाप्रमाणे पूर्णपणे नष्ट करावे ही विनंती ॥८ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-९

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – वैश्वानर अग्नि, **छन्द** – गायत्री

अग्ने मृळ महाँ असि य ईमा देवयुं जनम् । इयेथ बर्हिरासदम् ॥१॥
हे महान अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर आपण प्रसन्न होऊन देवतांची इच्छा करणाऱ्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी अंथरलेल्या कुशाच्या आसनावर आपण विराजमान व्हावे ही विनंती. ॥१॥

स मानुषीषु दूळभो विक्षु प्रावीरमर्त्यः । दूतो विश्वेषां भुवत् ॥२ ॥
मानवांमध्ये अजिंक्य, लोकांमध्ये सर्वश्रेष्ठ, रक्षक आणि अमर असलेले अग्निदेव सर्व देवतांचे दूत होवोत. ॥२॥

स सद्म परि णीयते होता मन्द्रो दिविष्टिषु । उत पोता नि षीदति ॥३ ॥
स्तुतियोग्य अग्निदेव यज्ञकार्याच्या वेळी यज्ञशाळेत यज्ञकर्ते (होता) म्हणून चहुबाजूंनी आणले जातात आणि तेच अग्निदेव सखोल अभ्यासक म्हणून(पोता) पवित्र दर्भासनावर विराजमान होतात. ॥३॥

उत ग्ना अग्निरध्वर उतो गृहपतिर्दमे । उत ब्रह्मा नि षीदति ॥४॥
अग्निदेव यज्ञातील मुख्य पुरोहित म्हणून, तसेच यज्ञशाळेमध्ये गृहपती म्हणून विराजमान होतात. तेच अग्निदेव ब्रह्माच्या रूपात यज्ञात स्थान ग्रहण करतात. ॥४॥.

वेषि ह्यध्वरीयतामुपवक्ता जनानाम् । हव्या च मानुषाणाम् ॥५॥

अग्निदेव यज्ञ करू इच्छिणाऱ्या भक्तगणांचे मार्गदर्शक आणि भक्तगणांनी अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती स्वीकारणारे आहेत. ॥५ ॥.

वेषीद्वस्य दूत्यं यस्य जुजोषो अध्वरम् । हव्यं मर्तस्य वोळ्हवे ॥६॥
हे अग्निदेवा ! आपण ज्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे यज्ञकार्य प्रसन्न होऊन स्वीकारता त्या भक्तगणांचे दूत म्हणून सज्ज होऊन भक्तगणांनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुती देवतांपर्यंत वाहून नेता. ॥६॥

अस्माकं जोष्यध्वरमस्माकं यज्ञमङ्गिरः । अस्माकं शृणुधी हवम् ॥७॥
हे आङ्गिरस अग्निदेवा ! आपण आमच्या या हिंसा रहित यज्ञकार्याचा आनंदाने स्वीकार करावा आणि आमचे हे आवाहन श्रवण करावे ही विनंती. ॥७ ॥

परि ते दूळभो रथोऽस्माँ अश्नोतु विश्वतः । येन रक्षसि दाशुषः ॥८ ॥
हे अग्निदेवा ! अभेद्य आणि अजिंक्य रथाच्या सहाय्याने आपण सर्व दिशांना संचार करतात. त्या रथाच्या सहाय्याने आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करावे ही विनंती. ॥८॥.

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१०

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –अग्नि, **छन्द** –१-३ पदपंक्ती, ४,६, ७ ,८ उष्णिक्
५ महापदपंक्ती

अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः क्रतुं न भद्रं हृदिस्पृशम् । ऋध्यामा त ओहैः ॥१॥
हे अग्निदेवा ! ज्याप्रमाणे उत्तम अश्वाला प्रेमाने आणि अन्नाने पुष्ट केले जाते, त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या हृदयस्पर्शी, कल्याणकारी आणि पवित्रस्तोत्रांनी आपली स्तुती करतो. आम्ही आमच्या या भक्तीपूर्ण स्तोत्रांनी आपल्याला तृप्त करतो. ॥१॥

अधा ह्यग्ने क्रतोर्भद्रस्य दक्षस्य साधोः । रथीऋतस्य बृहतो बभूथ ॥२ ॥
हे अग्निदेवा ! आपण या मंगलमय, सामर्थ्यशाली, इच्छित फळ देणाऱ्या आणि महान अशा सत्यरूपी यज्ञाचे सारथी (नेते) झाले आहात. ॥२ ॥

एभिर्नो अर्कैर्भवा नो अर्वाङ्स्वर्ण ज्योतिः ।
अग्ने विश्वेभिः सुमना अनीकैः ॥३ ॥
सुवर्णमय तेज असलेल्या हे अग्निदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न होऊन आपण आपल्या सर्व कल्याणकारी शक्तींसह आमच्याकडे अभिमुख (वळून) होऊन आमचे कल्याण करावे ही विनंती. ॥३॥

आभिष्टे अद्य गीर्भिर्गृणन्तोऽग्ने दाशेम ।
प्र ते दिवो न स्तनयन्ति शुष्माः ॥४॥

हे अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत आपल्याला हविष्यान्नाची आहुती अर्पण करतो. ज्याप्रमाणे आकाशामध्ये ढग गर्जना करतात त्याप्रमाणे आपल्या ज्वाळा (तेज) गर्जना करत चोहोबाजूला वेगाने पसरतात. ॥४॥

तव स्वादिष्ठाग्ने संदृष्टिरिदा चिदह्न इदा चिदक्तोः ।
श्रिये रुक्मो न रोचत उपाके ॥५॥
हे अग्निदेवा ! दिवस असो किंवा रात्र असो आपले दर्शन नेहमीच अत्यंत सुखदायी आणि प्रिय असते. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या सान्निध्यात असता त्यावेळेला आपण एखाद्या सोन्याच्या अलंकाराप्रमाणे शोभिवंत आणि दैदिप्यमान दिसता. ॥५॥

घृतं न पूतं तनूरेपाः शुचि हिरण्यम् । तत्ते रुक्मो न रोचत स्वधावः ॥६॥
स्वतःच्या अन्नाने तृप्त होणाऱ्या हे अग्निदेवा ! आपले शरीर शुद्ध तुपाप्रमाणे निर्मळ आणि दोष रहित आहे. आपले तेजस्वी आणि पवित्र स्वरूप एखाद्या शुद्ध सुवर्णालंकाराप्रमाणे झळाळून उठते. ॥६॥

कृतं चिद्धि ष्मा सनेमि द्वेषोऽग्न इनोषि मर्तात् ।
इत्था यजमानादृतावः ॥७॥
सत्याचे पालन करणाऱ्या हे अग्निदेवा ! यज्ञकर्त्या भक्तगणांची पूर्वीची काही पापे किंवा दुष्कृत्ये असतील तर त्या पापांचा किंवा दुष्कृत्यांचा आपण संपूर्ण नाश करावा ही विनंती. ॥७॥

शिवा नः सख्या सन्तु भ्रात्राग्ने देवेषु युष्मे ।
सा नो नाभिः सदने सस्मिन्नूधन् ॥८॥

हे अग्निदेवा ! आपले आणि आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे मैत्रीचे व बंधुत्वाचे नाते कल्याणकारी आणि मंगलमय होवो ही विनंती. ज्या यज्ञवेदीवर आपण एकत्र आलो आहोत ते स्थान आपल्या दोघांमधील परस्परांशी असलेले नाते दृढ करणारे केंद्र ठरो. ॥८॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-११

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – अग्नि, **छन्द** – त्रिष्टुप्

भद्रं ते अग्ने सहसिन्ननीकमुपाक आ रोचते सूर्यस्य ।
रुशद्दृशे ददृशे नक्तया चिदरूक्षितं दृश आ रूपे अन्नम् ॥१॥
हे अत्यंत शक्तिशाली अग्निदेवा ! सूर्यदेवांच्या तेजाप्रमाणे आपले कल्याणकारी स्वरूप सर्वत्र झगमगत असते. आपले लख्ख आणि शुभ्ररूप रात्रीच्या अंधारातही स्पष्ट दिसते. स्निग्ध स्वरूपातील तुपाच्या हविष्यान्नाची आहुती आपल्याला अर्पण केली जाते. ॥१॥

वि षाह्यग्ने गृणते मनीषां खं वेपसा तुविजात स्तवानः ।
विश्वेभिर्यद्वावनः शुक्र देवैस्तन्नो रास्व सुमहो भूरि मन्म ॥२॥
अनेक रूपात प्रकट होणाऱ्या हे अग्निदेवा ! यज्ञकार्य संपन्न करत आपल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करणाऱ्या भक्तगणांसाठी आपण स्वर्गलोकाचे द्वार(उन्नतीचा मार्ग) उघडावे ही विनंती. शुद्ध स्वरूपाच्या हे अग्निदेवा ! आपण सर्व देवतांना जे ज्ञान प्रदान केले ते आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसुद्धा प्रदान करावे ही विनंती. ॥२॥

त्वदग्ने काव्या त्वन्मनीषास्त्वदुक्था जायन्ते राध्यानि ।
त्वदेति द्रविणं वीरपेशा इत्थाधिये दाशुषे मर्त्याय ॥३॥
हे अग्निदेवा ! आपल्यापासूनच सर्व काव्यशक्ती (ज्ञान), प्रेरणादायी बुद्धी आणि फलदायी स्तोत्रे उत्पन्न होतात. आपल्याच कृपेने शुद्धबुद्धीच्या श्रेष्ठ कर्मासाठी यज्ञकर्त्या भक्तगणांना वीरांना शोभेल असे सामर्थ्य आणि ऐश्वर्य प्राप्त होते. ॥३॥

त्वद्वाजी वाजम्भरो विहाया अभिष्टिकृज्जायते सत्यशुष्मः ।
त्वद्रयिर्देवजूतो मयोभुस्त्वदाशुर्जूजुवाँ अग्ने अर्वा ॥४॥
हे अग्निदेवा ! बलवान, अन्नाचे पोषण करणारा, इच्छा पूर्ण करणारा, मनाच्या वेगाने कार्य करणारा, सर्वव्यापी, शत्रूंचा पराभव करणारा, महान यज्ञकर्ता पुत्र आपल्या मुळे अस्तित्वात येतो. ॥४ ॥

त्वामग्ने प्रथमं देवयन्तो देवं मर्ता अमृत मन्द्रजिह्वम् ।
द्वेषोयुतमा विवासन्ति धीभिर्दमूनसं गृहपतिममूरम् ॥५॥
अमर, देवतांना प्रसन्न करणारी वाणी (मन्द्रजिह्वम्) असलेल्या हे अग्निदेवा ! देवत्वाची इच्छा करणारे यज्ञकर्ते भक्तगण सर्वप्रथम आपली उपासना करतात. हे अग्निदेवा ! आपण द्वेषाचा नाश करणारे, घरामध्ये निवास करणारे, घराचे रक्षक आणि अत्यंत ज्ञानी आहात.
॥५ ॥

आरे अस्मदमतिमारे अंह आरे विश्वां दुर्मतिं यन्निपासि ।
दोषा शिवः सहसः सूनो अग्ने यं देव आ चित्सचसे स्वस्ति ॥६॥
शक्तिपुत्रा हे अग्निदेवा ! आपण, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे अज्ञान दूर करावे, आमची पापे आणि संकटे दूर ठेवावी आणि सर्व प्रकारची दुर्बुद्धी आमच्यामधून दूर घालवावी ही विनंती. हे कल्याणकारी अग्निदेवा ! आपण रात्रीच्या वेळी (कठीण समयी) आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या पाठीशी उभे राहता आणि आमचे सर्व प्रकारचे कल्याण करता. ॥६॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१२

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –अग्नि, **छन्द** – त्रिष्टुप्

यस्त्वामग्न इनधते यतस्रुक्त्रिस्ते अन्नं कृणवत्सस्मिन्नहन् ।
स सु द्युम्नैरभ्यस्तु प्रसक्षत्तव क्रत्वा जातवेदश्चिकित्वान् ॥१॥
हे सर्वज्ञ जातवेदा अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण हातामध्ये स्रुवा घेऊन नियमपूर्वक आपल्याला प्रदीप्त करतात आणि दिवसातून तीन वेळा आपल्याला हविष्यान्नाची आहुती अर्पण करतात ते, आपल्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने ज्ञानवान होवोत. असे यज्ञकर्ते भक्तगण उत्तम ऐश्वर्याने युक्त आणि सर्व संकटांवर किंवा शत्रूंवर विजय मिळवणारे होवोत. ॥१॥

इध्मं यस्ते जभरच्छश्रमाणो महो अग्ने अनीकमा सपर्यन् ।
स इधानः प्रति दोषामुषासं पुष्यन्रयिं सचते घ्नन्नमित्रान् ॥२॥
हे महान अग्निदेवा ! जे यज्ञकर्ते भक्तगण थकवा येईपर्यंत परिश्रम करून आपल्याला समिधा अर्पण करत, आपल्या स्वरूपाची सेवा करत, आपल्याला रात्रंदिवस तेवत ठेवतात, असे भक्तगण ऐश्वर्याची वृद्धी करतात , आपल्या शत्रूंचा नाश करून विजय मिळवतात. ॥२॥

अग्निरीशे बृहतः क्षत्रियस्याग्निर्वाजस्य परमस्य रायः ।
दधाति रत्नं विधते यविष्ठो व्यानुषङ्मर्त्याय स्वधावान् ॥३॥
महान ऐश्वर्याचे स्वामी, श्रेष्ठ अन्नाचे आणि धनाचे अधिपती, सदैव तरुण, सामर्थ्याने युक्त असे अग्निदेव, सेवा करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना श्रेष्ठ रत्ने आणि आनंददायी संपत्ती प्रदान करतात.॥३ ॥

यच्चिद्धि ते पुरुषत्रा यविष्ठाचित्तिभिश्चकृमा कच्चिदागः ।
कृधी ष्वस्माँ अदितेरनागान्व्येनांसि शिश्रथो विष्वगग्ने ॥४॥
हे ऊर्जावान अग्निदेवा ! मानवी प्रवृत्तीमुळे, अज्ञानाने आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी आपल्यासमोर जे काही अपराध किंवा पाप केले असेल, त्या सर्वांपासून आपण आम्हाला मुक्त करावे ही विनंती. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आदितीदेवींच्या दृष्टीने निष्पाप करावे आणि आमची सर्व पापे सर्व बाजूंनी पूर्णपणे नष्ट करावीत ही विनंती. ॥४॥

महश्चिदग्न एनसो अभीक ऊर्वाद्देवानामुत मर्त्यानाम् ।
मा ते सखायः सदमिद्रिषाम यच्छा तोकाय तनयाय शं योः ॥५॥
हे अग्निदेवा ! देवतांच्या किंवा मानवांच्या विरुद्ध आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी जर काही मोठे पाप केले असेल तर, त्या दोषांतून आम्हाला मुक्त करावे ही विनंती. आपले सखे असलेल्या आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचा नाश होऊ नये किंवा आम्हाला दुःख मिळू नये, तसेच आमच्या पुत्र-पौत्रांना आपण नेहमी सुख आणि शांती प्रदान करावी ही विनंती. ॥५ ॥.

यथा ह त्यद्वसवो गौर्यं चित्पदि षिताममुञ्चता यजत्राः ।
एवो ष्वस्मन्मुञ्चता व्यंहः प्र तार्यग्ने प्रतरं न आयुः ॥६ ॥
हे पूजनीय, पवित्र अग्निदेवा ! आपण ज्याप्रमाणे बंधनात असलेल्या गौरी गायीला मुक्त केले त्याप्रमाणे आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सर्व संकटांतून आणि पापांतून मुक्त करावे आणि आम्हाला दीर्घायुषी करावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१३

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –अग्नि, **छन्द** – त्रिष्टुप्

प्रत्यग्निरुषसामग्रमख्यद्विभातीनां सुमना रत्नधेयम् ।
यातमश्विना सुकृतो दुरोणमुत्सूर्यो ज्योतिषा देव एति ॥१॥
प्रकाशमान होणारे अग्निदेव, मंगलमय आणि रत्ने प्रदान करणाऱ्या उषादेवतेच्या आधी प्रदीप्त झाले आहेत. हे अश्विनीकुमारांनो! आपण यज्ञकर्त्या भक्तगणांच्या निवासस्थानी जावे कारण सूर्यदेव आपल्या दिव्य तेजासह आकाशात वर येत आहेत. ॥१॥

ऊर्ध्वं भानुं सविता देवो अश्रेद्द्रप्सं दविध्वद्गविषो न सत्वा ।
अनु व्रतं वरुणो यन्ति मित्रो यत्सूर्यं दिव्यारोहयन्ति ॥२॥
ज्याप्रमाणे गायींची (ज्ञानाची) इच्छा करणारा एखादा पराक्रमी योद्धा आपले शस्त्र उगारतो त्याप्रमाणे तेजस्वी सविता देवतेने (सूर्यदेवांनी) आपले रूप कशात स्थापित केले आहे. जेव्हा सूर्यदेव आकाशात प्रस्थापित होतात तेव्हा वरुणदेव आणि मित्रदेव सुद्धा आपले कार्य सुरू करतात. ॥२॥

यं सीमकृण्वन्तमसे विपृचे ध्रुवक्षेमा अनवस्यन्तो अर्थम् ।
तं सूर्यं हरितः सप्त यह्वीः स्पशं विश्वस्य जगतो वहन्ति ॥३॥
ज्या सूर्यदेवांनी सर्व बाजूने पसरलेल्या अंधाराला बाजूला केले, त्या सूर्यदेवांच्या कृपेने स्थिर निवास करणारे भक्तगण आळस झटकून आपली कार्ये पूर्ण करू लागले. अशा महान संपूर्ण जगाच्या द्रष्ट्या सूर्यदेवांना हरी नावाचे सात अश्व वाहून नेतात ॥३ ॥

वहिष्ठेभिर्विहरन्यासि तन्तुमवव्ययन्नसितं देव वस्म ।
दविध्वतो रश्मयः सूर्यस्य चर्मेवावाधुस्तमो अप्स्वन्तः ॥४॥
हे सूर्यदेवा ! आपल्या अत्यंत वेगवान अश्वांवर स्वार होऊन आपण सर्वत्र संचार करता. आपण रात्रीचे ते काळे वस्त्र दूर करून आपल्या प्रकाशाचा विस्तार करता. सूर्यदेवांची तेजस्वी किरणे चामड्याच्या आवरणाप्रमाणे पसरलेल्या अंध:काराला जलामध्ये बुडवून नष्ट करतात. ॥४॥

अनायतो अनिबद्धः कथायं न्यङ्ङुत्तानोऽव पद्यते न ।
कया याति स्वधया को ददर्श दिवः स्कम्भः समृतः पाति नाकम् ॥५॥
सूर्यदेव कोणत्याही बंधनात नसून कधीही का खाली पडत नाहीत ? वर तोंड करून असलेले आणि खालच्या बाजूला झुकणारे सूर्यदेव कोणत्या शक्तीने स्थिर राहतात ? सूर्यदेव कोणत्या शक्तीने आपला प्रवास करतात? आकाशातील तो खांब कोणी पाहिला आहे का, जो संपूर्ण अंतराळाला आधार देऊन त्याचे रक्षण करतो? ॥५ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१४

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –अग्नि, **छन्द** – त्रिष्टुप्

प्रत्यग्निरुषसो जातवेदा अख्यद्देवो रोचमाना महोभिः ।
आ नासत्योरुगाया रथेनेमं यज्ञमुप नो यातमच्छ ॥१॥
उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी अग्निदेव प्रदीप्त होऊन आपल्या महान तेजाने प्रकाशमान झाले आहेत. हे महान कीर्ती असलेल्या आणि स्तुतीस पात्र असलेल्या अश्विनकुमारांनो आपण आपल्या विस्तीर्ण रथावर आरूढ होऊन आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥१॥

ऊर्ध्वं केतुं सविता देवो अश्रेज्ज्योतिर्विश्वस्मै भुवनाय कृण्वन् ।
आप्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षं वि सूर्यो रश्मिभिश्चेकितानः ॥२ ॥
प्रकाशमान सवितादेवता (सूर्यदेव) आपल्या किरणांचे तेजोमय ध्वज विश्वासाठी उंचावर वरच्या दिशेने फडकवत आहेत. सर्वांना सुस्पष्ट दिसणाऱ्या सूर्यदेवांनी आपल्या किरणांनी आकाशलोक, पृथ्वीलोक आणि अंतरिक्ष या तिन्ही लोकांना व्यापून टाकले आहे. ॥२॥

आवहन्त्यरुणीर्ज्योतिषागान्मही चित्रा रश्मिभिश्चेकिताना ।
प्रबोधयन्ती सुविताय देव्युषा ईयते सुयुजा रथेन ॥३ ॥
आरक्त वर्णीय प्रकाश घेऊन येणाऱ्या, आपल्या किरणांनी सर्वत्र प्रगट होणाऱ्या आणि विस्तीर्ण स्वरूप असणाऱ्या दैदीप्यमान उषादेवतेचे आगमन झाले आहे. उषादेवता निद्रिस्त जीवांना जागृत करतात आणि उत्तम प्रकारे जुंपलेल्या रथात बसून भक्तगणांकडे येतात. ॥३ ॥.

आ वां वहिष्ठा इह ते वहन्तु रथा अश्वास उषसो व्युष्टौ ।
इमे हि वां मधुपेयाय सोमा अस्मिन्यज्ञे वृषणा मादयेथाम् ॥४॥
कामना पूर्ण करणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो ! उषादेवतेच्या प्रकाशामध्ये आपल्याला उत्तम प्रकारे वाहून नेणारे आपले अश्व आणि रथ आपल्याला आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी घेऊन येवोत आणि यज्ञामध्ये अर्पण केलेला सोमरस प्राशन करून आपण दोघेही आनंदित व तृप्त व्हावे ही विनंती. ॥४॥

अनायतो अनिबद्धः कथायं न्यङ्ङुत्तानोऽव पद्यते न ।
कया याति स्वधया को ददर्श दिवः स्कम्भः समृतः पाति नाकम् ॥५ ॥
सूर्यदेव कोणत्याही बंधनात नसून कधीही का खाली पडत नाहीत ? वर तोंड करून असलेले आणि खालच्या बाजूला झुकणारे सूर्यदेव कोणत्या शक्तीने स्थिर राहतात? सूर्यदेव कोणत्या शक्तीने आपला प्रवास करतात? आकाशातील तो खांब कोणी पाहिला आहे का, जो संपूर्ण अंतराळाला आधार देऊन त्याचे रक्षण करतो? ॥५ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१५

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –अग्नि, ७- ८ सोमक साहदेव्य दानस्तुती, ९-१० अश्विनीकुमार **छन्द** – गायत्री

अग्निर्होता नो अध्वरे वाजी सन्परि णीयते । देवो देवेषु यज्ञियः ॥१॥
आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञामध्ये, प्रकाशमान देवतांमध्ये, पूजनीय आणि यज्ञासाठी श्रेष्ठ अग्निदेव आहुती स्वीकारणारे म्हणून विराजमान आहेत. सर्व दिशांनी अत्यंत वेगवान अश्वांच्या सहाय्याने अग्निदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञासाठी आणले जातात. ॥१॥.

परि त्रिविष्ट्यध्वरं यात्यग्नी रथीरिव । आ देवेषु प्रयो दधत् ॥२॥
ज्याप्रमाणे कुशल सारथी आपल्या रथामधून फिरतो, त्याप्रमाणे अग्निदेव तीन वेळा होणाऱ्या यज्ञाभोवती प्रदक्षिणा घालतात आणि देवांना हविष्यान्नाच्या आहुती पोहचवतात. ॥२ ॥

परि वाजपतिः कविरग्निर्हव्यान्यक्रमीत् । दधद्रत्नानि दाशुषे ॥३॥
सर्वत्र संचार करणारे, अन्नाचे स्वामी अग्निदेव, हविष्यान्नाच्या आहुतीचा स्वीकार करतात आणि यज्ञकर्त्या दानशूर भक्तगणांना मौल्यवान रत्ने प्रदान करतात. ॥३॥.

अयं यः सृञ्जये पुरो दैववाते समिध्यते । द्युमाँ अमित्रदम्भनः ॥४॥
देवतांचे पुत्र सृञ्जय याच्या यज्ञामध्ये, अत्यंत तेजस्वी, शत्रूंचा नाश करणाऱ्या, अग्निदेवांना विजय प्राप्त व्हावा या उद्देशाने अग्रभागी प्रदीप्तकेले जाते. ॥४ ॥

अस्य घा वीर ईवतोऽग्नेरीशीत मर्त्यः । तिग्मजम्भस्य मीळ्हुषः ॥५॥
प्रखर ज्वाळांनी युक्त आणि इच्छित फळ देणाऱ्या अग्निदेवांवर स्तुती करण्यास प्रयत्नशील यज्ञकर्ते भक्तगण आपल्य उपासनेद्वारे नियंत्रण मिळवू शकतात॥५॥

तमर्वन्तं न सानसिमरुषं न दिवः शिशुम् । मर्मृज्यन्ते दिवेदिवे ॥६॥
शत्रूंचा पराभव करणाऱ्या अश्वांप्रमाणे, आकाशाच्या पुत्राप्रमाणे, सर्वांकडून प्रार्थनीय अग्निदेवांची यज्ञकर्ते भक्तगण दररोज मनोभावे पूजा व स्तुती करतात॥६॥

बोधद्यन्मा हरिभ्यां कुमारः साहदेव्यः । अच्छा न हूत उदरम् ॥७ ॥
वामदेव गौतम ऋषी म्हणतात," जेव्हा राजा सहदेवचा पुत्र सोमकाने दोन अश्व देण्याचे आश्वासन दिले, तेव्हा त्याला नकार न देता तत्परतेने त्याच्याकडे मी गेलो. "॥७॥

उत त्या यजता हरी कुमारात्साहदेव्यात् । प्रयता सद्य आ ददे ॥८॥
वामदेव गौतम ऋषी म्हणतात,"त्या पूजनीय अशा सहदेवाच्या पुत्राकडून, कुमार सोमकाकडून, त्याने अर्पण केलेले ते प्रसिद्ध दोन अश्व मी तत्काळ स्वीकारले."॥८ ॥

एष वां देवावश्विना कुमारः साहदेव्यः । दीर्घायुरस्तु सोमकः ॥९॥
वामदेव गौतम ऋषी म्हणतात," हे अश्विनीकुमारांनो !सहदेवाचा हा पुत्र सोमक आपल्या आशीर्वादाने दीर्घायुषी होवो ही विनंती."॥९ ॥

तं युवं देवावश्विना कुमारं साहदेव्यम् । दीर्घायुषं कृणोतन ॥१० ॥
वामदेव गौतम ऋषी म्हणतात,"हे दिव्य अश्विनीकुमारांनो ! आपण दोघांनी या सहदेवाच्या या पुत्राला सोमक कुमाराला दीर्घायुष्य प्रदान करावे ही विनंती."॥१०॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१६

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

आ सत्यो यातु मघवाँ ऋजीषी द्रवन्त्वस्य हरय उप नः ।
तस्मा इदन्धः सुषुमा सुदक्षमिहाभिपित्वं करते गृणानः ॥१॥
हे सत्यस्वरूप, ऋजीषी (सोमरस गाळून झाल्यानंतर उरलेला जो चोथा उरतो तो ग्रहण करणारा) इंद्रदेवा ! आपण आपल्या हरी नावाच्या अश्वावर आरूढ होऊन धावत आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी आपल्यासाठी हा उत्तम प्रकारे शुद्ध केलेला सोमरस प्राशन करण्यासाठी सिद्ध केला आहे. आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न होऊन आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥१॥

अव स्य शूराध्वनो नान्तेऽस्मिन्नो अद्य सवने मन्दध्यै ।
शंसात्युक्थमुशनेव वेधाश्चिकितुषे असुर्याय मन्म ॥२॥
हे सामर्थ्यवान इंद्रदेवा ! आपल्या प्रवासाचा शेवट झाल्यावर आपल्या अश्वांना मोकळे करावे. आजच्या आमच्या या यज्ञामध्ये आपण आनंदी आणि तृप्त होण्यासाठी यावे ही विनंती. दैवी शक्तीने संपन्न असलेल्या (असुर्याय) हे इंद्रदेवा ! उशना ऋषींनी जशी आपली स्तुती केली होती त्याचप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपली स्तुती करत आहोत. ॥२॥

कविर्न निण्यं विदथानि साधन्वृषा यत्सेकं विपिपानो अर्चात् ।
दिव इत्था जीजनत्सप्त कारूनह्ना चिच्चक्रुर्वयुना गृणन्तः ॥३॥
एखाद्या ज्ञानी कवीप्रमाणे गूढ, अध्यात्मिक ज्ञान पूर्णपणे जाणून घेणाऱ्या, शक्तिमान इंद्रदेवांनी भरपूर सोमरस प्राशन करून स्तुती केल्यानंतर आकाश

लोकांमध्ये सात महान स्तुतिपाठकांना (सप्तर्षींना) प्रकट केले. स्तुती करणारे ते ऋषी दिवसाच्या प्रकाशात आपल्या ज्ञानाने यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रकाशमान करतात. ॥३॥

स्वर्यद्वेदि सुदृशीकमर्कैर्महि ज्योती रुरुचुर्यद्ध वस्तोः ।
अन्धा तमांसि दुधिता विचक्षे नृभ्यश्चकार नृतमो अभिष्टौ ॥४॥
पहाटेच्या वेळी किरणांच्या तेजाने तेजस्वी आकाश सुंदररीत्या चमकू लागले तेव्हा इंद्रदेवांनी प्रकाशाचा शोध लावला. त्या नरश्रेष्ठ इंद्रदेवांनी प्रार्थनेने प्रसन्न होऊन, भक्तगणांसाठी विखुरलेला अंधार दूर केला आणि त्यांना सृष्टी पाहण्यासाठी दृष्टी प्रदान केली. ॥४॥

ववक्ष इन्द्रो अमितमृजीष्युभे आ पप्रौ रोदसी महित्वा ।
अतश्चिदस्य महिमा वि रेच्यभि यो विश्वा भुवना बभूव ॥५॥
अमर्याद शक्ती असलेले, सोमरस प्राशन करणारे इंद्रदेव आपल्या महानतेने इतके वृद्धिंगत झाले की त्यांनी आकाशलोक आणि पृथ्वीलोक व्यापून टाकले. इंद्रदेवांची महानता यापेक्षाही मोठी असून त्यांनी सर्व प्राणिमात्रांना आणि ब्रह्मांडाला जिंकले आहे. ॥५ ॥

विश्वानि शक्रो नर्याणि विद्वानपो रिरेच सखिभिर्निकामैः ।
अश्मानं चिद्ये बिभिदुर्वचोभिर्व्रजं गोमन्तमुशिजो वि वव्रुः ॥६॥
मानवांची हितकारी कार्ये करणाऱ्या, सर्व काही जाणणाऱ्या इंद्रदेवांनी आपल्या श्रद्धावान मित्रांच्या सहाय्याने अडवलेले पाणी मुक्त केले, आपल्या मंत्रांच्या सामर्थ्याने पर्वत भेदला आणि गायींनी भरलेला गोठा उघडला. ॥६ ॥

अपो वृत्रं वव्रिवांसं पराहन्प्रावत्ते वज्रं पृथिवी सचेताः ।

प्राणांसि समुद्रियाण्यैनोः पतिर्भवञ्छवसा शूर धृष्णो ॥७॥
हे साहसी इंद्रदेवा ! आपण पाण्याचा मार्ग अडवून धरणाऱ्या वृत्रासुराचा वज्रप्रहाराने पृथ्वीदेवतेच्या संमतीने संहार केला. हे अफाट सामर्थ्यवान इंद्रदेवा ! आपण अडवलेल्या जलप्रवाहांना समुद्राच्या दिशेने प्रवाहित केले. ॥७॥

अपो यदद्रिं पुरुहूत दर्दराविर्भुवत्सरमा पूर्व्यं ते ।
स नो नेता वाजमा दर्षि भूरिं गोत्रा रुजन्नङ्गिरोभिर्गृणानः ॥८॥
हे अनेकांनी आवाहन केलेल्या (पुरुहूत) इंद्रदेवा! जेव्हा आपण पाण्याचा मार्ग रोखणाऱ्या पर्वताला विदीर्ण केले तेव्हा, गायींचा शोध लावलेली प्राचीन सरमा प्रकट झाली. आङ्गिरसऋषी ज्याची स्तुती करतात अशा इंद्रदेवाला आमचे नेतृत्व करून ढग फोडून आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना विपुल अन्न आणि ऐश्वर्य प्राप्त करून द्यावे ही विनंती. ॥८॥

अच्छा कविं नृमणो गा अभिष्टौ स्वर्षाता मघवन्नाधमानम् ।
ऊतिभिस्तमिषणो द्युम्नहूतौ नि मायावानब्रह्मा दस्युरर्त ॥९॥
हे मानवांच्या हितचिंतक, मघवन इंद्रदेवा ! आपण यशाची आणि विजयाची याचना करत असलेल्या भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करावा, त्यांना कठीण प्रसंगाच्या वेळी सामर्थ्य द्यावे, जे कपटी, भक्तिहीन आणि विघातक प्रवृत्तीचे दस्यु संकटे निर्माण करतात त्यांचा संपूर्ण नाश करावा ही विनंती. ॥९॥

आ दस्युघ्ना मनसा याह्यस्तं भुवत्ते कुत्सः सख्ये निकामः ।
स्वे योनौ नि षदतं सरूपा वि वां चिकित्सदृतचिद्ध नारी ॥१० ॥
हे दस्युहंत्या इंद्रदेवा ! आपल्याशी मैत्री करण्यास उत्सुक असलेल्या कुत्सऋषींच्या निवासस्थानी आपण यावे ही विनंती. आपण दोघे समान

तेजस्वी होऊन आपल्या आसनावर एकत्र विराजमान व्हाल तेव्हा सत्याचे ज्ञान असलेले (ऋतचित्) आपल्यातील साम्य नक्कीच ओळखतील. ॥१०॥

यासि कुत्सेन सरथमवस्युस्तोदो वातस्य हर्योरीशानः ।
ऋज्रा वाजं न गध्यं युयूषन्कविर्यदहन्पार्याय भूषात् ॥११ ॥
हे इंद्रदेवा ! आपण वायूच्या वेगाने धावणाऱ्या सुवर्णवर्णीय अश्वांचे स्वामी आहात. ज्या दिवशी बुद्धिमान कुत्सऋषींनी शत्रूवर विजय मिळवण्यासाठी अन्नाप्रमाणे सहज मिळवता येणाऱ्या आणि सरळ गतीने चालणाऱ्या अश्वांना आपल्या रथाला जुंपले त्याच दिवशी आपण ऋषींचे रक्षण करण्याच्या इच्छेने त्यांच्यासोबत एकाच रथातून गेलात. ॥११॥

कुत्साय शुष्णमशुषं नि बर्हीः प्रपित्वे अह्नः कुयवं सहस्रा ।
सद्यो दस्यून्प्र मृण कुत्स्येन प्र सूरश्चक्रं वृहतादभीके ॥१२॥
हे इंद्रदेवा ! आपण, आपल्या भक्त असलेल्या कुत्सऋषींसाठी, विनाशकारी शुष्ण नावाच्या असुराला जमिनीवर लोळवले. दिवसाच्या उत्तरार्धात (प्रपित्वे) आपण कुयव नावाच्या असुराला आणि त्याच्या सहस्त्रावधी अनुयायांना नष्ट केले. त्या युद्धाच्या प्रसंगी आपण सूर्यदेवांचे चक्र वेगाने फिरवून कुत्सऋषींना विजय मिळवून दिला. ॥१२॥

त्वं पिप्रुं मृगयं शूशुवांसमृजिश्वने वैदथिनाय रन्धीः ।
पञ्चाशत्कृष्णा नि वपः सहस्रात्कं न पुरो जरिमा वि दर्दः ॥१३॥
हे इंद्रदेवा ! आपण विदथीचा पुत्र असलेल्या ऋजिश्वन नावाच्या राजासाठी पिप्रु आणि मृगय या सामर्थ्यवान असुरांना नष्ट केले. आपण पन्नास हजार कृष्णवर्णीय असुरांच्या सेनेचा संहार केला. ज्याप्रमाणे वार्धक्य सौंदर्याचा नाश

करते, त्याचप्रमाणे आपण शत्रूंचे अभेद्य किल्ल्यांचा सहजपणे नाश केला. ॥१३॥

सूर उपाके तन्वं दधानो वि यत्ते चेत्यमृतस्य वर्पः ।
मृगो न हस्ती तविषीमुषाणः सिंहो न भीम आयुधानि बिभ्रत् ॥१४॥
हे इंद्रदेवा ! आपण जेव्हा सूर्यदेवांच्या सान्निध्यात आपले शरीर धारण करता तेव्हा आपले दैवी रूप झळाळून उठते. मदमस्त हत्तीप्रमाणे आपण आपले सामर्थ्य, शत्रूंचा नाश करण्यासाठी वापरता त्यावेळी हातात शस्त्र धारण केलेले आपण, एखाद्या गर्जना करणाऱ्या सिंहासारखे भयंकर आणि तेजस्वी दिसता. ॥१४॥

इन्द्रं कामा वसूयन्तो अग्मन्त्स्वर्मीळ्हे न सवने चकानाः ।
श्रवस्यवः शशमानास उक्थैरोको न रण्वा सुदृशीव पुष्टिः ॥१५॥
ऐश्वर्याची आणि कीर्तीची इच्छा बाळगणारे, यज्ञामध्ये धनाची अभिलाषा धरून स्तुती करणारे, भक्तगण इंद्रदेवांकडे धाव घेतात त्यावेळेला इंद्रदेव एखाद्या आनंददायी सुंदर रूप असलेल्या निवास स्थानाप्रमाणे मोहक दिसतात. ॥१५ ॥

तमिद्व इन्द्रं सुहवं हुवेम यस्ता चकार नर्या पुरूणि ।
यो मावते जरित्रे गध्यं चिन्मक्षू वाजं भरति स्पार्हराधाः ॥१६॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, आवाहन करण्याजोगे, मानवाच्या कल्याणासाठी अनेक महान कार्य केली आहेत असे, त्यांची संपत्ती अत्यंत स्पृहणीय आहे अशा इंद्रदेवांचे आवाहन करतो. हे इंद्रदेवा ! आम्हा स्तुती करणाऱ्या भक्तगणांना ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥१६॥

तिग्मा यदन्तरशनिः पताति कस्मिञ्चिच्छूर मुहुके जनानाम् ।
घोरा यदर्य समृतिर्भवात्यध स्मा नस्तन्वो बोधि गोपाः ॥१७॥
हे इंद्रदेवा ! जेव्हा एखाद्या वीराच्या डोक्यावर अचानकपणे प्रखर वीज कोसळते किंवा शत्रूंशी गाठ पडल्यामुळे भयानक युद्ध उद्भवते अशावेळी आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या शरीराचे रक्षण करावे ही विनंती॥१७॥

भुवोऽविता वामदेवस्य धीनां भुवः सखावृको वाजसातौ ।
त्वामनु प्रमतिमा जगन्मोरुशंसो जरित्रे विश्वध स्याः ॥१८॥
हे इंद्रदेवा ! आपण वामदेव ऋषींच्या यज्ञाचे रक्षण करावे, युद्धाच्या वेळी आपण आम्हा भक्तगणांचे हितचिंतक व्हावे ही विनंती. आम्ही भक्तगण आपल्या उत्तम बुद्धीचा आणि मार्गदर्शनाचा स्वीकार करून आपल्याला शरण आलो आहोत. आपण भक्तगणांच्या पाठीशी रक्षक म्हणून उभे राहावे ही विनंती. ॥१८ ॥

एभिर्नृभिरिन्द्र त्वायुभिष्ट्वा मघवद्भिर्मघवन्विश्व आजौ ।
द्यावो न द्युम्नैरभि सन्तो अर्यः क्षपो मदेम शरदश्च पूर्वीः ॥१९॥
हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! आपले संरक्षण इच्छिणाऱ्या आणि आपल्याला पूजणाऱ्या दानशूर वीर पुरुषांच्या सान्निध्यात राहून आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सर्व संघर्षात विजय होऊ. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अनेक वर्षे रात्रंदिवस आपल्याला आनंदित करत राहू. ॥१९ ॥

एवेदिन्द्राय वृषभाय वृष्णे ब्रह्माकर्म भृगवो न रथम् ।
नू चिद्यथा नः सख्या वियोषदसन्न उग्रोऽविता तनूपाः ॥२० ॥
ज्याप्रमाणे भृगुऋषी उत्तमोत्तम रथ बनवतात त्याप्रमाणे आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी सामर्थ्यवान आणि कामना पूर्ण करणाऱ्या इंद्रदेवांसाठी स्तोत्रांची

रचना केली आहे. आमच्याशी असलेली आपली मैत्री कधीच तुटू नये, आपण आमचे रक्षक बनावे ही विनंती. ॥२०॥
(भृगवचा अर्थ 'अत्यंत कुशल रथ बनवणारे कारागीर' असा होतो)

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।
अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥२१ ॥
हे इंद्रदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना नद्या ज्याप्रमाणे काठोकाठ भरून वाहतात, त्याप्रमाणे आपण अन्न आणि समृद्धीने पूर्णतः तृप्त करावे ही विनंती. आम्ही भक्तगणांनी आपल्यासाठी नवीन स्तोत्रे रचली आहेत. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या बुद्धीच्या आणि कर्माच्या जोरावर आम्ही सदैव विजयी आणि समृद्ध होऊ ही विनंती ॥२१॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१७

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –इंद्र **छन्द** त्रिष्टुप् १५ एकपदा विराट्

त्वं महाँ इन्द्र तुभ्यं ह क्षा अनु क्षत्रं मंहना मन्यत द्यौः ।
त्वं वृत्रं शवसा जघन्वान्त्सृजः सिन्धूँरहिना जग्रसानान् ॥१॥
हे महान इंद्रदेवा ! आपल्या महान सामर्थ्यापुढे पृथ्वी आणि आकाश दोघेही नतमस्तक होतात. आपल्या पराक्रमाने नद्यांना रोखून धरणाऱ्या वृत्रासुराचा आपण वध केला आणि नद्यांना मुक्त केले. ॥१॥

तव त्विषो जनिमन्रेजत द्यौ रेजद्भूमिर्भियसा स्वस्य मन्योः ।
ऋघायन्त सुभ्वः पर्वतास आर्दन्धन्वानि सरयन्त आपः ॥२ ॥
हे इंद्रदेवा ! आपल्या जन्माच्या वेळी आपल्या प्रखर तेजामुळे पृथ्वी आणि आकाश भीतीने थरथरले. आपल्या क्रोधामुळे आणि सामर्थ्यामुळे विशाल आणि सुदृढ पर्वत देखील डळमळू लागले, विशाल मेघांनी कोरडी वाळवंटे ओली केली आणि नद्या प्रवाहित झाल्या. ॥२॥

भिनद्गिरिं शवसा वज्रमिष्णन्नाविष्कृण्वानः सहसान ओजः ।
वधीद्वृत्रं वज्रेण मन्दसानः सरन्नापो जवसा हतवृष्णीः ॥३॥
आपल्या शक्तीने आणि वज्राचा प्रहार करून पर्वताला भेदून टाकून आपले सामर्थ्य प्रकट करणाऱ्या सामर्थ्यशील इंद्रदेवांनी आपल्या वज्राने वृत्रासुराचा वध केला. वृत्रासुराचा अडथळा दूर झाल्यामुळे जलाचा प्रवाह वेगाने प्रवाहित झाला. ॥३ ॥

सुवीरस्ते जनिता मन्यत द्यौरिन्द्रस्य कर्ता स्वपस्तमो भूत् ।

य ईं जजान स्वर्यं सुवज्रमनपच्युतं सदसो न भूम ॥४॥
हे इंद्रदेवा ! प्रजापतींनी आपल्याला जन्म देऊन श्रेष्ठ पुत्राचे पिता आहोत असे सिद्ध केले. वज्र धारण करणाऱ्या, आपल्या पदावरून कधीही न ढळणाऱ्या आणि पृथ्वीप्रमाणे अथांग अशा वैभवशाली इंद्रदेवांना जन्म देण्याचे कृत्य करणारे प्रजापती अत्यंत श्रेष्ठ कर्म करणारे ठरले. ॥४ ॥

य एक इच्च्यावयति प्र भूमा राजा कृष्टीनां पुरुहूत इन्द्रः ।
सत्यमेनमनु विश्वे मदन्ति रातिं देवस्य गृणतो मघोनः ॥५॥
सर्व मनुष्यांचे राजे असलेले, अनेकांकडून संकटामध्ये हाक मारले जाणारे, भक्तगणांची शत्रूंबद्दल भीती नाहीशी करणारे इंद्रदेव स्तुती करणाऱ्या भक्तगणांना ऐश्वर्य प्रदान करतात. हे दान मिळाल्यामुळे भक्तगण आनंदित होतात. ॥५॥

सत्रा सोमा अभवन्नस्य विश्वे सत्रा मदासो बृहतो मदिष्ठाः ।
सत्राभवो वसुपतिर्वसूनां दत्रे विश्वा अधिथा इन्द्र कृष्टीः ॥६॥
हे खरे आहे की सर्व उत्साहवर्धक सोमरस, इंद्रदेवांना तृप्त करण्यासाठीच आहे. हे इंद्रदेवा ! आपण खरोखर सर्व संपत्तीचे स्वामी आहात. आपण दान देण्यासाठी सर्व भक्तगणांना आपल्या आश्रयाखाली पालन पोषण करण्यासाठी घेतले आहे. ॥६॥

त्वमध प्रथमं जायमानोऽमे विश्वा अधिथा इन्द्र कृष्टीः ।
त्वं प्रति प्रवत आशयानमहिं वज्रेण मघवन्वि वृश्चः ॥७ ॥
हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! जन्माला येताच आपण शत्रूला भयभीत करणाऱ्या शक्तीपासून मनुष्यांना आपल्या आधिपत्याखाली आणून वाचविले. हे इंद्रदेवा

! आपण जल प्रवाहाला रोधित करणाऱ्या अहि नावाच्या राक्षसाचा वज्राने तुकडे-तुकडे करून वध केला आणि जलप्रवाह पुन्हा प्रवाहित केला. ॥७॥

सत्राहणं दाधृषिं तुम्रमिन्द्रं महामपारं वृषभं सुवज्रम् ।
हन्ता यो वृत्रं सनितोत वाजं दाता मघानि मघवा सुराधाः ॥८ ॥
शत्रूंचा निःपात करणाऱ्या, अत्यंत धैर्यवान, बलवान, महान, अफाट सामर्थ्यशाली, हाती वज्र धारण करणाऱ्या, वृत्रासुराचा नाश करणाऱ्या इंद्रदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुती करतो. ऐश्वर्यवान इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना कल्याणकारी संपत्ती प्रदान करोत ही विनंती. ॥८ ॥

अयं वृतश्चातयते समीचीर्य आजिषु मघवा शृण्व एकः ।
अयं वाजं भरति यं सनोत्यस्य प्रियासः सख्ये स्याम ॥९ ॥
ऐश्वर्यवान इंद्रदेव युद्धामध्ये अतुलनीय मानले जातात. युद्धामध्ये विजयश्री प्राप्त करणारे, यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुती स्वीकारणारे इंद्रदेव आमचे प्रिय मित्र बनून राहोत. ॥९॥

अयं शृण्वे अध जयन्नुत घ्नन्नयमुत प्र कृणुते युधा गाः ।
यदा सत्यं कृणुते मन्युमिन्द्रो विश्वं दृळ्हं भयत एजदस्मात् ॥१० ॥
इंद्रदेव शत्रूंवर विजय मिळवणारे आणि त्यांचा नाश करणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. युद्धामध्ये इंद्रदेव शत्रूंचा नाश करून गायी प्राप्त करतात. ज्यावेळी इंद्रदेव युद्धामध्ये आपल्या क्रोधाने प्रकट होता तेव्हा संपूर्ण विश्व आणि विश्वातील अत्यंत स्थिर व मजबूत गोष्टी सुद्धा भयाने थरथर कापू लागतात . ॥१० ॥

समिन्द्रो गा अजयत्सं हिरण्या समश्विया मघवा यो ह पूर्वीः ।
एभिर्नृभिर्नृतमो अस्य शाकै रायो विभक्ता सम्भरश्च वस्वः ॥११ ॥
ऐश्वर्यवान इंद्रदेवांनी प्राचीन काळापासून गायी, सुवर्ण, अश्व युद्धामध्ये जिंकले आहेत. सर्व सामर्थ्यवान पुरुषांमध्ये श्रेष्ठ असलेले इंद्रदेव आपल्या सामर्थ्याने आणि आपल्या सहाय्यकांच्या सहाय्याने भक्तगणांना संपत्तीचे वाटप करतात. ॥११॥

कियत्स्विदिन्द्रो अध्येति मातुः कियत्पितुर्जनितुर्यो जजान ।
यो अस्य शुष्मं मुहुकैरियर्ति वातो न जूतः स्तनयद्भिरभ्रैः ॥१२॥
इंद्रदेवांना आपल्या मातेबद्दल कितपत माहिती आहे ? ज्या प्रजापतींनी जन्म दिला त्या जन्मदात्या पित्याबद्दल इंद्रदेवांना कितपत माहिती आहे ? ज्याप्रमाणे गर्जना करणाऱ्या ढगांनी प्रेरित झालेला वायु, वेगाने वाहत आपले सामर्थ्य प्रकट करतो त्याप्रमाणे इंद्रदेव आपल्या पित्याकडून परत-परत मिळणारे सामर्थ्य प्रकट करतात. ॥१२॥

क्षियन्तं त्वमक्षियन्तं कृणोतीयर्ति रेणुं मघवा समोहम् ।
विभञ्जनुरशनिमाँ इव द्यौरुत स्तोतारं मघवा वसौ धात् ॥१३ ॥
हे ऐश्वर्यवान इंद्रदेवा ! आपण निवासहीन किंवा दरिद्री माणसाला गृहयुक्त आणि ऐश्वर्यसंपन्न करता. ज्याप्रमाणे धूळ उडवली जाते त्याप्रमाणे शत्रूंच्या सैन्याला विखरून टाकणाऱ्या, हातात वज्र धारण करणाऱ्या हे इंद्रदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना ऐश्वर्य आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती. ॥१३॥

अयं चक्रमिषणत्सूर्यस्य न्येतशं रीरमत्ससृमाणम् ।
आ कृष्ण ईं जुहुराणो जिघर्ति त्वचो बुध्ने रजसो अस्य योनौ ॥१४॥

इंद्रदेवांनी सूर्यदेवांचे (काल)चक्र वेगाने फिरविले आणि वेगाने धावणाऱ्या 'एतश' नावाच्या सूर्यदेवांच्या अश्वाला नियंत्रित केले. इंद्रदेव कुटिल मार्गाने जाणाऱ्या आकाशातील कृष्ण (अंध:कारमय) शक्तीचा नाश करतात आणि पृथ्वीवर जलाने सिंचन करतात ॥१४॥
(पौराणिक कथांनुसार, एकदा सूर्यादेवांचा अश्व (एतश) खूप वेगाने धावू लागला, ज्यामुळे सृष्टीचे संतुलन बिघडण्याची शक्यता होती. तेव्हा इंद्रदेवांनी आपल्या शक्तीने त्याला थोपवून धरले किंवा योग्य गती दिली.)

असिक्न्यां यजमानो न होता ॥१५॥
असिक्नी (नदीच्या तीरावर) यज्ञकर्ता हा 'होता' (पुरोहित) नसतो. ॥१५॥
(ऋग्वेद काळात चिनाब नदीला 'असिक्नी' म्हटले जाई)

गव्यन्त इन्द्रं सख्याय विप्रा अश्वायन्तो वृषणं वाजयन्तः ।
जनीयन्तो जनिदामक्षितोतिमा च्यावयामोऽवते न कोशम् ॥१६ ॥
आम्ही विद्वान यज्ञकर्ते भक्तगण गायी, अश्व आणि सुख देणाऱ्या पत्नीची इच्छा करत मैत्रीसाठी सामर्थ्यशील इंद्रदेवांचे आवाहन करत आहोत. ज्याप्रमाणे एखादा माणूस तहान भागवण्यासाठी विहिरीतून पाण्याचा हंडा उपसतो, त्याचप्रमाणे आम्ही अक्षय संरक्षण देणाऱ्या आणि कुटुंबाला सुख देणाऱ्या इंद्रदेवांना आमच्याकडे बोलावत आहोत. ॥१६ ॥

त्राता नो बोधि ददृशान आपिरभिख्याता मर्डिता सोम्यानाम् ।
सखा पिता पितृतमः पितॄणां कर्तेमु लोकमुशते वयोधाः ॥१७ ॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे आपण रक्षक, सन्मार्ग दाखवणारे, वारंवार दर्शन देणारे सखा आहात. आपण सज्जनांना आनंद देणारे, उपदेश करणारे आहात. आपण आमचे मित्र, पिता आणि सर्व पूर्वजांमध्ये श्रेष्ठ पूर्वज

असून जगाचे निर्माते म्हणून भक्तांच्या इच्छा कराव्यात आणि आम्हाला सामर्थ्य व दीर्घ आयुष्य प्रदान करावे ही विनंती. ॥१७॥

सखीयतामविता बोधि सखा गृणान इन्द्र स्तुवते वयो धाः ।
वयं ह्या ते चकृमा सबाध आभिः शमीभिर्महयन्त इन्द्र ॥१८॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तुती श्रवण करून प्रसन्न होऊन आम्हाला आपली मैत्री मिळो. आपण आमचे रक्षण करावे, आम्हाला सामर्थ्य आणि शक्ती प्रदान करावी ही विनंती. पीडित अवस्थेत असूनही आम्ही भक्तगण आपली स्तुती आणि उपासना करतो. ॥१८॥

स्तुत इन्द्रो मघवा यद्ध वृत्रा भूरीण्येको अप्रतीनि हन्ति ।
अस्य प्रियो जरिता यस्य शर्मन्नकिर्देवा वारयन्ते न मर्ताः ॥१९॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची स्तुतियुक्त स्तोत्रे श्रवण करून ऐश्वर्यवान इंद्रदेवांनी आपल्या अजेय शक्तीने वृत्रासुराचा नाश केला, त्यामुळे स्तुती करणारे भक्त इंद्रदेवांना अत्यंत प्रिय होतात. अशा भक्तगणांना इंद्रदेवांनी दिलेल्या संरक्षणामुळे कोणीही कोणतीही बाधा करू शकत नाही. ॥१९॥

एवा न इन्द्रो मघवा विरप्शी करत्सत्या चर्षणीधृदनर्वा ।
त्वं राजा जनुषां धेह्यस्मे अधि श्रवो माहिनं यज्जरित्रे ॥२०॥
ऐश्वर्यवान, अत्यंत शक्तिशाली, प्रजेचे पालक आणि अजेय
असे इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे सत्य विचार सफल करोत. हे इंद्रदेवा ! आपण सर्व मनुष्यांचे राजे आहात, आपण स्तुती करणाऱ्या भक्तगणांना महान आणि श्रेष्ठ यश, कीर्ती प्रदान करावी ही विनंती. ॥२० ॥.

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।

अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥२१॥

हे इंद्रदेवा ! आपली स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना नद्या ज्याप्रमाणे काठोकाठ भरून वाहतात, त्याप्रमाणे आपण अन्न आणि समृद्धीने पूर्णतः तृप्त करावे ही विनंती. आम्ही भक्तगणांनी आपल्यासाठी नवीन स्तोत्रे रचली आहेत. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या बुद्धीच्या आणि कर्माच्या जोरावर आम्ही सदैव विजयी आणि समृद्ध होऊ. ॥२१॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१८

ऋषि- वामदेव गौतम , **देवता** – इंद्र-अदिति-वामदेव संवाद । **छन्द** त्रिष्टुप्

अयं पन्था अनुवित्तः पुराणो यतो देवा उदजायन्त विश्वे ।
अतश्चिदा जनिषीष्ट प्रवृद्धो मा मातरममुया पत्तवे कः ॥१॥
इंद्रदेव म्हणतात, " वामदेवा, गर्भातून जन्म घेण्याचा मार्ग पारंपरिक आणि शाश्वत आहे. सर्व देव आणि मानव याच मार्गाने उत्पन्न झाले आहेत. गर्भात वाढला आहेस तो तू सुद्धा याच मार्गाने जन्म घे. दुसरा मार्ग स्वीकारू नकोस आणि तुझ्या आईच्या मृत्यूला कारणीभूत होऊ नकोस." ॥१॥

नाहमतो निरया दुर्गहैतत्तिरश्चता पार्श्वान्निर्गमाणि ।
बहूनि मे अकृता कर्त्वानि युध्यै त्वेन सं त्वेन पृच्छै ॥२॥
वामदेव म्हणतात, "हे इंद्रदेवा ! मी अशा अत्यंत कठीण आणि संकटाच्या मार्गातून जन्माला येणार नाही. मी आडव्या मार्गाने का म्हणून बाहेर पडावे? मला अजून बरीच अपूर्ण कार्य पूर्ण करायची आहेत. शत्रूंशी किंवा अडचणीशी लढण्यासाठी विचार जाणून घ्यायचे आहेत. " ॥२॥

परायतीं मातरमन्वचष्ट न नानु गान्यनु नू गमानि ।
त्वष्टुर्गृहे अपिबत्सोममिन्द्रः शतधन्यं चम्वोः सुतस्य ॥३॥
वामदेव म्हणतात, “ पारंपारिक मार्गाने जन्म न घेणाऱ्या, दुसऱ्या मार्गाने जन्म घेणाऱ्या इंद्रदेवांनी दूर जाणाऱ्या (परायती) आदिती मातेकडे पाहिले. इंद्रदेवांनी त्वष्टादेवांच्या घरी जाऊन, दोन पात्रांमध्ये गाळून तयार ठेवलेला आणि अत्यंत समृद्धी देणारा असा सोमरस प्राशन केला आणि स्वसामर्थ्याने सर्वत्र जाण्यास समर्थ झाले. ” ॥३॥

किं स ऋधक्कृणवद्यं सहस्रं मासो जभार शरदश्च पूर्वीः ।
नही न्वस्य प्रतिमानमस्त्यन्तर्जातेषूत ये जनित्वाः ॥४ ॥
आदितीदेवतेने इंद्रदेवांना हजारो महिने आणि अनेक वर्षे गर्भात धारण केले. वामदेवांनी विचारले, "इंद्रदेवांनी हे नियमाविरुद्ध कार्य का केले ?" त्यावर आदितीदेवता म्हणाल्या, "हे वामदेवा! जे कोणी जन्माला आले आहेत किंवा भविष्यात जन्माला येतील, त्यांपैकी कोणीही इंद्रदेवांच्या बरोबरीचा नाही." ॥४॥

अवद्यमिव मन्यमाना गुहाकरिन्द्रं माता वीर्येणा न्यृष्टम् ।
अथोदस्थात्स्वयमत्कं वसान आ रोदसी अपृणाज्जायमानः ॥५॥
इंद्रदेवाचा जन्म ही एक निंदनीय गोष्ट आहे असे समजणाऱ्या आदिती मातेने इंद्रदेवांना गुप्त ठिकाणी ठेवले, परंतु इंद्रदेव जन्माला येताच स्वतःचे तेजोमय कवच परिधान करून उभे राहिले आणि जन्मानंतर लगेचच इंद्रदेवांनी पृथ्वीला आणि आकाशाला व्यापून टाकले ॥५ ॥

एता अर्षन्त्यललाभवन्तीऋतावरीरिव संक्रोशमानाः ।
एता वि पृच्छ किमिदं भनन्ति कमापो अद्रिं परिधिं रुजन्ति ॥६॥
सत्याचे पालन करणाऱ्या नद्या एकत्रितपणेअलला (खळखळ) असा आवाज करत, (अलला-भवन्तीः) इंद्रदेवांच्या महानतेची गर्जना करत वेगाने धावत आहेत. हे वामदेवा ! त्या नद्यांना आपण विचारावे त्या नक्की काय म्हणत आहेत? इंद्रदेवांनी पाणी अडवून ठेवणाऱ्या ढगांना विदिर्ण केले, त्याचे या नद्या वर्णन करत आहेत का? ॥६॥

किमु ष्विदस्मै निविदो भनन्तेन्द्रस्यावद्यं दिधिषन्त आपः ।
ममैतान्पुत्रो महता वधेन वृत्रं जघन्वाँ असृजद्वि सिन्धून् ॥७॥

आदितीदेवता म्हणतात," माझ्या मुलासाठी इंद्रदेवांसाठी विद्वान कोणती स्तुतियुक्त वचने म्हणत आहेत? माझ्या मुलाच्या इंद्रदेवांच्या कोणत्या दोषांबद्दल जलदेवता विचारत आहेत? माझ्या या पुत्राने, इंद्रदेवाने, आपल्या महान शस्त्राने, वज्राने वृत्रासुराचा वध करून, त्याने अडवून धरलेल्या नद्यांना प्रवाहित होण्यासाठी मुक्त केले आहे." ॥७॥

ममच्चन त्वा युवतिः परास ममच्चन त्वा कुषवा जगार ।
ममच्चिदापः शिशवे ममृड्युर्ममच्चिदिन्द्रः सहसोदतिष्ठत् ॥८॥
वामदेव म्हणतात, " हे इंद्रदेवा ! आपल्या युवती मातेने आपल्याला जन्म देऊन आपला त्याग केला. कुषवा नावाच्या नदीने आपल्याला गिळून आश्रय दिला. आपण बाल्य अवस्थेत असताना नदीच्या पाण्याने आपल्याला सुख दिले आणि शेवटी आपण आपल्या अंगभूत बळानेच समर्थपणे वर उठून उभे राहिलात. ॥८॥
अनेकांच्या मते 'कुषवा' ही एक प्राचीन नदी आहे काही भाष्यकारांच्या मते 'कुषवा' ही एक राक्षसी आहे.

ममच्चन ते मघवन्व्यंसो निविविध्वाँ अप हनू जघान ।
अधा निविद्ध उत्तरो बभूवाञ्छिरो दासस्य सं पिणग्वधेन ॥९ ॥
वामदेव म्हणतात, " हे ऐश्वर्यवान इंद्रदेवा ! जेव्हा व्यंस नावाच्या राक्षसाने उन्मत्त होऊन आपल्यावर आक्रमण केले आणि आपल्या हनुवटीवर प्रहार केला तेव्हा आपण अधिक शक्तिशाली झालात . त्यानंतर आपण आपल्या वज्राने व्यंस राक्षसाचे शिर धडापासून वेगळे केलेत. " ॥९॥

गृष्टिः ससूव स्थविरं तवागामनाधृष्यं वृषभं तुग्रमिन्द्रम् ।
अरीळ्हं वत्सं चरथाय माता स्वयं गातुं तन्व इच्छमानम् ॥१० ॥

वामदेव म्हणतात," ज्याप्रमाणे एकदाच व्यालेली गाय (गृष्टि) एका बलिष्ठ वासराला जन्म देते, त्याचप्रमाणे माता अदितीदेवतेने अजेय, शक्तिमान, थोर आणि शत्रूंचा नाश करणाऱ्या इंद्रदेवांना जन्म दिला आहे. इंद्रदेव स्वतःच्या शरीराच्या हालचालीसाठी आणि स्वतःच्या मार्गावर जाण्यासाठी समर्थ असून तशी इच्छा बाळगणारे आहेत. " ॥१०॥

उत माता महिषमन्ववेनदमी त्वा जहति पुत्र देवाः ।
अथाब्रवीद्वृत्रमिन्द्रो हनिष्यन्त्सखे विष्णो वितरं वि क्रमस्व ॥११॥
माता अदिती देवतेने आपल्या सामर्थ्यवान पुत्राकडे, इंद्रदेवांकडे पाहून विचारले "हे पुत्रा! हे सर्व देव तुला सोडून जात आहेत." त्यानंतर वृत्रासुराचा वध करण्याच्या तयारीत असलेल्या इंद्रदेवाने म्हटले— 'हे मित्र विष्णुदेवा! तू तुझ्या पराक्रमाचा विस्तार कर. " ॥११॥

कस्ते मातरं विधवामचक्रच्छयुं कस्त्वामजिघांसच्चरन्तम् ।
कस्ते देवो अधि मार्डीक आसीद्यत्प्राक्षिणाः पितरं पादगृह्य ॥१२॥
वामदेव म्हणतात, हे इंद्रदेवा आपल्या मातेला कोणी विधवा केले ? आपल्या भूमीवर पडलेल्या पित्याला कोणी मारले? आपल्याला आनंद देणारे देव कोठे आहेत? आपल्याला इजा पोहोचवण्याची इच्छा कोणाला झाली?"॥१२ ॥

अवर्त्या शुन आन्त्राणि पेचे न देवेषु विविदे मर्डितारम् ।
अपश्यं जायाममहीयमानामधा मे श्येनो मध्वा जभार ॥१३॥
वामदेव म्हणतात, " अत्यंत गरिबी आणि भुकेमुळे व्याकुळ होऊन मी कुत्र्याची आतडी शिजवली. त्या संकटाच्या वेळी देवांमध्येही मला कोणी सांत्वन देणारा किंवा मदत करणारा भेटला नाही. मी माझ्या पत्नीला अन्नावाचून अपमानित आणि दुःखी अवस्थेत पाहिले. नंतर, श्येन पक्षी माझ्यासाठी मध घेऊन आला. " ॥१३ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-१९

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – इंद्र । **छन्द** त्रिष्टुप्

एवा त्वामिन्द्र वज्रिन्नत्र विश्वे देवासः सुहवास ऊमाः ।
महामुभे रोदसी वृद्धमृष्वं निरेकमिद्वृणते वृत्रहत्ये ॥१॥
हे वज्रधारी, स्तुतीस पात्र, अत्यंत पुण्यवान आणि सुंदर इंद्रदेवा ! सृष्टीच्या संरक्षक देवतांनी, संपूर्ण आकाश आणि पृथ्वी यांनी वृत्रासुराचा वध करण्यासाठी आपल्याला एकमेव नेता म्हणून निवडले आहे. ॥१॥

अवासृजन्त जिव्रयो न देवा भुवः सम्राळिन्द्र सत्ययोनिः ।
अहन्नहिं परिशयानमर्णः प्र वर्तनीररदो विश्वधेनाः ॥२ ॥
ज्याप्रमाणे एखादा पिता आपल्या मुलाला कार्य करण्यास प्रोत्साहन देतो, त्याप्रमाणे सत्याचे मूर्तिमंत रूप आणि विश्वाचे राजे असलेल्या हे इंद्रदेवा ! देवतांनी आपल्याला नद्यांचे पाणी अडवणाऱ्या अहिरूपी वृत्रासुराला वध करण्यास प्रोत्साहित केले. आपण वृत्रासुराचा वध करून सर्वांना आनंद देणाऱ्या नद्यांना प्रवाहित केले. ॥२ ॥

अतृप्णुवन्तं वियतमबुध्यमबुध्यमानं सुषुपाणमिन्द्र ।
सप्त प्रति प्रवत आशयानमहिं वज्रेण वि रिणा अपर्वन् ॥३ ॥
हे इंद्रदेवा ! सात नद्यांच्या प्रवाहात अडथळा बनून आडव्या पडलेल्या, कधीही तृप्त न होणाऱ्या, बुद्धिशून्य आणि गाढ झोपलेल्या त्या अहिरूपी राक्षसाचे, वृत्रासुराचे, आपल्या वज्राने शरीराचे तुकडे करून नष्ट केले. ॥३ ॥

अक्षोदयच्छवसा क्षाम बुध्नं वार्ण वातस्तविषीभिरिन्द्रः ।

दृळ्हान्यौभ्नादुशमान ओजोऽवाभिनत्ककुभः पर्वतानाम् ॥४॥
ज्याप्रमाणे वेगवान वारा आपल्या प्रचंड शक्तीने सर्वकाही हलवून सोडतो, त्याचप्रमाणे इंद्रदेवांनी आपल्या अफाट सामर्थ्याने, स्थिर असलेल्या पृथ्वीला विचलित केले. विजयाची इच्छा धरणाऱ्या इंद्रदेवांनी आपल्या तेजाने पर्वतांची सुदृढ आणि अभेद्य शिखरे फोडून काढली. ॥४॥

अभि प्र दद्रुर्जनयो न गर्भं रथा इव प्र ययुः साकमद्रयः ।
अतर्पयो विसृत उब्ज ऊर्मीन्त्वं वृताँ अरिणा इन्द्र सिन्धून् ॥५॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे माता आपल्या बालकाकडे वेगाने धावतात त्याप्रमाणे वेगाने रथावरून पर्वतांवरून जाणाऱ्या ढगांना आपण विदीर्ण केले आणि नद्यांच्या अडवलेल्या लाटांना मुक्त करून त्यांना प्रवाहित केले. ॥५॥

त्वं महीमवनिं विश्वधेनां तुर्वीतये वय्याय क्षरन्तीम् ।
अरमयो नमसैजदर्णः सुतरणाँ अकृणोरिन्द्र सिन्धून् ॥६॥
हे इंद्रदेवा ! आपण तुर्वीतिऋषींसाठी आणि वय्यऋषींसाठी सर्वांचे पोषण करणाऱ्या कामधेनूप्रमाणे असलेल्या या विशाल पृथ्वीला अन्नपाण्याने समृद्ध केले. आपण आपल्या शक्तीने नद्यांच्या गतिमान प्रवाहाला थांबविले आणि नद्यांना सुखद रीतीने पार करण्यायोग्य केले. ॥६॥

प्राग्रुवो नभन्वो न वक्वा ध्वस्रा अपिन्वद्युवतीऋतज्ञाः ।
धन्वान्यज्राँ अपृणक्तृषाणाँ अधोगिन्द्रः स्तर्यो दंसुपत्नीः ॥७॥
ज्याप्रमाणे वेगाने गर्जना करणाऱ्या वाहणाऱ्या नद्या अडथळ्यांना भेदून पुढे जातात, त्याचप्रमाणे वैश्विक नियमांचे पालन करणाऱ्या (ऋतज्ञाः) इंद्रदेवांनी वाळवंटे आणि कोरडी मैदाने पाण्याने भरून टाकली. ज्याप्रमाणे एखादी गाय

दूध देते, त्याचप्रमाणे इंद्रदेवांनी त्या अडवून धरलेल्या किंवा कोरड्या पडलेल्या 'दंसुपत्नी' नद्यांमध्ये पुन्हा एकदा जल प्रवाहित केले. ॥७॥
दंसुपत्नीः म्हणजे अशा नद्या ज्यांचा स्वामी किंवा रक्षक पराक्रमी इंद्रदेव आहेत.

पूर्वीरुषसः शरदश्च गूर्ता वृत्रं जघन्वाँ असृजद्वि सिन्धून् ।
परिष्ठिता अतृणद्बद्बधानाः सीरा इन्द्रः स्रवितवे पृथिव्या ॥८॥
अनेक वर्षे अंधारात अडकलेल्या उषादेवतेला इंद्रदेवांनी वृत्रासुराचा वध करून मुक्त केले. इंद्रदेवांनी वृत्रासुराचा वध करून, वृत्रासुराने पृथ्वीवर प्रवाहित होण्यासाठी ज्या नद्यांना रोखून ठेवले होते त्या नद्यांचे बंध फोडून त्या नद्यांना प्रवाहित केले. ॥८॥

वम्रीभिः पुत्रमग्रुवो अदानं निवेशनाद्धरिव आ जभर्थ ।
व्यन्धो अख्यदहिमाददानो निर्भूदुखच्छित्समरन्त पर्व ॥९॥
हे हरि नावाच्या अश्वांवर अरुढ होणाऱ्या इंद्रदेवा ! जिला कोणी वाली नाही अशा स्त्रीच्या (अग्रुवः) असुरक्षित, ज्याला मुंग्यांनी (वम्रीभिः)खाण्यासाठी वेढले होते,अशा पुत्राला आपण संकटातून सुरक्षितपणे बाहेर काढले. तो अंधपुत्र पाहू लागला, त्याचे अवयव खंडित झाले होते ते पुन्हा सांधले गेले आणि तो सुखरूपपणे संकटातून बाहेर आला. ॥९॥

प्र ते पूर्वाणि करणानि विप्राविद्वाँ आह विदुषे करांसि ।
यथायथा वृष्ण्यानि स्वगूर्तापांसि राजन्नर्याविवेषीः ॥१०॥
हे ज्ञानी आणि सर्वज्ञ राजा इंद्रदेवा ! एक विद्वान(वामदेव) दुसऱ्या विद्वानाला आपल्या प्राचीन आणि महान कार्याचे कथन करीत आहे. आपण ज्या प्रकारे

आपल्या पराक्रमी इच्छेने ही सर्व कर्मे साध्य केली आहेत त्याचे वर्णन विद्वान करत आहेत. ॥१० ॥

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।
अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥११॥
हे इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या स्तुतीचा स्वीकार करून, ज्याप्रमाणे नद्या पाणी भरून वाहतात, त्याप्रमाणे आम्हाला अन्नाने आणि समृद्धीने परिपूर्ण करावे ही विनंती सुवर्ण रंगाचे हरि नावाचे अश्व असलेल्या हे इंद्रदेवा! आम्ही ही नवीन स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत. आम्ही आमच्या बुद्धीने आणि कर्माने नेहमी विजयी आणि शत्रूंना पराभूत करणारे होऊ शकू. ॥११ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२०

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – इंद्र । **छन्द** त्रिष्टुप्

आ न इन्द्रो दूरादा न आसादभिष्टिकृदवसे यासदुग्रः ।
ओजिष्ठेभिर्नृपतिर्वज्रबाहुः संगे समत्सु तुर्वणिः पृतन्यून् ॥१॥
इच्छा पूर्ण करणारे, शक्तिशाली, वज्रधारी, वीरांचे स्वामी, प्रजेचे रक्षक तेजस्वी इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या रक्षणासाठी आपल्या अत्यंत ओजस्वी शक्तिनिशी युद्धामध्ये आक्रमण करणाऱ्या शत्रूंचा पराभव करण्यासाठी दुरून किंवा जवळून येवोत. ॥१॥

आ न इन्द्रो हरिभिर्यात्वच्छार्वाचीनोऽवसे राधसे च ।
तिष्ठाति वज्री मघवा विरप्शीमं यज्ञमनु नो वाजसातौ ॥२॥
वज्र धारण करणारे, ऐश्वर्यसंपन्न आणि अत्यंत सामर्थ्यवान इंद्रदेव, आपल्या 'हरी' नावाच्या घोड्यांवर स्वार होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या रक्षणासाठी आणि धनप्राप्तीसाठी आमच्याकडे येवोत. हे इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे लक्ष देऊन अन्नाच्या आणि विजयाच्या प्राप्तीसाठी चाललेल्या या यज्ञात विराजमान व्हावे ही विनंती. ॥२॥

इमं यज्ञं त्वमस्माकमिन्द्र पुरो दधत्सनिष्यसि क्रतुं नः ।
श्वघ्नीव वज्रिन्त्सनये धनानां त्वया वयमर्य आजिं जयेम ॥३॥
हे वज्रधारी इंद्रदेवा! आपण आमच्या यज्ञामध्ये सहभागी होऊन आमच्या यज्ञाचा संकल्प सिद्धीस न्यावा ही विनंती. ज्याप्रमाणे एक कुशल शिकारी आपले सावज गाठतो, त्याप्रमाणे आपल्या सहाय्याने धनाच्या प्राप्तीसाठी

चाललेल्या या जीवनाच्या युद्धात आम्ही आमच्या शत्रूंवर विजय मिळवू शकू. ॥३ ॥

उशन्नु षु णः सुमना उपाके सोमस्य नु सुषुतस्य स्वधावः ।
पा इन्द्र प्रतिभृतस्य मध्वः समन्धसा ममदः पृष्ठ्येन ॥४ ॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर प्रसन्न होऊन सोमरसाच्या प्राशन करण्याची इच्छा बाळगून आपण आमच्याजवळ यावे. आमच्या द्वारे उत्तम रीतीने सिद्ध केलेला आणि आपल्याला अर्पण केलेला मधुर सोमरस प्राशन करून आपण पूर्णपणे तृप्त व हर्षित व्हावे ही विनंती. ॥४॥

वि यो ररप्श ऋषिभिर्नवेभिर्वृक्षो न पक्वः सृण्यो न जेता ।
मर्यो न योषामभि मन्यमानोऽच्छा विवक्मि पुरुहूतमिन्द्रम् ॥५ ॥
ज्या इंद्रदेवांची नवीन ऋषींकडून स्तुती केली जाते, जो पिकलेल्या फळाने लगडलेल्या वृक्षासारखा देणारा आहे, जो विळयाने धान्य कापणाऱ्या जेत्याप्रमाणे शत्रूंचा नाश करणारा आहे, अशा इंद्रदेवांची, ज्याप्रमाणे एखादा तरुण प्रेमी पुरुष आपल्या प्रिय स्त्रीकडे ओढला जातो, त्याचप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अनेक लोकांकडून आवाहन केलेल्या इंद्रदेवांची स्तुती करण्यासाठी धावतो. ॥५॥

गिरिर्न यः स्वतवाँ ऋष्व इन्द्रः सनादेव सहसे जात उग्रः ।
आदर्ता वज्रं स्थविरं न भीम उद्नेव कोशं वसुना न्यृष्टम् ॥६ ॥
पर्वताप्रमाणे विशाल, महान आणि सामर्थ्याने युक्त, अनादि काळापासून शत्रूंना पराभूत करण्यासाठी उग्ररूपाने प्रकट झालेले इंद्रदेव, ज्याप्रमाणे एखादा पुरुष धनाने आणि रत्नांनी पूर्णपणे भरलेला खजिना आपल्या हातात घेतो त्याप्रमाणे शक्तिशाली वज्राला हातात घेतात. ॥६॥

न यस्य वर्ता जनुषा न्वस्ति न राधस आमरीता मघस्य ।
उद्वावृषाणस्तविषीव उग्रास्मभ्यं दद्धि पुरुहूत रायः ॥७ ॥
हे इंद्रदेवा ! आपल्या जन्मापासून आपल्याला कोणीही अडवू शकलेले नाही. आपल्या दानाचा अपहार कोणीही करू शकत नाही. हे शक्तिशाली आणि पराक्रमी इंद्रदेवा! आपण आपल्या सामर्थ्याने वृद्धिंगत झाला आहात. हे अनेकांनी आवाहन केलेल्या पुरुहूत इंद्रदेवा आपण आम्हाला संपत्ती प्रदान करावी ही विनंती. ॥७॥

ईक्षे रायः क्षयस्य चर्षणीनामुत व्रजमपवर्तासि गोनाम् ।
शिक्षानरः समिथेषु प्रहावान्वस्वो राशिमभिनेतासि भूरिम् ॥८ ॥
हे इंद्रदेवा ! आपण भक्तगणांच्या मालमत्तेचे आणि निवासस्थानाचे नियंत्रण करता. शत्रूंनी, राक्षसांनी कैदेत ठेवलेल्या गायींची आपण सुटका करता. पराक्रमी पृथ्वीवर राज्य करणाऱ्या प्रजेवर युद्धामध्ये शत्रूंना जिंकणाऱ्या हे इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना विपुल संपत्ती प्रदान करावी ही विनंती. ॥८॥

कया तच्छृण्वे शच्या शचिष्ठो यया कृणोति मुहु का चिदृष्वः ।
पुरु दाशुषे विचयिष्ठो अंहोऽथा दधाति द्रविणं जरित्रे ॥९॥
सर्वात सामर्थ्यवान इंद्रदेव वारंवार महान आणि अद्भुत कार्य करणाऱ्या साठी कोणत्या शक्ती प्राप्त करतात ? इंद्रदेव आपल्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या पापांचा नाश करतात आणि स्तुती करणाऱ्या भक्तगणांवर संपत्तीचा वर्षाव करतात. ॥९ ॥

मा नो मर्धीरा भरा दद्धि तन्नः प्र दाशुषे दातवे भूरि यत्ते ।
नव्ये देष्णे शस्ते अस्मिन्त उक्थे प्र ब्रवाम वयमिन्द्र स्तुवन्तः ॥१० ॥

हे इंद्रदेवा !आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना दुर्लक्षित न करता आपल्याकडे असलेले अमाप धन आणि वैभव आम्हा दानशूर भक्तगणांना प्रदान करावे ही विनंती. हे इंद्रदेवा आम्ही यज्ञकर्ते भक्तगण या नवीन आणि उत्तम स्तोत्रांद्वारे आपली स्तुती करत आहोत. ॥१०॥

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।
अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥११॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या स्तुतीचा स्वीकार करून, ज्याप्रमाणे नद्या पाणी भरून वाहतात, त्याप्रमाणे आम्हाला अन्नाने आणि समृद्धीने परिपूर्ण करावे ही विनंती. सुवर्ण रंगाचे हरि नावाचे अश्व असलेल्या हे इंद्रदेवा आम्ही ही नवीन स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत. आम्ही आमच्या बुद्धीने आणि कर्माने नेहमी विजयी आणि शत्रूंना पराभूत करणारे होऊ शकू. ॥११ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२१

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – इंद्र । **छन्द** त्रिष्टुप्

आ यात्विन्द्रोऽवस उप न इह स्तुतः सधमादस्तु शूरः ।
वावृधानस्तविषीर्यस्य पूर्वीर्द्यौर्न क्षत्रमभिभूति पुष्यात् ॥१॥
ज्याची स्तुती केली गेली आहे असे इंद्रदेव आमच्या रक्षणासाठी आमच्या यज्ञस्थळी सहभागी होऊन प्रसन्न होवोत. प्राचीन आणि आकाशाप्रमाणे प्रचंड सामर्थ्य असलेले इंद्रदेव, शत्रूंचा पराभव करणाऱ्या तेजाला सतत वृद्धिंगत करोत. ॥१॥

तस्येदिह स्तवथ वृष्ण्यानि तुविद्युम्नस्य तुविराधसो नॄन् ।
यस्य क्रतुर्विदथ्यो न सम्राट् साह्वान्तरुत्रो अभ्यस्ति कृष्टीः ॥२॥
यज्ञकर्त्या भक्तगणांनो अत्यंत तेजस्वी, विपुल धन देणाऱ्या आणि वीर पुरुषांचे नेतृत्व करणाऱ्या इंद्रदेवांच्या पराक्रमाची या यज्ञस्थळी तुम्ही स्तुती करावी. ज्यांचा यज्ञाचा संकल्प आदरणीय आहे, जे एखाद्या सम्राटाप्रमाणे पराक्रमी असून आपल्या शत्रूंचा पराभव करतात, आणि जे सर्व संकटातून तारुन नेतात असे इंद्रदेव सर्वश्रेष्ठ आहेत. ॥२॥

आ यात्विन्द्रो दिव आ पृथिव्या मक्षू समुद्रादुत वा पुरीषात् ।
स्वर्णरादवसे नो मरुत्वान्परावतो वा सदनादृतस्य ॥३॥
आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या रक्षणासाठी, इंद्रदेवांनी मरुद्गणांच्या सोबत, स्वर्गातून किंवा पृथ्वीवरून, अवकाशातून किंवा जलातून, सूर्याच्या प्रकाशमान लोकातून किंवा सत्याच्या स्थानावरून, दूरच्या ठिकाणांहून किंवा ढगांसारख्या जलमय ठिकाणांहून त्वरित यावे ही विनंती. ॥३॥.

स्थूरस्य रायो बृहतो य ईशे तमु ष्टवाम विदथेष्विन्द्रम् ।
यो वायुना जयति गोमतीषु प्र धृष्णुया नयति वस्यो अच्छ ॥४॥
विशाल आणि महान संपत्तीचे स्वामी, मरुद्गणांच्या मदतीने गायींनी समृद्ध असलेल्या प्रदेशावर विजय मिळवणाऱ्या, भक्तगणांना अधिक चांगल्या समृद्धस्थितीकडे घेऊन जाणाऱ्या इंद्रदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण प्रार्थना करतो. ॥४॥

उप यो नमो नमसि स्तभायन्नियर्ति वाचं जनयन्यजध्यै ।
ऋञ्जसानः पुरुवार उक्थैरेन्द्रं कृण्वीत सदनेषु होता ॥५॥
नतमस्तक होण्यास योग्य, यज्ञस्थळी देवतांना आणणाऱ्या, यज्ञासाठी शब्दांना उत्पन्न करणाऱ्या, सर्वांना आधार देणाऱ्या, अनेकांनी वंदिलेल्या आणि स्तोत्रांनी प्रसन्न होणाऱ्या, मुख्य पौरोहीत्य करणाऱ्या अग्निदेवांचे आम्ही भक्तगण आवाहन करतो. ॥५॥

धिषा यदि धिषण्यन्तः सरण्यान्त्सदन्तो अद्रिमौशिजस्य गोहे ।
आ दुरोषाः पास्त्यस्य होता यो नो महान्त्संवरणेषु वह्निः ॥६॥
जेव्हा उशिज वंशजाच्या (औशिजस्य) गुप्त स्थानी (गोहे) पाषाणाच्या (अद्रिम्)निवासस्थानी बुद्धीने प्रेरित होऊन प्रवाहित (सरण्यान्) होणाऱ्या तुपाच्या धारांसह, भक्तगण स्तुती करत असतात तेव्हा घरांचा रक्षक असलेले, दुष्ट प्रवृत्तीचा नाश करणारे (दुरोषाः) अग्निदेव प्रकट होतात. ॥६॥

सत्रा यदीं भार्वरस्य वृष्णः सिषक्ति शुष्मः स्तुवते भराय ।
गुहा यदीमौशिजस्य गोहे प्र यद्धिये प्रायसे मदाय ॥ ॥७॥

जेव्हा त्या सामर्थ्यशाली आणि बलवान इंद्रदेवांचे तेज स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्ताला युद्धातील विजयासाठी प्राप्त होते तेव्हा तो भक्त खरोखरच सामर्थ्यवान होतो. उशिज ऋषींच्या वंशजाच्या पुत्राच्या हृदयात ही बुद्धी प्रेरित केली जाते, तेव्हा ती बुद्धी महान आनंदासाठी आणि तृप्तीसाठी कारणीभूत ठरते. ॥७॥

वि यद्वरांसि पर्वतस्य वृण्वे पयोभिर्जिन्वे अपां जवांसि ।
विदद्गौरस्य गवयस्य गोहे यदी वाजाय सुध्यो वहन्ति ॥८॥
जेव्हा इंद्रदेव पर्वतांचे द्वार उघडतात तेव्हा जलाचा प्रवाह सर्वांना तृप्त करत वेगाने वाहू लागतो. जेव्हा उत्तम बुद्धी असलेले भक्तगण शक्ती मिळवण्यासाठी यज्ञामध्ये आहुती अर्पण करतात तेव्हा त्यांना गुहेत लपलेल्या गौर आणि गवय नावाचे प्राणी मिळतात. ॥८॥

भद्रा ते हस्ता सुकृतोत पाणी प्रयन्तारा स्तुवते राध इन्द्र ।
का ते निषत्तिः किमु नो ममत्सि किं नोदुदु हर्षसे दातवा उ ॥९॥
हे इंद्रदेवा ! आपले दोन्ही हात अत्यंत कल्याणकारी आणि कुशल आहेत. आपण स्तुती करणाऱ्या भक्तगणांना ऐश्वर्य आणि धन अर्पण करण्यासाठी नेहमी सज्ज असता तरी आपण शांतता का बसता? आपण आम्हा भक्तगणांना आनंद का देत नाही ? आपण आम्हा भक्तगणांना दया करून धन का देत नाही? ॥९॥

एवा वस्व इन्द्रः सत्यः सम्राड्ढन्ता वृत्रं वरिवः पूरवे कः ।
पुरुष्टुत क्रत्वा नः शग्धि रायो भक्षीय तेऽवसो दैव्यस्य ॥१०॥
ऐश्वर्याचा स्वामी, सत्यस्वरूप आणि सर्वांचा अधिपती असलेल्या इंद्रदेवांनी वृत्रासुराचा नाश करून मानवांसाठी सुखाचा मार्ग मोकळा केला. अनेकांनी

स्तुती केलेल्या इंद्रदेवा ! आपल्या सामर्थ्याने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना धनाढ्य करावे जेणेकरुन आम्ही त्याचा उपभोग घेऊ. ॥१०॥

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।
अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥११॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या स्तुतीचा स्वीकार करून, ज्याप्रमाणे नद्या पाणी भरून वाहतात, त्याप्रमाणे आम्हाला अन्नाने आणि समृद्धीने परिपूर्ण करावे ही विनंती. सुवर्ण रंगाचे हरि नावाचे अश्व असलेल्या हे इंद्रदेवा आम्ही ही नवीन स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत. आम्ही आमच्या बुद्धीने आणि कर्माने नेहमी विजयी आणि शत्रूंना पराभूत करणारे होऊ शकू ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२२

ऋषि- वामदेव गौतम , **देवता** – इंद्र । **छन्द** त्रिष्टुप्

यन्न इन्द्रो जुजुषे यच्च वष्टि तन्नो महान्करति शुष्म्या चित् ।
ब्रह्म स्तोमं मघवा सोममुक्था यो अश्मानं शवसा बिभ्रदेति ॥१॥
हे महान, पराक्रमी इंद्रदेवा ! आपण इच्छा केलेल्या हविष्यान्नाच्या आहुती आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला अर्पण करतो. त्याचा आपण आनंदाने स्वीकार करता. वज्रधारी, मघवन इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेली आहुती, सोमरस आणि ऋचांच्या समूहाचा (उक्था) स्वीकार करतात. ॥१॥

वृषा वृषन्धिं चतुरश्रिमस्यन्नुग्रो बाहुभ्यां नृतमः शचीवान् ।
श्रिये परुष्णीमुषमाण ऊर्णां यस्याः पर्वाणि सख्याय विव्ये ॥२ ॥
शक्तिशाली आणि कर्मांनी युक्त, उग्र इंद्रदेव आपल्या दोन्ही हातांनी चार धारा असलेले वज्र फेकत शत्रूंवर प्रहार करतात. इंद्रदेवांनी मैत्रीखातर परुष्णी (रावी नदी) नदीच्या लोकरीसारख्या शुभ्र प्रवाहाचा स्वीकार केला. ॥२ ॥

यो देवो देवतमो जायमानो महो वाजेभिर्महद्भिश्च शुष्मैः ।
दधानो वज्रं बाह्वोरुशन्तं द्याममेन रेजयत्प्र भूम ॥३ ॥
देवतांमध्ये श्रेष्ठ, दिव्यशक्ती असलेल्या इंद्रदेवांना , जन्माला येताच महान सामर्थ्य आणि युद्धातील पराक्रमाचे वरदान लाभले. दोन्ही भुजांमध्ये शत्रूंचे नाश करणारे वज्र धारण करणाऱ्या इंद्रदेवांनी आपल्या प्रचंड शक्तीने पृथ्वी आणि आकाश या दोघांनाही थरकापून सोडले. ॥३॥

विश्वा रोधांसि प्रवतश्च पूर्वीर्द्यौर्ऋष्वाज्जनिमन्रेजत क्षाः ।
आ मातरा भरति शुष्म्या गोर्नृवत्परिज्मन्नोनुवन्त वाताः ॥४॥
इंद्रदेवांच्या जन्मामुळे सर्व पर्वत, नद्या,विस्तीर्ण आकाश तसेच पृथ्वी थरथर कापू लागले. इंद्रदेव, सूर्यदेवांचे माता पिता असलेल्या पृथ्वी आणि आकाश या दोघांनाही व्यापून टाकतात. इंद्रदेवाच्या प्रेरणेने वायुदेव माणसाप्रमाणे आवाज काढत सर्वत्र संचार करतात. ॥४॥

ता तू त इन्द्र महतो महानि विश्वेष्वित्सवनेषु प्रवाच्या ।
यच्छूर धृष्णो धृषता दधृष्वानहिं वज्रेण शवसाविवेषीः ॥५ ॥
हे शूर आणि निर्भय इंद्रदेवा ! आपली ती महान कृत्ये आणि पराक्रम सर्व यज्ञामध्ये स्तुती करण्यास निश्चित योग्य आहेत. हे धाडसी इंद्रदेवा ! आपण अत्यंत पराक्रमाने आणि प्रचंड सामर्थ्याने वज्राच्या प्रहाराने अही नावाच्या राक्षसाचा नाश केला. ॥५॥

ता तू ते सत्या तुविनृम्ण विश्वा प्र धेनवः सिस्रते वृष्ण ऊध्नः ।
अधा ह त्वद्वृषमणो भियानाः प्र सिन्धवो जवसा चक्रमन्त ॥६ ॥
हे अत्यंत पराक्रमी (तुविनृम्ण) इंद्रदेवा ! आपले सर्व पराक्रम निश्चितच सत्य आहेत. आपल्या वर्षाव करण्याच्या शक्तीमुळे सर्व जलप्रवाह गायींप्रमाणे मुक्तपणे वाहू लागले. आपल्या प्रभावामुळे सर्व नद्या अत्यंत वेगाने मार्गक्रमण करू लागल्या. ॥६॥

अत्राह ते हरिवस्ता उ देवीरवोभिरिन्द्र स्तवन्त स्वसारः ।
यत्सीमनु प्र मुचो बद्बधाना दीर्घामनु प्रसितिं स्यन्दयध्यै ॥७ ॥

हरी नावाच्या अश्वाचे स्वामी (हरिवस्तः) इंद्रदेवा ! जेव्हा आपण जखडलेल्या नद्यांना बंधनातून मुक्त केलेत तेव्हा त्या दैवी भगिनी आपल्या रक्षणाची स्तुती करत त्या पृथ्वीवर लांबवर आणि मोकळेपणी वाहू लागल्या. ॥७॥

पिपीळे अंशुर्मद्यो न सिन्धुरा त्वा शमी शशमानस्य शक्तिः ।
अस्मद्र्यक्छुशुचानस्य यम्या आशुर्न रश्मिं तुव्योजसं गोः ॥८॥
हे तेजस्वी अग्निदेवा! स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे यज्ञकार्य समुद्राच्या अथांग प्रवाहाप्रमाणे आपल्यापर्यंत पोहोचो. अत्यंत दैदीप्यमान अशा आपल्या तेजाचे किरण, वेगाने धावणाऱ्या घोड्यांप्रमाणे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांपर्यंत पोहोचवावे ही विनंती. ॥८॥

अस्मे वर्षिष्ठा कृणुहि ज्येष्ठा नृम्णानि सत्रा सहुरे सहांसि ।
अस्मभ्यं वृत्रा सुहनानि रन्धि जहि वधर्वनुषो मर्त्यस्य ॥९॥
सहन करण्याची शक्ती असलेल्या हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सर्वोत्तम आणि अत्याधुनिक सामर्थ्य प्रदान करावे ही विनंती. त्यामुळे आम्ही भक्तगण आमच्या शत्रूंना सहज जिंकू शकू. आम्ही, आम्हाला मारण्याची इच्छा बाळगणाऱ्या शत्रूंना नमवू शकू आणि त्यांच्या हिंसक शस्त्रांचा नाश करू शकू. ॥९॥

अस्माकमित्सु शृणुहि त्वमिन्द्रास्मभ्यं चित्राँ उप माहि वाजान् ।
अस्मभ्यं विश्वा इषणः पुरंधीरस्माकं सु मघवन्बोधि गोदाः ॥१०॥
हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या प्रार्थना ऐकून आम्हाला विविध प्रकारचे अन्न आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती. आम्हाला प्रेरणा देणारी बुद्धी प्रदान करावी ही विनंती. हे मघवन इंद्रदेवा ! आपण आम्हाला गायी आणि ऐश्वर्य प्रदान करून आमच्यावर प्रसन्न व्हावे ही विनंती. ॥१०॥

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।
अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥११ ॥
हे इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या स्तुतीचा स्वीकार करून, ज्याप्रमाणे नद्या पाणी भरून वाहतात, त्याप्रमाणे आम्हाला अन्नाने आणि समृद्धीने पूर्ण करावे ही विनंती. सुवर्ण रंगाचे हरि नावाचे अश्व असलेल्या हे इंद्रदेवा आम्ही ही नवीन स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत आम्ही आमच्या बुद्धीने आणि कर्माने नेहमी विजयी आणि शत्रूंना पराभूत करणारे होऊ शकू ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२३

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – १-७,११ इंद्र ८-१० ऋत । **छन्द** त्रिष्टुप्

कथा महामवृधत्कस्य होतुर्यज्ञं जुषाणो अभि सोममूधः ।
पिबन्नुशानो जुषमाणो अन्धो ववक्ष ऋष्वः शुचते धनाय ॥१॥
कोणत्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी महान इंद्रदेव प्रसन्न होतील ? इंद्रदेव कोणाच्या यज्ञामध्ये प्रसन्न होऊन उपस्थित राहतील? तेजस्वी इंद्रदेव सोमरसाचे प्राशन करत, हविष्यान्नाच्या आहुती इच्छा करत आणि त्याचा आनंद घेत कोणत्या यज्ञकर्त्या भक्तासाठी धन घेऊन येतील ? ॥१॥

को अस्य वीरः सधमादमाप समानंश सुमतिभिः को अस्य ।
कदस्य चित्रं चिकिते कदूती वृधे भुवच्छशमानस्य यज्योः ॥२॥
असा कोणता वीर आहे, ज्याने इंद्रदेवांबरोबर सोमरस प्राशन करून आनंद मिळवला आहे? इंद्रदेवाच्या श्रेष्ठ बुद्धीने कोण संपन्न आहे? इंद्रदेवांचे कोणते अद्भुत रूप सर्वांना ज्ञात आहे? यज्ञ करणाऱ्या आणि प्रयत्नशील असणाऱ्या भक्ताच्या प्रगतीसाठी इंद्रदेव रक्षण करण्यासाठी कधी सुसज्ज होतील? ॥२॥

कथा शृणोति हूयमानमिन्द्रः कथा शृण्वन्नवसामस्य वेद ।
का अस्य पूर्वीरुपमातयो ह कथैनमाहुः पपुरिं जरित्रे ॥३ ॥
भक्तगणांचे आवाहन इंद्रदेव कशा प्रकारे ऐकतात? आवाहन ऐकताना इंद्रदेवांना भक्तांच्या अन्नाची आणि रक्षणाची गरज कशी कळते? इंद्रदेवांनी प्राचीन काळात दिलेले दान कोणते आहे ? स्तुती करणाऱ्या भक्तगणांची इच्छा पूर्ण करणारे इंद्रदेव कोणत्या नावाने ओळखले जातात ? ॥३॥

कथा सबाधः शशमानो अस्य नशदभि द्रविणं दीध्यानः ।
देवो भुवन्नवेदा म ऋतानां नमो जगृभ्वाँ अभि यज्जुजोषत् ॥४ ॥
संकटांना तोंड देत असताना आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या प्रार्थना इंद्रदेवांपर्यंत कशा पोहचतील? इंद्रदेव आमच्या सत्याच्या कर्माचे जाणकार कधी होतील? आम्हा भक्तगणांच्या नम्र वंदनाचा स्वीकार करून इंद्रदेव या यज्ञावर प्रसन्न होऊन आम्हाला ऐश्वर्य प्रदान करोत ही विनंती. ॥४॥

कथा कदस्या उषसो व्युष्टौ देवो मर्तस्य सख्यं जुजोष ।
कथा कदस्य सख्यं सखिभ्यो ये अस्मिन्कामं सुयुजं ततस्रे ॥५ ॥
उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी इंद्रदेव मानवांच्या मैत्रीचा स्वीकार कधी आणि कशा प्रकारे करतील? जे यज्ञकर्ते भक्तगण आपली दृढ भक्ती इंद्रदेवांवर केंद्रित करतात त्यांच्याशी इंद्रदेव आपले सख्य कसे व्यक्त करतील ? ॥५॥

किमादमत्रं सख्यं सखिभ्यः कदा नु ते भ्रात्रं प्र ब्रवाम ।
श्रिये सुदृशो वपुरस्य सर्गाः स्वर्ण चित्रतममिष आ गोः ॥६ ॥
हे इंद्रदेवा ! शत्रूंवर विजय मिळवणाऱ्या आपल्या मैत्रीच्या आणि बंधुप्रेमाच्या कहाणीचे वर्णन आम्ही यज्ञकर्ते भक्तगण केव्हा करू शकू? आपले सृजन कार्य यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी असते. आपल्या अत्यंत सुंदर, विस्मयकारक आणि तेजोमय रूपाची सर्वजण कामना करतात.॥६॥

द्रुहं जिघांसन्ध्वरसमनिन्द्रां तेतिक्ते तिग्मा तुजसे अनीका ।
ऋणा चिद्यत्र ऋणया न उग्रो दूरे अज्ञाता उषसो बबाधे ॥७ ॥
हे इंद्रदेवा ! आपल्याला न मानणाऱ्या आणि हिंसा करणाऱ्या दुष्टांचा नाश करण्याच्या इच्छेने आपण आपली तीक्ष्ण शस्त्रे त्यांच्या विनाशासाठी धारदार करता. पहाटेच्या वेळी वेगवेगळी ऋणे (देवऋण, मातृऋण, पितृऋण,

ऋषीऋण, इत्यादी) भक्तगणांमध्ये अडथळा निर्माण करतात. शक्तिशाली इंद्रदेव पहाटेच्या वेळी येणाऱ्या भक्तगणांच्या या ऋणांचे निवारण करतात. ॥७॥

ऋतस्य हि शुरुधः सन्ति पूर्वीऋतस्य धीतिर्वृजिनानि हन्ति ।
ऋतस्य श्लोको बधिरा ततर्द कर्णा बुधानः शुचमान आयोः ॥८ ॥
"सत्याच्या (ऋतस्य) अनेक विध प्रकारच्या शक्ती आहेत. सत्याचे चिंतन मानवातील सर्व दुष्ट प्रवृत्तींचा आणि पापांचा नाश करते. सत्याचा तेजस्वी आणि जागृत करणारा घोष मानवाचे बहिरे कानही उघडतो. ॥८ ॥

ऋतस्य दृळ्हा धरुणानि सन्ति पुरूणि चन्द्रा वपुषे वपूंषि ।
ऋतेन दीर्घमिषणन्त पृक्ष ऋतेन गाव ऋतमा विवेशुः ॥९ ॥
सत्याची अनेक रूपे अढळ, मजबूत, अत्यंत प्रकाशमान आणि आनंददायी आहेत. सत्याच्या मार्गावरून चालणारे भक्तगण दीर्घकाळ समृद्धी मिळवण्याची इच्छा करतात. सत्याच्याच शक्तीने सर्व इंद्रिये एकत्र येतात. ॥९॥

ऋतं येमान ऋतमिद्वनोत्यृतस्य शुष्मस्तुरया उ गव्युः ।
ऋताय पृथ्वी बहुले गभीरे ऋताय धेनू परमे दुहाते ॥१० ॥
जो भक्तगण सत्याचे (ऋताचे) पालन करतो, तो सत्यालाच प्राप्त करतो. सत्याची शक्ती ही वेगवान आणि ज्ञानाची इच्छा करणारी असते. या सत्यासाठीच अत्यंत विशाल आणि अगाध पृथ्वी आणि आकाश गायींच्या दुधाप्रमाणे आपले सर्वश्रेष्ठ अमृत अर्पण करतात. ॥१०॥

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।

अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥११ ॥

हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या स्तुतीचा स्वीकार करून, ज्याप्रमाणे नद्या पाणी भरून वाहतात, त्याप्रमाणे आम्हाला अन्नाने आणि समृद्धीने पूर्ण करावे ही विनंती. सुवर्ण रंगाचे हरि नावाचे अश्व असलेल्या हे इंद्रदेवा आम्ही ही नवीन स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत आम्ही आमच्या बुद्धीने आणि कर्माने नेहमी विजयी आणि शत्रूंना पराभूत करणारे होऊ शकू ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२४

ऋषि- वामदेव गौतम , **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप् १० अनुष्टुप्

का सुष्टुतिः शवसः सूनुमिन्द्रमर्वाचीनं राधस आ ववर्तत् ।
ददिर्हि वीरो गृणते वसूनि स गोपतिर्निष्षिधां नो जनासः ॥१॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! अशी कोणती उत्तम स्तुती आहे, जी बलाचा पुत्र असलेल्या, अत्यंत सामर्थ्यशाली इंद्रदेवांना आपल्याला धन देण्यासाठी प्रेरित करू शकेल? कारण इंद्रदेव स्तुती करणाऱ्याला संपत्ती प्रदान करतात. गायींचे (समृद्धी) स्वामी असलेले इंद्रदेव आम्हा स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना शत्रूंचे धन प्रदान करोत ही विनंती.॥१॥

स वृत्रहत्ये हव्यः स ईड्यः स सुष्टुत इन्द्रः सत्यराधाः ।
स यामन्ना मघवा मर्त्याय ब्रह्मण्यते सुष्वये वरिवो धात् ॥२ ॥
वत्रासुराचा वध करण्यासाठी (शत्रूचा नाश करण्यासाठी) स्तुत्य इंद्रदेवांचे आव्हान केले जाते. ऐश्वर्यवान इंद्रदेव योग्य रीतीने प्रार्थना करणाऱ्या आणि सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तगणांना श्रेष्ठ सुख आणि धन प्रदान करतात. ॥२ ॥

तमिन्नरो वि ह्वयन्ते समीके रिरिक्वांसस्तन्वः कृण्वत त्राम् ।
मिथो यत्त्यागमुभयासो अग्मन्नरस्तोकस्य तनयस्य सातौ ॥३ ॥
जेव्हा दोन्ही पक्षांचे वीर योद्धे पुत्र-पौत्रांच्या रक्षणासाठी आणि विजयासाठी आपापसात भिडतात, तेव्हा स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता(रिरिक्वांसः + तन्वः) ते आपल्या शरीराचे रक्षण करण्यासाठी केवळ त्या इंद्रालाच (तमिन्नरो तम् इत् नरः)युद्धाच्या मैदानात साद घालतात. ॥३ ॥

क्रतूयन्ति क्षितयो योग उग्राशुषाणासो मिथो अर्णसातौ ।
सं यद्विशोऽववृत्रन्त युध्मा आदिन्नेम इन्द्रयन्ते अभीके ॥४ ॥
जेव्हा पराक्रमी आणि वेगवान योद्धे जलाच्या (अर्णसाति) प्राप्तीसाठी आपापसात संघर्ष करतात आणि युद्धाच्या इच्छेने एकत्र येतात, तेव्हा त्या रणधुमाळीत समोरासमोर उभे ठाकलेले योद्धे केवळ इंद्रदेवांचे स्मरण करतात. ॥४॥

आदिद्ध नेम इन्द्रियं यजन्त आदित्पक्तिः पुरोळाशं रिरिच्यात् ।
आदित्सोमो वि पपृच्यादसुष्वीनादिज्जुजोष वृषभं यजध्यै ॥५ ॥
युद्धाच्या काळात, काही योद्धे शक्तिशाली इंद्रदेवांच्या शक्तीची उपासना करतात, तर काहीजण हविष्यान्नाची आहुती आणि पुरोडाश अर्पण करतात. यज्ञ करणारे यज्ञ न करणाऱ्यांपासून वेगळे होतात. शक्तिशाली इंद्रदेव यज्ञाचा स्वीकार करण्यासाठी प्रसन्न होतात. ॥५॥

कृणोत्यस्मै वरिवो य इत्थेन्द्राय सोममुशते सुनोति ।
सध्रीचीनेन मनसाविवेनन्तमित्सखायं कृणुते समत्सु ॥६ ॥
जे यज्ञकर्ते भक्तगण सोमरसाची इच्छा करणाऱ्या इंद्रदेवांसाठी सोमरस अर्पण करतात त्या भक्तगणांना इंद्रदेव ऐश्वर्य प्रदान करतात. जे यज्ञकर्ते भक्तगण एकाग्र आणि संशयरहित मनाने इंद्रदेवांची भक्ती करतात त्या भक्तगणांना इंद्रदेव जीवनातील संकटात आपला मित्र बनवून घेतात. ॥६॥

य इन्द्राय सुनवत्सोममद्य पचात्पक्तीरुत भृज्जाति धानाः ।
प्रति मनायोरुचथानि हर्यन्तस्मिन्दधद्वृषणं शुष्ममिन्द्रः ॥७॥

सोमरस सिद्ध करणाऱ्या, पुरोडाश शिजणाऱ्या, जवा सारखे धान्य भाजून अर्पण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे इंद्रदेव आनंदाने स्वीकार करतात. इंद्रदेव या यज्ञकर्त्या भक्तगणाला शत्रूंचा पराभव करणारे आणि फळ देणारे प्रचंड बळ व सामर्थ्य प्रदान करोत ही विनंती. ॥७॥

यदा समर्यं व्यचेदृघावा दीर्घं यदाजिमभ्यख्यदर्यः ।
अचिक्रदद्वृषणं पत्न्यच्छा दुरोण आ निशितं सोमसुद्भिः ॥८ ॥
जेव्हा शत्रूंचा संहार करणारे महान इंद्रदेव शत्रूंना विशेष प्रकारे ओळखून युद्धात गुंतून राहतात तेव्हा इंद्रदेवांची पत्नी (शची) इंद्रदेवांना यज्ञकर्त्या भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस प्राशन करून उत्तेजित झालेल्या इंद्रदेवांना बोलावते. ॥८ ॥

भूयसा वस्नमचरत्कनीयोऽविक्रीतो अकानिषं पुनर्यन् ।
स भूयसा कनीयो नारिरेचीद्दीना दक्षा वि दुहन्ति प्र वाणम् ॥९ ॥
एका माणसाने आपल्या मौल्यवान वस्तूचा व्यवहार अतिशय कमी किमतीत केला. तो पुन्हा खरेदीदाराकडे जाऊन म्हणाला, 'हा व्यवहार मला मान्य नाही. मला अजून किंमत हवी आहे. त्यावर विक्रेता म्हणाला,"एकदा सौदा झाल्यावर त्याला अधिक मोबदला मिळत नाही" दुर्बल माणसांशी व्यवहार करताना चतुर लोक ठरलेल्या करारालाच चिकटून राहतात आणि त्याचा फायदा घेतात.॥९॥

क इमं दशभिर्ममेन्द्रं क्रीणाति धेनुभिः । यदा वृत्राणि जङ्घनदथैनं मे पुनर्ददत् ॥१० ॥
वामदेव(उपरोधिकपणे) म्हणतात, " माझ्या या इंद्रदेवांना दहा गायींच्या मोबदल्यात कोण विकत घेईल? परंतु जेव्हा इंद्रदेव तुमच्या शत्रूंना ठार

मारतील तेव्हा त्या गायी परत विकत घेणारा मनुष्य पुन्हा मलाच परत करील". ॥१० ॥

नू ष्टुत इन्द्र नू गृणान इषं जरित्रे नद्यो न पीपेः ।
अकारि ते हरिवो ब्रह्म नव्यं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥११ ॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी केलेल्या स्तुतीचा स्वीकार करून, ज्याप्रमाणे नद्या पाणी भरून वाहतात, त्याप्रमाणे आम्हाला अन्नाने आणि समृद्धीने पूर्ण करावे ही विनंती. सुवर्ण रंगाचे हरि नावाचे अश्व असलेल्या हे इंद्रदेवा आम्ही ही नवीन स्तोत्रे आपल्याला अर्पण केली आहेत आम्ही आमच्या बुद्धीने आणि कर्माने नेहमी विजयी आणि शत्रूंना पराभूत करणारे होऊ शकू ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२५

ऋषि- वामदेव गौतम , **देवता** इंद्र **छन्द** त्रिष्टुप्

को अद्य नर्यो देवकाम उशन्निन्द्रस्य सख्यं जुजोष ।
को वा महेऽवसे पार्याय समिद्धे अग्नौ सुतसोम ईट्टे ॥१॥
आज असा कोण मानवांचा हितकर्ता, देवभक्त, भक्तगण आहे जो इंद्रदेवांशी मैत्री करण्याची उत्कट इच्छा बाळगतो? सोमरस सिद्ध करून असा कोण भक्तगण आहे जो अग्निदेवांना प्रदीप्त करून रक्षणासाठी आणि संकटातून पार होण्यासाठी इंद्रदेवांच्या महान आणि दिव्य आश्रयाबद्दल इंद्रदेवांची स्तुती करतो ? ॥१॥

को नानाम वचसा सोम्याय मनायुर्वा भवति वस्त उस्राः ।
क इन्द्रस्य युज्यं कः सखित्वं को भ्रात्रं वष्टि कवये क ऊती ॥२ ॥
असा कोण भक्तगण आहे जो सोमपान करणाऱ्या इंद्रदेवांपुढे स्तुतिवचनांनी नतमस्तक होतो? असा कोण भक्तगण आहे जो इंद्रदेवांनी दिलेल्या गायींचा सांभाळ करतो ? इंद्रदेवांची मदत कोण मागतो? इंद्रदेवांसोबत घनिष्ठ नात्याची, मैत्रीची आणि बंधुत्वाची इच्छा कोणाला आहे? दिव्यदृष्टी असलेल्या इंद्रदेवांकडे संरक्षणासाठी कोण प्रार्थना करतो? ॥२॥

को देवानामवो अद्या वृणीते क आदित्याँ अदितिं ज्योतिरीट्टे ।
कस्याश्विनाविन्द्रो अग्निः सुतस्यांशोः पिबन्ति मनसाविवेनम् ॥3॥
आज कोण भक्तगण देवतांचे संरक्षण मागत आहे? कोण आदित्यदेव, आदितीदेवता आणि ज्योतींची स्तुती करत आहे? कोणत्या भक्तगणांनी अर्पण

केलेल्या सोमरसाचा अश्विनीकुमार, इंद्रदेव आणि अग्निदेव प्रसन्न मनाने आणि प्रेमाने स्वीकार करत आहेत ? ॥३॥

तस्मा अग्निर्भारतः शर्म यंसज्ज्योक्पश्यात्सूर्यमुच्चरन्तम् ।
य इन्द्राय सुनवामेत्याह नरे नर्याय नृतमाय नृणाम् ॥४॥
यज्ञात अर्पण करण्यामध्ये अग्रणी असलेले, शत्रूंचा संहार करणारे, कल्याणकारी, सर्वांचे नेतृत्व करणारे इंद्रदेव सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तगणांना पालन पोषण, शांती आणि सुखप्रदान करतात. असे भक्तगण उदय होणाऱ्या सूर्यदेवााना दीर्घकाळपर्यंत पाहतात. (दीर्घायुषी होतात) ॥४ ॥

न तं जिनन्ति बहवो न दभ्रा उर्वस्मा अदितिः शर्म यंसत् ।
प्रियः सुकृत्प्रिय इन्द्रे मनायुः प्रियः सुप्रावीः प्रियो अस्य सोमी ॥५॥
अनेक शत्रू असलेल्या किंवा थोडे शत्रू असलेल्या, सोमरस अर्पण करणाऱ्या भक्तगणांचे कोणीही नुकसान करू शकत नाही. आदितीदेवता या भक्ताला विशाल सुख प्रदान करतात . सत्कर्मकरणारे, इंद्रदेवांचे ठायी भक्ती ठेवणारे ,उत्तम सेवा करणारे, सोमरस अर्पण करणारे, भक्तगण इंद्रदेवांना अत्यंत प्रिय असतात. ॥५॥

सुप्राव्यः प्राशुषाळेष वीरः सुष्वेः पक्तिं कृणुते केवलेन्द्रः ।
नासुष्वेरापिर्न सखा न जामिर्दुष्प्राव्योऽवहन्तेदवाचः ॥६॥
वेगाने शत्रूंना जिंकणारे, उत्तम रक्षक, पराक्रमी इंद्रदेव यज्ञकर्त्या भक्तगणांच्या नैवेद्याचा स्वीकार करतात. जो यज्ञ करत नाही किंवा आहुती अर्पण करत नाही अशा कोणाशीही इंद्रदेव मैत्री, बंधुत्व आणि नाते जोडत नाहीत. स्तुती न करणाऱ्यांना इंद्रदेव शासन करतात. ॥६॥

न रेवता पणिना सख्यमिन्द्रोऽसुन्वता सुतपाः सं गृणीते ।
आस्य वेदः खिदति हन्ति नग्नं वि सुष्वये पक्तये केवलो भूत् ॥७ ॥
सोमरस प्राशन करणारे इंद्रदेव, धनवान असून लोभी असणाऱ्या, यज्ञ न करणाऱ्या, अशा कोणत्याही व्यक्तींशी कधीही मैत्री करत नाही. इंद्रदेव अशा लोकांची संपत्ती नष्ट करतात. जे सोमरस आणि नैवेद्य सिद्ध करून यज्ञकार्य करतात अशा भक्तांचे इंद्रदेव सखा बनतात. ॥७॥.

इन्द्रं परेऽवरे मध्यमास इन्द्रं यान्तोऽवसितास इन्द्रम् ।
इन्द्रं क्षियन्त उत युध्यमाना इन्द्रं नरो वाजयन्तो हवन्ते ॥८॥
श्रेष्ठ, कनिष्ठ आणि मध्यम स्थितीतील भक्तगण इंद्रदेवांचे आवाहन करतात. चालणारे आणि थांबलेले भक्तगण इंद्रदेवांना पुकारतात. तसेच, शांतपणे घरात राहणारे असोत किंवा युद्धभूमीवर लढणारे असोत आणि अन्नाची इच्छा करणारे, सर्व भक्तगण इंद्रदेवांनाच मदतीसाठी बोलावतात. ॥८॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२६

ऋषि- वामदेव गौतम अथवा इंद्र **देवता** १ - ३ इंद्र अथवा आत्मा ४ - ७ श्येन

छन्द -त्रिष्टुप्

अहं मनुरभवं सूर्यश्चाहं कक्षीवाँ ऋषिरस्मि विप्रः ।
अहं कुत्समार्जुनेयं न्यृञ्जेऽहं कविरुशना पश्यता मा ॥१॥
वामदेवऋषि म्हणतात ," मीच मनु झालो होतो आणि मीच सूर्य आहे. मीच ज्ञानी कक्षीवान ऋषी आहे. मी अर्जुनीचा पुत्र कुत्सऋषींना मदत केली आहे. मीच क्रांतदर्शी उशनाऋषी आहे, म्हणून भक्तगणांनो माझ्याकडे पाहा. " ॥१॥

अहं भूमिमददामार्यायाहं वृष्टिं दाशुषे मर्त्याय ।
अहमपो अनयं वावशाना मम देवासो अनु केतमायन् ॥२॥
इंद्रदेव म्हणतात," मी श्रेष्ठ अशा आर्यासाठी ही पृथ्वी दिली आहे. मीच दानशूर आणि यज्ञ करणाऱ्या भक्तगणांसाठी पावसाची वृष्टी करतो. मीच गर्जना करणाऱ्या मेघांमधील जलाला प्रवाहित केले आहे आणि सर्व देव माझ्याच इच्छेनुसार वागतात." ॥२॥

अहं पुरो मन्दसानो व्यैरं नव साकं नवतीः शम्बरस्य ।
शततमं वेश्यं सर्वताता दिवोदासमतिथिग्वं यदावम् ॥३॥
इंद्रदेव म्हणतात," सोमरस प्राशन करून मदोन्मत्त होऊन मी शंबरासुराची नव्व्याण्णव शहरे एकाच फटक्यात नष्ट केली. मी अतिथींचे स्वागत करणाऱ्या 'दिवोदास' नावाच्या राजाचे रक्षण करून शंबरासुराचे शंभरावे नगर राहण्यायोग्य केले. "॥३॥

प्र सु ष विभ्यो मरुतो विरस्तु प्र श्येनः श्येनेभ्य आशुपत्वा ।
अचक्रया यत्स्वधया सुपर्णो हव्यं भरन्मनवे देवजुष्टम् ॥४॥
हे मरुद्गणांनो! हा श्येन पक्षी इतर सर्व पक्ष्यांमध्ये आणि अगदी इतर वेगवान पक्ष्यांमध्येही श्रेष्ठ व सर्वात शीघ्र गतीचा आहे. या सुंदर पंख असलेल्या पक्ष्याने, कोणत्याही चाकांच्या मदतीशिवाय केवळ आपल्या आत्मशक्तीने, देवांना प्रिय असलेले सोमरसरूपी हव्य मानवजातीच्या कल्याणासाठी स्वर्गातून आणले आहे. ॥४ ॥

भरद्यदि विरतो वेविजानः पथोरुणा मनोजवा असर्जि ।
तूयं ययौ मधुना सोम्येनोत श्रवो विविदे श्येनो अत्र ॥५॥
श्येन पक्षी, सोमरसाचे रक्षण करणाऱ्या सर्व रक्षकांचे अडथळे दूर करून विस्तीर्ण आकाशात मनाच्या वेगाने धावू लागला. श्येनपक्षी मधुर सोमरसासह वेगाने खाली आल्याने या जगामध्ये त्याने कीर्ती संपादन केली. ॥५ ॥

ऋजीपी श्येनो ददमानो अंशुं परावतः शकुनो मन्द्रं मदम् ।
सोमं भरद्दादृहाणो देवावान्दिवो अमुष्मादुत्तरादादाय ॥६ ॥
सरळ मार्गाने, वेगाने उडणाऱ्या, दैवीशक्तीने युक्त, असलेल्या शक्तिमान श्येन पक्ष्यांने सर्वोच्च स्वर्गातून आणि अतिशय दूरच्या ठिकाणाहून, आनंद व हर्ष देणारा सोमरस दृढतापूर्वक पृथ्वीवर आणला.॥६॥

आदाय श्येनो अभरत्सोमं सहस्रं सवाँ अयुतं च साकम् ।
अत्रा पुरंधिरजहादरातीर्मदे सोमस्य मूरा अमूरः ॥७ ॥
श्येन पक्ष्याने सोमरसाबरोबर एकाच वेळी हजार- दहा हजार सोमरस तयार करण्याची फळे बरोबर आणली. सोमरसाच्या आनंदात कुशाग्र बुद्धीने(पुरंधि) ज्ञानी (अमूर) श्येन पक्ष्याने आपल्या सर्व शत्रूंचा आणि अडथळा आणणाऱ्या (अराती) लोकांचा त्याग केला. ॥७ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२७

ऋषि- वामदेव गौतम **देवता** श्येन अथवा इंद्र **छन्द** -त्रिष्टुप् ५ शक्वरी

गर्भे नु सन्नन्वेषामवेदमहं देवानां जनिमानि विश्वा ।
शतं मा पुर आयसीररक्षन्नध श्येनो जवसा निरदीयम् ॥१॥
वामदेवऋषी म्हणतात ," मी जेव्हा गर्भात होतो, तेव्हाच मला देवांच्या सर्व दैवी रहस्यांचे ज्ञान प्राप्त झाले होते. मला शंभर लोखंडी तटबंदींनी जखडून ठेवले होते, परंतु ज्याप्रमाणे श्येनपक्षी वेगाने पिंजऱ्याबाहेर पडतो, त्याचप्रमाणे मी माझ्या आत्मिक बळाने त्या सर्व बंधनांतून मुक्त होऊन बाहेर पडलो.॥१॥

न घा स मामप जोषं जभाराभीमास त्वक्षसा वीर्येण ।
ईर्मा पुरंधिरजहादरातीरुत वाताँ अतरच्छूशुवानः ॥२॥
वामदेवऋषि म्हणतात ," तो गर्भ चुकीच्या मार्गाकडे किंवा आनंदापासून दूर नेण्यासाठी प्रभावित करू शकला नाही. मी माझ्या प्रचंड बलाने आणि सामर्थ्याने, बुद्धीच्या जोरावर वाऱ्याच्या वेगाने गर्भातील दुःखांवर विजय मिळवला. ॥२॥

अव यच्छयेनो अस्वनीदध द्योर्वि यद्यदि वात ऊहुः पुरंधिम् ।
सृजद्यदस्मा अव ह क्षिपज्ज्यां कृशानुरस्ता मनसा भुरण्यन् ॥३॥
जेव्हा श्येन पक्ष्याने स्वर्गातून (सोमरस घेऊन) खाली येताना मोठा आवाज केला, तेव्हा सोमरस रक्षकांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. सोमरसाचे रक्षण करणाऱ्या कृशानु नावाच्या धनुर्धराने अत्यंत चपळाईने धनुष्याची प्रत्यंचा ओढून श्येन पक्षाच्या दिशेने बाण सोडला. परंतु, श्येनपक्षी मनाच्या वेगाने तिथून निसटला. ॥३॥

ऋजिप्य ईमिन्द्रावतो न भुज्युं श्येनो जभार बृहतो अधि ष्णोः ।
अन्तः पतत्पतत्र्यस्य पर्णमध यामनि प्रसितस्य तद्वेः ॥४॥
ज्याप्रमाणे अश्विनीकुमारांनी राजा भुज्यूला शक्तिशाली रक्षकांनी संरक्षित केलेल्या ठिकाणाहून पळवून आणले होते, त्याचप्रमाणे सरळ उडणाऱ्या श्येनपक्ष्याने, इंद्रदेवांनी संरक्षित केलेल्या सोमरसाला अंतराळाच्या शिखरावरून आणले होते. त्यावेळी कृशानु नावाच्या धनुर्धराच्या बाणांनी जखमी झालेल्या त्या श्येनपक्ष्याचे एक पीस गळून खाली पडले. ॥४॥

अध श्वेतं कलशं गोभिरक्तमापिप्यानं मघवा शुक्रमन्धः ।
अध्वर्युभिः प्रयतं मध्वो अग्रमिन्द्रो मदाय प्रति धत्पिबध्यै शूरो मदाय प्रति धत्पिबध्यै ॥५॥
त्यानंतर ऐश्वर्यशाली आणि पराक्रमी अशा इंद्रदेवांनी तृप्त होण्यासाठी, यज्ञकर्त्या भक्तगणांनी मोठ्या आदराने अर्पण केलेला, शुभ्र कलशातील, दुग्ध मिश्रित, शुद्ध, मधुर आणि श्रेष्ठ सोमरस प्राशन करण्यासाठी आपल्या हाती घेतला. ॥५॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२८

ऋषि- वामदेव गौतम **देवता** इंद्र अथवा इंद्रसोम, **छन्द** -त्रिष्टुप्

त्वा युजा तव तत्सोम सख्य इन्द्रो अपो मनवे सस्रुतस्कः ।
अहन्नहिमरिणात्सप्त सिन्धूनपावृणोदपिहितेव खानि ॥१॥
हे सोम ! आपल्याशी मैत्री केल्यामुळे आणि आपल्या मदतीमुळे इंद्रदेवांनी मानवाच्या कल्याणासाठी पाण्याला प्रवाहित केले. इंद्रदेवांनी अही असुराचा वध करून बंदिस्त झालेल्या सप्त नद्यांना मुक्त केले आणि नद्यांचा मार्ग मोकळा केला. ॥१॥
(सोम हा इंद्राचा असा मित्र आहे, ज्याच्या सहकार्याशिवाय सृष्टीतील जडत्व किंवा अंधार दूर होऊ शकत नाही. ऋग्वेदात सोमाचा उल्लेख एक महत्त्वाची वनस्पती म्हणून येतो)

त्वा युजा नि खिदत्सूर्यस्येन्द्रश्चक्रं सहसा सद्य इन्दो ।
अधि ष्णुना बृहता वर्तमानं महो द्रुहो अप विश्वायु धायि ॥२॥
हे सोम ! आपल्या सहाय्याने इंद्रदेवांनी सूर्यदेवांच्या रथाचे चक्र त्याच्या पराक्रमाने त्वरित काढून घेतले (अडथळा दूर केला) मोठ्या शिखरावरून फिरणाऱ्या महान द्रोह करणाऱ्या शत्रूला इंद्रदेवांनी नष्ट केले आणि सर्व विश्वाचे आयुष्य (विश्वायु) सुरक्षित केले. ॥२॥

अहन्निन्द्रो अदहदग्निरिन्दो पुरा दस्यून्मध्यंदिनादभीके ।
दुर्गे दुरोणे क्रत्वा न यातां पुरू सहस्रा शर्वा नि बर्हीत् ॥३॥
हे सोम ! आपल्या सहाय्याने इंद्रदेवांनी आणि अग्निदेवांनी युद्धामध्ये मध्याह्नीच्या पूर्वीच दस्यूंना भस्मसात केले. ज्याप्रमाणे एखादा चोर असुरक्षित

आणि निर्जन ठिकाणाहून जाणाऱ्या श्रीमंत लोकांना ठार मारतो, त्याचप्रमाणे इंद्रदेवांनी हजारो सैन्यांचा नाश केला. ॥३ ॥

विश्वस्मात्सीमधमाँ इन्द्र दस्यून्विशो दासीरकृणोरप्रशस्ताः ।
अबाधेथाममृणतं नि शत्रूनविन्देथामपचितिं वधत्रैः ॥४॥
हे इंद्रदेवा ! आपण सर्व ठिकाणातील पापी दस्यूंचे अधःपतन केले, यज्ञ न करणाऱ्यांना आपण निंदनीय बनविले. हे इंद्रदेवा आणि सोम ! आपण दोघांनी आपल्या शत्रूंचा अडथळा दूर करून त्यांचा नाश केला आणि यज्ञकर्त्या भक्तांकडून सन्मान प्राप्त केला. ॥४ ॥

एवा सत्यं मघवाना युवं तदिन्द्रश्च सोमोर्वमश्व्यं गोः ।
आदर्दृतमपिहितान्यश्ना रिरिचथुः क्षाश्चित्ततृदाना ॥५॥
हे इंद्रदेवा आणि हे सोम ! हे खरे आहे की आपण दोघांनी मिळून अश्वांच्या आणि गायीच्या कळपाचे दान केले. आपण दोघांनी, असुरांनी दगडांनी झाकून बळजबरीने कैदेत ठेवलेल्या गायींना मुक्त केले. ॥५ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-२९

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** इंद्र **छन्द** -त्रिष्टुप्

आ नः स्तुत उप वाजेभिरूती इन्द्र याहि हरिभिर्मन्दसानः ।
तिरश्चिदर्यः सवना पुरूण्याङ्गूषेभिर्गृणानः सत्यराधाः ॥१॥
हे स्तुतीने गौरवलेल्या इंद्रदेवा ! आपल्या शक्तिशाली साधनांनी आमच्या रक्षणाकरता आपल्या हरि नावाच्या अश्वांवर स्वार होऊन आनंदाने, इतर यज्ञांना बाजूला सारून आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या अन्नयुक्त यज्ञामध्ये यावे ही विनंती. ॥१॥

आ हि ष्मा याति नर्यश्चिकित्वान्हूयमानः सोतृभिरुप यज्ञम् ।
स्वश्वो यो अभीरुर्मन्यमानः सुष्वाणेभिर्मदति सं ह वीरैः ॥२ ॥
ज्ञानी (चिकित्वान्) मानवांचा नेता (नर्यः) हे इंद्रदेवा ! आपण, सोमरस सिद्ध करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांनी आवाहन केल्यावर, यज्ञस्थळी उपस्थित रहाता. उत्तम अश्व असलेले आणि निर्भय असलेले इंद्रदेव, सोमरस अर्पण करणाऱ्या वीर पुरुषांच्या आनंदात सहभागी होता. ॥२॥

श्रावयेदस्य कर्णा वाजयध्यै जुष्टामनु प्र दिशं मन्दयध्यै ।
उद्वावृषाणो राधसे तुविष्मान्करन्न इन्द्रः सुतीर्थाभयं च ॥३॥
हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! इंद्रदेवांना स्फूर्ती मिळण्यासाठी आणि यज्ञात अर्पण केलेल्या हविष्यान्नाच्या आहुतीने आनंदित करण्यासाठी इंद्रदेवांच्या कानामध्ये स्तुतियुक्त स्तोत्रांचे गायन करावे. अफाट सामर्थ्य असलेले इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना भीतीपासून मुक्त करोत आणि सुरक्षित मार्ग (सुतीर्थम्) प्रदान करोत ही विनंती. ॥३॥

अच्छा यो गन्ता नाधमानमूती इत्था विप्रं हवमानं गृणन्तम् ।
उप त्मनि दधानो धुर्याशून्त्सहस्राणि शतानि वज्रबाहुः ॥४॥
हातामध्ये वज्र धारण करून, इंद्रदेव, स्तुती करणाऱ्या आणि संकटात सहाय्यासाठी याचना करणाऱ्या भक्तगणांकडे, नियंत्रणाखाली असलेल्या आपल्या रथाला शेकडो आणि हजारो वेगवान अश्व जुंपून भक्तांच्या रक्षणासाठी त्वरित पोहोचतात. ॥४॥

त्वोतासो मघवन्निन्द्र विप्रा वयं ते स्याम सूरयो गृणन्तः ।
भेजानासो बृहद्दिवस्य राय आकाय्यस्य दावने पुरुक्षोः ॥५ ॥
हे ऐश्वर्यवान इंद्रदेवा ! आपल्याकडून रक्षिलेले आम्ही भक्तगण आपली स्तुती करून विपुल अन्न आणि समृद्धीने युक्त आपले दान घेण्यास पात्र झालो आहोत. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आपल्या त्या महान, स्वर्गीय आणि सर्वांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या दिव्य संपत्तीमध्ये सहभागी करून घ्यावे ही विनंती. ॥५॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३०

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** इंद्र ९-११ इंद्र उषा **छन्द** - गायत्री, ८, २४ अनुष्टुप्

नकिरिन्द्र त्वदुत्तरो न ज्यायाँ अस्ति वृत्रहन् । नकिरेवा यथा त्वम् ॥१॥
हे वृत्रासुर संहारक इंद्रदेवा ! आपल्यापेक्षा श्रेष्ठ आणि प्रशंसनीय कोणीही नाही. खरोखर, आपल्या सारखा प्रसिद्ध दुसरा कोणीही अस्तित्वात नाही.॥१॥

सत्रा ते अनु कृष्टयो विश्वा चक्रेव वावृतुः । सत्रा महाँ असि श्रुतः ॥२॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे रथाची चक्रे रथाच्या आसाचे अनुकरण करत फिरतात त्याप्रमाणे सर्व लोक आपलेच अनुकरण करून वास्तव्य करतात. हे इंद्रदेवा ! आपण खरोखरच महान आणि प्रसिद्ध आहात. ॥२॥

विश्वे चनेदना त्वा देवास इन्द्र युयुधुः । यदहा नक्तमातिरः ॥३॥
हे इंद्रदेवा ! राक्षसाचा पराभव करण्याच्या इच्छेने आपल्या सहाय्याने शक्ती मिळून देवतांनी राक्षसांशी युद्ध केले. रात्रंदिवस युद्ध करून शत्रूंचा नाश केला. ॥३॥

यत्रोत बाधितेभ्यश्चक्रं कुत्साय युध्यते । मुषाय इन्द्र सूर्यम् ॥४॥
हे इंद्रदेवा ! आपण कुत्सऋषींच्या आणि शत्रूंनी पीडित असलेल्या भक्तांच्या शत्रूंना पराभूत करण्यासाठी युद्धाच्या प्रसंगी सूर्यदेवांच्या रथाचे चक्र हिरावून घेतले. ॥४॥

यत्र देवाँ ऋघायतो विश्वाँ अयुध्य एक इत् । त्वमिन्द्र वनूँरहन् ॥५॥

हे इंद्रदेवा ! देवतांना नुकसान पोहोचवणाऱ्या हिंसक शत्रूंनी देवतांवर आक्रमण केले तेव्हा आपण एकट्याने त्या सर्व हिंसक शत्रूंना युद्धात पराभूत केले आणि त्यांचा नाश केलात. ॥५ ॥

यत्रोत मर्त्याय कमरिणा इन्द्र सूर्यम् । प्रावः शचीभिरेतशम् ॥६॥
हे इंद्रदेवा ! युद्धाच्या प्रसंगी मनुष्यांच्या कल्याणासाठी आपल्या अफाट सामर्थ्याने आपण एतशऋषींचे रक्षण करण्यासाठी सूर्यदेवांना अडवले. ॥६ ॥

किमादुतासि वृत्रहन्मघवन्मन्युमत्तमः । अत्राह दानुमातिरः ॥७॥
हे वृत्रासुर संहारक इंद्रदेवा ! आपण खरोखर अत्यंत क्रोधित झाला होता का? आपण दिवसाढवळ्या आकाशात दनु असुरचा पुत्र, वृत्रासुराचा वध केला. ॥७॥

एतद्धेदुत वीर्यमिन्द्र चकर्थ पौंस्यम् । स्त्रियं यद्दुर्हणायुवं वधीर्दुहितरं दिवः ॥८ ॥
हे इंद्रदेवा ! आपण खरोखरच महान शौर्य आणि पुरुषार्थाचे कार्य केले आहे जेव्हा आपण आकाशलोकाची मुलगी असलेल्या द्रोह करण्याची इच्छा असलेल्या स्त्रीचा वध केला.
(उषादेवतेवर विजय मिळविला.) ॥८॥

दिवश्चिद्धा दुहितरं महान्महीयमानाम् । उषासमिन्द्र सं पिणक् ॥९॥
हे इंद्रदेवा ! आपण आकाशाची कन्या असलेल्या आणि स्वतःला वैभवशाली मानणाऱ्या उषादेवतेला आपल्या सामर्थ्याने पूर्णपणे पराभूत केलेत. ॥९ ॥

अपोषा अनसः सरत्सम्पिष्टादह बिभ्युषी । नि यत्सीं शिश्नथद्वृषा ॥१० ॥

हे बलशाली इंद्रदेवा ! जेव्हा आपण उषादेवतेच्या रथावर प्रहार केला तेव्हा ती भयभीत झालेली उषादेवता आपल्या रथातून उतरून लांब पळून गेली. ॥१०॥

एतदस्या अनः शये सुसम्पिष्टं विपाश्या । ससार सीं परावतः ॥११॥
हे इंद्रदेवा ! उषादेवतेचा हा पूर्णपणे मोडलेला रथ विपाशा नदीच्या काठी पडला आणि उषादेवता भयाने दूर पळून गेली. ॥११॥

उत सिन्धुं विबाल्यं वितस्थानामधि क्षमि । परि ष्ठा इन्द्र मायया ॥१२॥
हे इंद्रदेवा ! आपण आपल्या अफाट सामर्थ्याने आणि कौशल्याने पृथ्वीवर अडकून पडलेल्या आणि भरपूर पाण्याने ओसंडून वाहणाऱ्या सिंधू नदीच्या प्रवाहाचा सर्वत्र विस्तार केलात. ॥१२ ॥

उत शुष्णस्य धृष्णुया प्र मृक्षो अभि वेदनम् । पुरो यदस्य सम्पिणक् ॥१३॥
हे पराक्रमी इंद्रदेवा ! जेव्हा आपण शुष्ण असुराच्या नगरांचा पूर्णपणे नाश केला, तेव्हा आपल्या शौर्याने त्याचे सर्व धन आणि ऐश्वर्यही हस्तगत केलेत. ॥१३॥

उत दासं कौलितरं बृहतः पर्वतादधि । अवाहन्निन्द्र शम्बरम् ॥१४॥
हे इंद्रदेवा ! आपण विशाल पर्वतावर राहणाऱ्या कुलितराचा पुत्र असलेल्या शंबर नावाच्या असुराला त्या पर्वतावरून खाली पाडून वध केलात॥१४ ॥

उत दासस्य वर्चिनः सहस्राणि शतावधीः । अधि पञ्च प्रधींरिव ॥१५॥

हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे रथाच्या चक्राचा परीघ आऱ्यानी वेढलेला असतो, त्याप्रमाणे आपण हजारो शेकडो सैनिकांनी वेढलेल्या वर्चिन नावाच्या असुराला सर्वांबरोबर कंठस्नान घातले. ॥१५॥

उत त्यं पुत्रमग्रुवः परावृक्तं शतक्रतुः । उक्थेष्विन्द्र आभजत् ॥१६॥
शंभर यज्ञांचे कर्ता शतक्रतु इंद्रदेवांनी कुमारीकेच्या (अग्रु) त्याग केलेल्या परावृक्तम् मुलाला स्तोत्र पठना मध्ये सहभागी करून घेतले. ॥१६ ॥

उत त्या तुर्वशायदू अस्नातारा शचीपतिः । इन्द्रो विद्वाँ अपारयत् ॥१७॥
ययातीच्या शापामुळे राज्याभिषेक न झालेल्या विख्यात तुर्वशराजांना आणि यदुराजांना शचीपति इंद्रदेवांनी राज्याभिषेकासाठी पात्र केले. ॥१७ ॥

उत त्या सद्य आर्या सरयोरिन्द्र पारतः । अर्णाचित्ररथावधीः ॥१८॥
हे इंद्रदेवा ! शरयू नदीच्या पैलतीरी राहणाऱ्या, स्वतःला आर्य म्हणवत असणाऱ्या अर्ण आणि चित्ररथ राजांचा आपण वध केला. ॥१८ ॥

अनु द्वा जहिता नयोऽन्धं श्रोणं च वृत्रहन् । न तत्ते सुम्नमष्टवे ॥१९॥
हे वृत्रासुर संहारक इंद्रदेवा ! नातेवाईकांनी त्याग केलेल्या, दृष्टीहीन पांगळ्याला आपण बरे केले. आपल्यामुळे मिळणारे महान सुख कोणीही नष्ट करू शकत नाही॥१९ ॥

शतमश्मन्मयीनां पुरामिन्द्रो व्यास्यत् । दिवोदासाय दाशुषे ॥२०॥
हे इंद्रदेवा ! हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या दानशूर 'दिवोदास' राजासाठी, शत्रूंनी दगडांनी बनलेल्या शंभर नगरांचा पूर्णपणे नाश केला॥२० ॥

अस्वापयद्दभीतये सहस्रा त्रिंशतं हथैः । दासानामिन्द्रो माययाा ॥२१॥
हे इंद्रदेवा ! आपण आपल्या अफाट शक्तीने आणि संहारक प्रहाराने दभीति राजासाठी तीस हजार दस्युंना मृत्युरूप निद्रेत पाठवले. ॥२१॥

स घेदुतासि वृत्रहन्त्समान इन्द्र गोपतिः । यस्ता विश्वानि चिच्युषे ॥२२॥
हे वृत्रासुर संहारक इंद्रदेवा ! आपण गोरक्षक आणि सर्व भक्तगणांसाठी समान गोपनीयता बाळगणारे आहात . आपण आपल्या पराक्रमाने सर्व शत्रूंना थरथर कापायला लावले आहे. ॥२२॥

उत नूनं यदिन्द्रियं करिष्या इन्द्र पौंस्यम् । अद्या नकिष्टदा मिनत् ॥२३॥
हे इंद्रदेवा ! आपण खऱ्या अर्थाने आपल्या इंद्रियांचा जो पुरुषार्थ आणि जे सामर्थ्य प्रकट केले आहे त्याला कोणीही नष्ट करू शकत नाही. ॥२३॥

वामंवामं त आदुरे देवो ददात्वर्यमा । वामं पूषा वामं भगो वामं देवः करूळती ॥२४ ॥
हे शत्रूंचा विनाश करणाऱ्या इंद्रदेवा ! आपल्याला अर्यमा, श्रेष्ठ आणि उत्तम धन प्रदान करोत. दंतहीन पूषन् देव आणि भगदेव इच्छित व कल्याणकारी ऐश्वर्य प्रदान करोत. ॥२४ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३१

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** इंद्र **छन्द** - गायत्री, ३ पाटनिवृत् गायत्री

कया नश्चित्र आ भुवदूती सदावृधः सखा । कया शचिष्ठया वृता॥१॥
निरंतर प्रगती साधणाऱ्या हे इंद्रदेवा !आपण आम्हा भक्तगणांचे मित्र बनून कोणत्या प्रकारे सहाय्य करण्यासाठी उपस्थित होणार आहात ? आपण कोणत्या अत्यंत सामर्थ्यवान अशा कार्याने आम्हा भक्तगणांच्या जवळ येणार आहात ? ॥१॥

कस्त्वा सत्यो मदानां मंहिष्ठो मत्सदन्धसः । दृळ्हा चिदारुजे वसु ॥२॥
हे इंद्रदेवा ! असा कोणता पूजनीय, अत्यंत उत्साहवर्धक, तृप्त करणारा सोमरस आहे ज्याच्यामुळे आपण कडेकोट बंदोबस्तात ठेवलेल्या धनाचा साठा मिळवू देण्यासाठी आपल्याला आनंदाचे भरते येते ? ॥२॥

अभी षु णः सखीनामविता जरितॄणाम् । शतं भवास्यूतिभिः॥३॥
हे इंद्रदेवा ! आपण, स्तुती करणाऱ्या आम्हा भक्तगणांचे शेकडो प्रकारच्या रक्षण साधनांनी रक्षणकर्ते व्हावे ही विनंती ॥३॥

अभी न आ ववृत्स्व चक्रं न वृत्तमर्वतः । नियुद्भिश्चर्षणीनाम् ॥४॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे रथाचे चाक वेगाने फिरते त्याप्रमाणे आपण आपल्या नियुत् नावाच्या अश्वावर स्वार होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करण्यासाठी आपले लक्ष आमच्याकडे वळवावे ही विनंती ॥४॥

प्रवता हि क्रतूनामा हा पदेव गच्छसि । अभक्षि सूर्ये सचा॥५॥

हे इंद्रदेवा ! आपण यज्ञस्थळी आपले हक्काचे ठिकाण माहित करून यज्ञ करणाऱ्या, सूर्यदेवांच्या उपासना करणाऱ्या, नम्रवृत्तीच्या भक्तगणांकडे खरोखर येता ॥५॥

सं यत्त इन्द्र मन्यवः सं चक्राणि दधन्विरे । अध त्वे अध सूर्ये ॥६ ॥
हे इंद्रदेवा ! जेव्हा आम्ही भक्तगण आपल्याला स्तुतियुक्त प्रार्थना समर्पित करतो तेव्हा त्या प्रार्थना एखाद्या रथचक्राप्रमाणे पहिल्यांदा आपल्याकडे आणि नंतर सूर्यदेवांकडे धाव घेतात. ॥६॥

उत स्मा हि त्वामाहुरिन्मघवानं शचीपते । दातारमविदीधयुम्॥७॥
हे शचीपति इंद्रदेवा ! सर्व लोक आपल्याला ऐश्वर्याचे स्वामी (मघवानम्) आणि ज्याचे दान कधीही थांबत नाही (अविदीधयुम्)असे दानशूर म्हणून ओळखतात ॥७॥.

उत स्मा सद्य इत्परि शशमानाय सुन्वते । पुरू चिन्मंहसे वसु॥८॥
हे इंद्रदेवा ! आपण आपली स्तुती करणाऱ्या आणि सोमरस अर्पण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना तत्काळ विपुल धन प्रदान करता ॥८॥

नहि ष्मा ते शतं चन राधो वरन्त आमुरः । न च्यौत्नानि करिष्यतः॥९ ॥
हे इंद्रदेवा ! आपले दान आणि ऐश्वर्य, अडथळा आणणारे शेकडो शत्रु सुद्धा रोखू शकत नाहीत. आपल्या महान पराक्रम करणाऱ्या कर्मांना कोणीही प्रतिबंध करू शकत नाही ॥९॥

अस्माँ अवन्तु ते शतमस्मान्त्सहस्रमूतयः । अस्मान्विश्वा अभिष्टयः॥१०॥

हे इंद्रदेवा ! आपले शंभर प्रकारचे रक्षण करण्याचे मार्ग आणि हजारो प्रकारच्या मदती आमचे रक्षण करोत. आपण करत असलेल्या कृपा आमच्या कल्याणासाठी आम्हाला प्राप्त होवोत. ॥१०॥

अस्माँ इहा वृणीष्व सख्याय स्वस्तये । महो राये दिवित्मते॥११॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी आणि आपल्या मैत्रीसाठी आपण आमचा स्वीकार करावा आणि आम्हाला तेजस्वी, महान संपत्ती प्रदान करावी ही विनंती. ॥११ ॥

अस्माँ अविड्ढि विश्वहेन्द्र राया परीणसा ।
अस्मान्विश्वाभिरूतिभिः॥१२॥
हे इंद्रदेवा ! आपण आपल्या विपुल संपत्तीने आणि आपल्या सर्व प्रकारच्या संरक्षक साधनांनी आमचे रक्षण करावे ही विनंती. ॥१२॥

अस्मभ्यं ताँ अपा वृधि व्रजाँ अस्तेव गोमतः ।
नवाभिरिन्द्रोतिभिः ॥१३ ॥
एखादा धनुर्धर, शत्रूचे अडथळे दूर करतो त्याप्रमाणे हे इंद्रदेवा ! आपण आपल्या नवनवीन रक्षण साधनांनी आम्हा भक्तगणांसाठी गायींनी भरलेले ते गोठे मुक्त करावेत ही विनंती. ॥१३ ॥

अस्माकं धृष्णुया रथो द्युमाँ इन्द्रानपच्युतः । गव्युरश्वयुरीयते॥१४॥
हे इंद्रदेवा ! आम्हा भक्तगणांचा, शत्रूंचा नाश करणारा, तेजस्वी आणि कधीही पराभूत न होणारा रथ सर्वत्र संचार करो. गायी आणि अश्वांनी संपन्न असा हा आमचा रथ सदैव गतीमान राहो आणि त्याद्वारे आपण आमचे रक्षण करावे ही विनंती ॥१४॥

अस्माकमुत्तमं कृधि श्रवो देवेषु सूर्य । वर्षिष्ठं द्यामिवोपरि॥१५॥

देवांमध्ये, सूर्याप्रमाणे तेजस्वी (देवेषुसूर्य) असलेल्या हे इंद्रदेवा !
आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची कीर्ती, सर्व देवतांमध्ये, ज्याप्रमाणे हे विस्तीर्ण आकाश सर्वांच्यावर वसले आहे, त्याचप्रमाणे उत्तुंग आणि महान करावी ही विनंती. ॥१५॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३२

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** इंद्र २३,२४ इंद्राश्व **छन्द** – गायत्री

आ तू न इन्द्र वृत्रहन्नस्माकमर्धमा गहि । महान्महीभिरूतिभिः॥१॥
हे वृत्रासुरसंहारक, महान इंद्रदेवा ! आपण आपल्या विशाल संरक्षणासह आमच्या समीप त्वरित यावे, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी विराजमान व्हावे ही विनंती.॥१॥

भूमिश्चिद्धासि तूतुजिरा चित्र चित्रिणीष्वा । चित्रं कृणोष्यूतये॥२॥
हे इंद्रदेवा ! आपण सर्वत्र संचार करणारे असलात तरी आम्हा भक्तगणांच्या संकटात त्वरेने धावून येणारे आहात. आपण आम्हा भक्तगणांच्या रक्षणासाठी विविध प्रकारच्या कर्मांमध्ये निश्चितच काहीतरी विलक्षण आणि आश्चर्यकारक कार्य घडवून आणता. ॥२॥

दभ्रेभिश्चिच्छशीयांसं हंसि व्राधन्तमोजसा । सखिभिर्ये त्वे सचा॥३॥
हे इंद्रदेवा ! आपले जे मोजके सहकारी आहेत, त्यांच्या मदतीने आपण आपल्या प्रचंड सामर्थ्याने आम्हा भक्तगणांच्या गर्विष्ठ, बलाढ्य शत्रूंचाही नाश करता ॥३ ॥

वयमिन्द्र त्वे सचा वयं त्वाभि नोनुमः । अस्माँअस्माँ इदुदव॥४॥
हे इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या सहवासात आहोत. आम्ही मनोभावे आपलीच स्तुती करतो. आपण आम्हा सर्वांचे रक्षण करावे ही विनंती ॥४॥

स नश्चित्राभिरद्रिवोऽनवद्याभिरूतिभिः । अनाधृष्टाभिरा गहि॥५॥
हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपण आपल्या अद्भुत, निर्दोष आणि अजेय अशा संरक्षण शक्तींसह आमच्याकडे यावे ही विनंती. ॥५॥

भूयामो षु त्वावतः सखाय इन्द्र गोमतः । युजो वाजाय घृष्वये ॥६॥
हे इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्यासारखेच निश्चयाने उत्तम गोरक्षक मित्र आहोत. आपली साथ मिळवून आम्हा भक्तगणांना समृद्धी आणि शत्रूला पराभूत करणारे तेज प्राप्त (वाजाय घृष्वये) व्हावे ही विनंती. ॥६॥

त्वं ह्येक ईशिष इन्द्र वाजस्य गोमतः । स नो यन्धि महीमिषम् ॥७॥
हे इंद्रदेवा ! गायींनी समृद्ध अशा समृद्धीचे आपण एकमेव स्वामी आहात. आपण आम्हा भक्तगणांना महान अशा समृद्धीची प्राप्ती करून द्यावी ही विनंती. ॥७॥

न त्वा वरन्ते अन्यथा यद्दित्ससि स्तुतो मघम् । स्तोतृभ्य इन्द्र गिर्वणः॥८॥
हे स्तुतिवचनांनी पूजनीय इंद्रदेवा ! जेव्हा आपली स्तुती करणाऱ्या आम्हा भक्तगणांना ऐश्वर्य देण्याची इच्छा करता तेव्हा आपल्याला कोणीही, कोणत्याही प्रकारे अडवू शकत नाही. ॥८॥

अभि त्वा गोतमा गिरानूषत प्र दावने । इन्द्र वाजाय घृष्वये ॥९॥
हे इंद्रदेवा ! समृद्धि आणि बल प्राप्त करण्यासाठी गोतमाऋषि शब्दांनी स्तुती करत आहेत. गोतमऋषि तेज प्राप्त करण्याच्या हेतूने आपले आवाहन करत आहेत. ॥९॥

प्र ते वोचाम वीर्या या मन्दसान आरुजः । पुरो दासीरभीत्य ॥१० ॥
हे इंद्रदेवा ! सोमरस प्राशन करून हर्षोल्हासित झालेले आपण, शत्रूंचे किल्ले उद्ध्वस्त केले. या आपल्या महान पराक्रमाचे आम्ही भक्तगण वारंवार वर्णन करतो. ॥१०॥

ता ते गृणन्ति वेधसो यानि चकर्थ पौंस्या । सुतेष्विन्द्र गिर्वणः॥११ ॥
हे स्तुतिप्रिय इंद्रदेवा ! यज्ञामध्ये जेव्हा सोमरस सिद्ध केला जातो तेव्हा ज्ञानी यज्ञकर्ते भक्तगण आपल्या विश्वरक्षणासाठी केलेल्या महान पराक्रमाच्या कार्यांचे वर्णन करतात. ॥११॥

अवीवृधन्त गोतमा इन्द्र त्वे स्तोमवाहसः । ऐषु धा वीरवद्यशः॥१२॥
हे इंद्रदेवा ! गौतमा ऋषींच्या वंशातील ज्या ऋषींनी आपल्या गुणांचे वर्णन करून आपला महिमा वाढवणारी स्तोत्रे रचली आहेत. अशा स्तुती करणाऱ्या भक्तगणांच्या पुत्र-पौत्रांना शौर्याने परिपूर्ण असे यश प्रदान करावे ही विनंती. ॥१२ ॥

यच्चिद्धि शश्वतामसीन्द्र साधारणस्त्वम् । तं त्वा वयं हवामहे॥१३ ॥
हे इंद्रदेवा ! आपण अनंत काळापासून सर्व यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी सहज उपलब्ध आहा, म्हणूनच आम्ही सर्वजण आपलाच आश्रय घेतो आणि आपल्याला, मदतीसाठी आवाहन करतो. ॥१३॥

अर्वाचीनो वसो भवास्मे सु मत्स्वान्धसः । सोमानामिन्द्र सोमपाः॥१४॥
हे सर्वांना निवासस्थान देणाऱ्या इंद्रदेवा ! आपण सोमरस प्राशन करणारे आहात. आपण आमच्या जवळ येऊन सोमरसाचे प्राशन करून उत्तम प्रकारे तृप्त आणि आनंदी व्हावे ही विनंती. ॥१४॥

अस्माकं त्वा मतीनामा स्तोम इन्द्र यच्छतु । अर्वागा वर्तया हरी ॥१५॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची ही स्तोत्रे आपल्याला आमच्याकडे आकर्षित करत आहेत. आपण आपले हरी नावाचे अश्व आमच्या दिशेने वळवावे ही विनंती ॥१५॥

पुरोळाशं च नो घसो जोषयासे गिरश्च नः । वधूयुरिव योषणाम्॥१६॥
पत्नीची इच्छा करणारा पति, पत्नीच्या शब्दांनी प्रसन्न होतो, त्याप्रमाणे आपण देखील आमच्या या स्तुतियुक्त स्तोत्रांनी प्रसन्न व्हावे ही विनंती॥१६॥

सहस्रं व्यतीनां युक्तानामिन्द्रमीमहे । शतं सोमस्य खार्यः॥१७॥
हे इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याकडे हजारो प्रशिक्षित वेगवान अश्व आणि सोमरसाने भरलेल्या शेकडो कलश, प्रदान करण्यासाठी प्रार्थना करतो ॥१७॥.

सहस्रा ते शता वयं गवामा च्यावयामसि । अस्मत्रा राध एतु ते ॥१८॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आपल्याकडून हजारो-शेकडो गायींना प्राप्त व्हाव्यात ही विनंती. आपले ते श्रेष्ठ धन आम्हाला प्राप्त होवो ही विनंती ॥१८ ॥

दश ते कलशानां हिरण्यानामधीमहि । भूरिदा असि वृत्रहन्॥१९॥
हे वृत्रासुरसंहारक इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याकडून सुवर्णाने भरलेल्या दहा कलशांची मागणी करतो कारण आपण अत्यंत विपुल प्रमाणात दान प्रदान करणारे आहात. ॥१९ ॥

भूरिदा भूरि देहि नो मा दभ्रं भूर्या भर । भूरि घेदिन्द्र दित्ससि॥२० ॥

हे इंद्रदेवा ! आपण विपुल दान देणारे म्हणून प्रसिद्ध आहात. आपण आम्हाला अल्प दान न देता आम्हाला भरपूर ऐश्वर्य प्रदान करावे कारण आपण भक्तगणांना भरपूर दान प्रदान करण्याची इच्छा बाळगता. ॥२०॥

भूरिदा ह्यसि श्रुतः पुरुत्रा शूर वृत्रहन्। आ नो भजस्व राधसि ॥२१॥
हे वृत्रासुरसंहारक इंद्रदेवा ! आपण भक्तगणांमध्ये सर्वात उदार दाता म्हणून प्रसिद्ध आहात. आपण आम्हाला संपत्ती प्रदान करावी ही विनंती. ॥२१॥

प्र ते बभ्रू विचक्षण शंसामि गोषणो नपात्। माभ्यां गा अनु शिश्रथः॥२२॥
हे चतुर इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या तांबूस रंगाच्या (बभ्रू) दोन्ही अश्वांची उत्तम प्रकारे स्तुती करतो. हे पतन होऊ न देणाऱ्या इंद्रदेवा ! आपण आपल्या या अश्वांच्या माध्यमातून आमच्या गायींना कोणत्याही प्रकारे हानी पोहोचवू नका ही विनंती ॥२२॥

कनीनकेव विद्रधे नवे द्रुपदे अर्भके। बभ्रू यामेषु शोभेते॥२३॥
हे इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे लाकडी चौकटीच्या नवीन आणि लहान मंचावर बसवलेल्या दोन सुंदर बाहुल्या शोभून दिसतात, त्याप्रमाणे आपले तांबूस रंगाचे अश्व यज्ञाला सुशोभित करतात. ॥२३॥

अरं म उस्रयाम्णेऽरमनुस्रयाम्णे। बभ्रू यामेष्वस्रिधा॥२४॥
हे इंद्रदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या सकाळच्या प्रवासात (उस्रयाम्णे) किंवा संध्याकाळच्या परतीच्या प्रवासात आपले, समर्थपणे आणि वेगाने प्रवास करणारे, (अरम्-अनुस्रयाम्णे) तांबूस रंगाचे अश्व प्रवासात कधीही न थकणारे आहेत. ॥२४॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३३

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** ऋभुगण **छन्द** – त्रिष्टुप्

प्र ऋभुभ्यो दूतमिव वाचमिष्य उपस्तिरे श्वैतरीं धेनुमीळे ।
ये वातजूतास्तरणिभिरेवैः परि द्यां सद्यो अपसो बभूवुः॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, वाऱ्यासारखे वेगवान, जगासाठी हितकारक कर्मे करणाऱ्या, अश्वांच्या सहाय्याने सर्व बाजूंनी एका क्षणात संपूर्ण आकाशमंडळाला प्रदक्षिणा घालणाऱ्या ऋभुदेवांना दूताप्रमाणे आमची स्तुतियुक्त स्तोत्रे पाठवतो. सोमरस सिद्ध करण्यासाठी आम्ही ऋभुदेवांकडे दुभत्या गायींची मागणी करतो. ॥१॥

यदारमक्रन्नृभवः पितृभ्यां परिविष्टी वेषणा दंसनाभिः ।
आदिद्देवानामुप सख्यमायन्धीरासः पुष्टिमवहन्मनायै॥२ ॥
जेव्हा ऋभुदेवांनी आपल्या वृद्ध माता-पित्यांची अत्यंत निष्ठेने सेवा केली आणि आपल्या अद्भुत कौशल्याने त्यांना पुन्हा तारुण्य दिले तेव्हाच ते धैर्यवान ऋभुदेव देवांच्या मैत्रीस पात्र ठरले. ऋभुदेवांनी आपल्या बुद्धीच्या सामर्थ्याने समृद्धी प्राप्त केली. ॥२ ॥

पुनर्ये चक्रुः पितरा युवाना सना यूपेव जरणा शयाना ।
ते वाजो विभ्वाँ ऋभुरिन्द्रवन्तो मधुप्सरसो नोऽवन्तु यज्ञम् ॥३ ॥
ज्या ऋभुदेवांनी आपल्या वृद्ध, अशक्त आणि यज्ञाच्या जीर्ण खांबाप्रमाणे जमिनीवर पडलेल्या माता-पित्यांना आपल्या कौशल्याने पुन्हा तरुण बनवले ते वाज, विभ्वा आणि ऋभुदेव इंद्रदेवांसहित सोमरस प्राशन करून आमच्या यज्ञाचे रक्षण करोत ॥३॥

(ऋभुदेव धरून तीन भावंडे होती त्यांची नावे ऋभु - आपल्या कार्याने चमकणारे , विभ्वा- ज्याचा विस्तार मोठा आहे आणि वाज -शक्तीचे प्रतीक)

यत्संवत्समृभवो गामरक्षन्यत्संवत्समृभवो मा अपिंशन् ।
यत्संवत्समभरन्भासो अस्यास्ताभिः शमीभिरमृतत्वमाशुः॥४॥
ऋभुदेवांनी मृत गायीचे वर्षभर रक्षण केले, त्यांनी वर्षभर तिच्या रूपाला आकार देऊन पुष्ट केले, आणि जेव्हा त्यांनी वर्षभर या गायीचे तेज जोपासले, तेव्हा आपल्या त्या परिश्रमांनी आणि दिव्य कर्मांनी त्यांनी अमरत्व प्राप्त केले. ॥४ ॥

ज्येष्ठ आह चमसा द्वा करेति कनीयान्त्रीन्कृणवामेत्याह ।
कनिष्ठ आह चतुरस्करेति त्वष्ट ऋभवस्तत्पनयद्वचो वः॥५॥
ऋभुदेवांचे थोरले बंधु म्हणाले,"या पात्राचे दोन भाग करूया." मधले बंधु म्हणाले, "आपण याचे तीन भाग करूया" आणि सर्वात कनिष्ठ बंधु म्हणाले, " आपण याचे चार भाग करूया." हे ऋभुदेवांनो! आपल्या कौशल्याची देवतांचे शिल्पकार त्वष्टदेवांनी प्रशंसा केली. ॥५ ॥

सत्यमूचुर्नर एवा हि चक्रुरनु स्वधामृभवो जग्मुरेताम् ।
विभ्राजमानाँश्चमसाँ अहेवावेनत्त्वष्टा चतुरो ददृश्वान् ॥६॥
मानव रूपधारी, सत्य कथन केलेल्या ऋभुदेवांनी त्यांनी सांगितल्याप्रमाणे तशीच कृती करून दाखवली. त्यांनी चमस पात्रांचे चार भागांमध्ये विभाजन केले. त्यानंतर ऋभुदेवांनी हविष्यान्न ग्रहण केले. दिवसाप्रमाणे तेजस्वी चमकणारे ते चमस पात्राचे चार भाग पाहून त्वष्टदेवांनी ते भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली. ॥६॥

द्वादश द्यून्यदगोह्यस्यातिथ्ये रणन्नृभवः ससन्तः ।
सुक्षेत्राकृण्वन्ननयन्त सिन्धून्धन्वातिष्ठन्नोषधीर्निम्नमापः॥७॥
ऋभुदेव बारा दिवस लपवता न येणाऱ्या सूर्यदेवाच्या निवासस्थानात आदरातिथ्यात रममाण झाले आणि विश्रांती घेत राहिले. त्यानंतर ऋभुदेवांनी शेतीसाठी जमीन सुपीक केली. त्यांनी नद्यांना प्रवाही केले, वाळवंटात वनस्पतींची उत्पत्ती केली आणि पाणी सखल भागाकडे प्रवाहित केले.॥७॥

रथं ये चक्रुः सुवृतं नरेष्ठां ये धेनुं विश्वजुवं विश्वरूपाम् ।
त आ तक्षन्त्वृभवो रयिं नः स्ववसः स्वपसः सुहस्ताः॥८॥
ऋभुदेवांनी मानवांना स्वार होण्यासाठी उत्तम प्रकारे चालणाऱ्या सुंदर चाकांच्या रथाची निर्मिती केली, त्यांनी विश्वाला गती दिली आणि अनेक रूपांनी युक्त अशी कामधेनु सारखी गाय निर्माण केली. अशा वाज, ऋभु आणि विभ्वा ऋभुदेवांनो आपण सर्व आदित्यदेवांसोबत आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञात आनंदाने सहभागी होऊन सोमरस प्राशन करून तृप्त व्हावे ही विनंती. ॥८॥

अपो ह्येषामजुषन्त देवा अभि क्रत्वा मनसा दीध्यानाः ।
वाजो देवानामभवत्सुकर्मेन्द्रस्य ऋभुक्षा वरुणस्य विभ्वा॥९॥
देवांनी, ऋभुदेवांनी केलेल्या कार्यांचे विचारपूर्वक अवलोकन केले आणि देव ऋभुदेवांवर अतिशय प्रसन्न झाले. वाज हे देवांचे उत्तम कारागीर झाले. ऋभुक्षा हे इंद्रदेवांचे आणि विभ्वा हे वरुणदेवांचे सहाय्यक बनले. ॥९॥

ये हरी मेधयोक्था मदन्त इन्द्राय चक्रुः सुयुजा ये अश्वा ।
ते रायस्पोषं द्रविणान्यस्मे धत्त ऋभवः क्षेमयन्तो न मित्रम्॥१० ॥

ज्या ऋभुदेवांनी आपल्या बुद्धी आणि मंत्रांनी हरी नावाच्या अश्वांना प्रसन्न केले आणि त्या सुंदर अश्वांना इंद्रदेवांच्या रथासाठी सुसज्ज केले ते, ऋभुदेव आम्हा भक्तगणांना कल्याण इच्छिणाऱ्या मित्राप्रमाणे विपुल धन आणि समृद्धि प्रदान करोत ही विनंती ॥१०॥

इदाह्नः पीतिमुत वो मदं धुर्न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।
ते नूनमस्मे ऋभवो वसूनि तृतीये अस्मिन्त्सवने दधात॥११ ॥
हे ऋभुदेवांनो ! देवतांनी आपल्याला या दिवसाच्या यज्ञाच्या तिसऱ्या विधीमध्ये सोमरस आणि त्यातून मिळणारे सुख दिले. श्रमांशिवाय कोणाशीही मैत्री साधता येत नाही म्हणून हे ऋभुदेवांनो ! आपण या यज्ञाच्या तिसऱ्या विधीमध्ये आम्हा भक्तगणांना निश्चितपणे धनसंपत्ती प्रदान करावी ही विनंती ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३४

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** ऋभुगण **छन्द** – त्रिष्टुप्

ऋभुर्विभ्वा वाज इन्द्रो नो अच्छेमं यज्ञं रत्नधेयोप यात ।
इदा हि वो धिषणा देव्यह्वामधात्पीतिं सं मदा अग्मता वः॥१॥
हे ऋभु, विभ्वा, वाज आणि इंद्रदेवांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना मौल्यवान रत्ने प्रदान करण्यासाठी सर्वांनी आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. यज्ञाच्या तिसऱ्या विधीमध्ये बुद्धीच्या देवतेने (धिषणा) आपल्यासाठी सोमरस प्राशन करण्यासाठी सिद्ध केला आहे. सोमरस प्राशनाने मिळणारा आनंद तुम्हालाही प्राप्त होवो. ॥१॥

विदानासो जन्मनो वाजरत्ना उत ऋतुभिऋभवो मादयध्वम् ।
सं वो मदा अग्मत सं पुरंधिः सुवीरामस्मे रयिमेरयध्वम् ॥२॥
ज्ञानसंपन्न आणि समृद्ध ऐश्वर्य धारण करणाऱ्या हे ऋभुदेवांनो ! आपण स्वतःच्या स्वरूपाला जाणणारे आहात. आपण विविध ऋतु अनुसार यज्ञात सोमपानाचा आनंद घ्यावा ही विनंती. सोमरस प्राशन केल्याने आपल्याला उत्साह, धुंदी आणि स्तुती प्राप्त झाली आहे. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या पुत्र-पौत्रांसहित धनही प्रदान करावे ही विनंती. ॥२ ॥

अयं वो यज्ञ ऋभवोऽकारि यमा मनुष्वत्प्रदिवो दधिध्वे ।
प्र वोऽच्छा जुजुषाणासो अस्थुरभूत विश्वे अग्रियोत वाजाः॥३॥
हे ऋभुदेवांनो ! हा यज्ञ आपल्यासाठीच रचण्यात आला आहे, त्याचा आपण पुरातन काळापासून मानवाच्या हितासाठी स्वीकार करता. या यज्ञाचा आपण

आनंद घ्यावा. हे ऋभुदेवांनो !आपण सर्वजण श्रेष्ठ आणि सामर्थ्यवान आहात. ॥३ ॥

अभूदु वो विधते रत्नधेयमिदा नरो दाशुषे मर्त्याय ।
पिबत वाजा ऋभवो ददे वो महि तृतीयं सवनं मदाय॥४॥
हे ऋभुदेवांनो ! आपल्या कृपेमुळे यज्ञाचे अनुष्ठान करणाऱ्यासाठी अर्पण करणाऱ्या मर्त्यमाणसाला (दाशुषे मर्त्याय) रत्न वैभव धारण करण्याचे भाग्य लाभले आहे. यज्ञाच्या तिसऱ्या विधीमध्ये आपल्या प्रसन्नतेसाठी आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेला सोमरस स्वीकारावा ही विनंती ॥४ ॥

आ वाजा यातोप न ऋभुक्षा महो नरो द्रविणसो गृणानाः ।
आ वः पीतयोऽभिपित्वे अह्वामिमा अस्तं नवस्व इव ग्मन् ॥५॥
हे धनाचे स्वामी आणि स्तुतीस पात्र असलेल्या, महान वीर, वाज आणि ऋभुक्षानो आपण आमच्या जवळ यावे ही विनंती. ज्याप्रमाणे नुकत्याच व्यायलेल्या गायी वासरांच्या ओढीने वेगाने घराकडे धावतात, त्याप्रमाणे दिवसाच्या शेवटी (संध्याकाळी) आमची ही स्तोत्रे आपल्याला सोमरस प्राशनासाठी आपल्याकडे पोहोचतात ॥५॥

आ नपातः शवसो यातनोपेमं यज्ञं नमसा हूयमानाः ।
सजोषसः सूरयो यस्य च स्थ मध्वः पात रत्नधा इन्द्रवन्तः॥६॥
हे सामर्थ्यशाली बलाचे पुत्रांनो, ऋभुदेवांनो ! नतमस्तक होऊन ज्यांचे आव्हान केले जाते असे आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. हे रत्ने धारण करणाऱ्या विद्वान ऋभुदेवांनो ! आपण इंद्रदेवांसह प्रसन्न चित्ताने या यज्ञातील मधुर सोमरस प्राशन करावा ही विनंती.॥६ ॥

सजोषा इन्द्र वरुणेन सोमं सजोषाः पाहि गिर्वणो मरुद्भिः ।
अग्रेपाभिऋतुपाभिः सजोषा ग्नास्पत्नीभी रत्नधाभिः सजोषाः ॥७॥
हे ज्याची स्तुती मंत्रांनी केली जाते(गिर्वण) अशा इंद्रदेवा ! आपण वरुणदेवांसोबत आणि मरुद्गणांसोबत आनंदित होऊन सोमरसाचे प्राशन करावे ही विनंती. हे इंद्रदेवा ! जे सत्याचे पालन करतात, ज्यांच्या पत्नीमध्ये दैवी शक्ती आहे (ग्नास्पत्नीभी) आणि जे श्रेष्ठ धन प्रदान करतात अशा प्रथम सोमरस (अग्रेपाभि) प्राशन करणाऱ्या देवांसोबत आपण सोमरस प्राशनाचा आनंद घ्यावा ही विनंती. ॥७॥

सजोषस आदित्यैर्मादयध्वं सजोषस ऋभवः पर्वतेभिः ।
सजोषसो दैव्येना सवित्रा सजोषसः सिन्धुभी रत्नधेभिः॥८॥
हे ऋभुदेवांनो ! आपण आदित्य देवतांसोबत, पर्वताच्या संगतीने, दैवी प्रेरणा देणाऱ्या सवितादेवांच्या सहवासात आणि सुखदायक रत्ने प्रदान करणाऱ्या नद्यांच्या सान्निध्यात आनंदाने प्रसन्न व्हावे ही विनंती॥८॥

ये अश्विना ये पितरा य ऊती धेनुं ततक्षुऋभवो ये अश्वा ।
ये अंसत्रा य ऋधग्रोदसी ये विभ्वो नरः स्वपत्यानि चक्रुः॥९ ॥
ज्या ऋभुदेवांनी अश्विनीकुमारांना रथ अर्पण करून प्रसन्न केले, ज्यांनी आपल्या वृद्ध माता-पित्यांना पुन्हा तरुण बनवून रक्षण केले, ज्यांनी दूध देणारी गाय आणि शक्तिशाली अश्व निर्माण केले, ज्यांनी देवांच्या रक्षणासाठी चिलखते घडवली, ज्यांनी पृथ्वी आणि आकाश यांना वेगवेगळे केले, असे ऋभुदेव, आम्हा भक्तगणांना शुभ संतती प्राप्त करून देणारे आहेत. ॥९॥

ये गोमन्तं वाजवन्तं सुवीरं रयिं धत्थ वसुमन्तं पुरुक्षुम् ।
ते अग्रेपा ऋभवो मन्दसाना अस्मे धत्त ये च रातिं गृणन्ति ॥१० ॥

हे ऋभुदेवांनो ! आपल्याकडे गायी, अन्नधान्य, पुत्र-पौत्र, निवासस्थाने आणि विपुल संपत्ती आहे. आपण यज्ञामध्ये सोमरस प्राशन करण्यासाठी सर्वप्रथम आणि आनंदी असणाऱ्या देवता आहात. आम्हा स्तुती करणाऱ्या भक्तगणांना तीच संपत्ती प्रदान करावी ही विनंती ॥१०॥

नापाभूत न वोऽतीतृषामानिःशस्ता ऋभवो यज्ञे अस्मिन् ।
समिन्द्रेण मदथ सं मरुद्भिः सं राजभी रत्नधेयाय देवाः॥११॥
हे प्रशंसनीय ऋभुदेवांनो ! आपण या यज्ञापासून दूर जाऊ नका. आम्ही आपल्याला जास्तकाळ तृषित ठेवणार नाही. हे देवस्वरूप ऋभुदेवांनो ! आपण इंद्रदेवांसोबत, मरुद्गणांसोबत आणि इतर तेजस्वी देवतांसोबत आनंदीत व्हावे आणि आम्हाला उत्तम रत्ने प्रदान करावीत ही विनंती. ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३५

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** ऋभुगण **छन्द** – त्रिष्टुप्

इहोप यात शवसो नपातः सौधन्वना ऋभवो माप भूत ।
अस्मिन्हि वः सवने रत्नधेयं गमन्त्विन्द्रमनु वो मदासः॥१॥
हे शक्तीचे पुत्र आणि सुधन्व्याचे वंशज असलेल्या बुद्धिमान ऋभुदेवांनो आपण आमच्या यज्ञात यावे आणि आमच्यापासून दूर जाऊ नये ही विनंती. या यज्ञात आपल्याला मौल्यवान रत्ने प्राप्त होवोत आणि इंद्रदेवांच्या समवेत सोमरसाचा आनंद आपल्याला मिळो ही इच्छा ॥१॥

आगन्नृभूणामिह रत्नधेयमभूत्सोमस्य सुषुतस्य पीतिः ।
सुकृत्यया यत्स्वपस्यया चँ एकं विचक्र चमसं चतुर्धा॥२॥
या यज्ञामध्ये ऋभुदेवांनी अर्पण केलेली रत्ने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्राप्त होवोत. हे ऋभुदेवांनो ! आपण उत्तम प्रकारे सिद्ध केलेल्या सोमरसाचे प्राशन केले कारण आपण कौशल्याने आणि उत्तम कर्माने एका चमस पात्राचे चार भाग केलेत. ॥२ ॥

व्यकृणोत चमसं चतुर्धा सखे वि शिक्षेत्यब्रवीत ।
अथैत वाजा अमृतस्य पन्थां गणं देवानामृभवः सुहस्ताः ॥३॥
कुशल हातांनी काम करणाऱ्या हे ऋभुदेवांनो ! आपण चमस पात्राचे चार भाग केले आणि म्हणालात." हे मित्रा, तू हे ज्ञान प्राप्त कर (वि शिक्ष). त्यावर मित्राने उत्तर दिले,"शक्तिमान ऋभूदेवांनो, तुम्ही तुमच्या याच श्रेष्ठ कर्मामुळे अमरत्वाच्या मार्गावर मार्गस्थ झालात आणि देवांच्या समुदायात सामील झालात" ॥३ ॥

किम्मयः स्विच्चमस एष आस यं काव्येन चतुरो विचक्र ।
अथा सुनुध्वं सवनं मदाय पात ऋभवो मधुनः सोम्यस्य॥४॥
हे ऋभुदेवांनो ! ते सोमरस पिण्याचे चमस पात्र कशाचे बनलेले होते, ज्याला आपण आपल्या बुद्धीने आणि कलेने चार भागात विभागले. हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुम्ही ऋभुदेवांना प्रसन्न करण्यासाठी सोमरस सिद्ध करावा आणि हे ऋभुदेवांनो ! आपण या मधुर सोमरसाचे प्राशन करावे ही विनंती. ॥४॥

शच्याकर्त पितरा युवाना शच्याकर्त चमसं देवपानम् ।
शच्या हरी धनुतरावतष्टेन्द्रवाहावृभवो वाजरत्नाः ॥५॥
हे ऋभुदेवांनो ! आपण आपल्या सामर्थ्याने आपल्या वृद्ध माता-पित्यांना पुन्हा तरुण केलेत, चमस पात्राला चार भागांत विभागून देवांना पिण्यायोग्य पात्रे बनवली , आपल्या कौशल्याने इंद्रदेवांना स्वार होण्यासाठी अत्यंत चपळ असे दोन अश्व निर्माण केले. ॥५॥

यो वः सुनोत्यभिपित्वे अह्नां तीव्रं वाजासः सवनं मदाय ।
तस्मै रयिमृभवः सर्ववीरमा तक्षत वृषणो मन्दसानाः॥६॥
हे शक्तिशाली आणि ज्ञानदीप्त ऋभुदेवांनो ! जे यज्ञकर्ते भक्तगण दिवसाच्या समाप्तीसमयी आपल्या आनंदासाठी उत्साहवर्धक सोमरस अर्पण करतात, त्यांच्यावर प्रसन्न होऊन आपण त्या भक्तगणांना सर्व पराक्रमी पुत्र-पौत्रा-युक्त असे ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥६ ॥

प्रातः सुतमपिबो हर्यश्व माध्यंदिनं सवनं केवलं ते ।
समृभुभिः पिबस्व रत्नधेभिः सखीँर्याँ इन्द्र चकृषे सुकृत्या॥७॥

हरी नावाच्या अश्वांवर स्वार झालेल्या हे इंद्रदेवा ! आपण प्रातःकाळी सिद्ध केलेला सोमरस प्राशन केला आहे. मध्याह्नकाळी आपल्यासाठीच हा यज्ञविधी केला आहे. आपण आपल्या उत्तम कर्माने आपला सखा बनवले आहे, अशा मौल्यवान रत्ने प्रदान करणाऱ्या ऋभुदेवांसोबत सोमरस प्राशन करावा ही विनंती ॥७ ॥

ये देवासो अभवता सुकृत्या श्येना इवेदधि दिवि निषेद ।
ते रत्नं धात शवसो नपातः सौधन्वना अभवतामृतासः॥८॥
हे सुधन्वाचे पुत्र ऋभुदेवांनो ! आपण आपल्या उत्तम कर्मांद्वारे देवत्व प्राप्त केले आहे. श्येन पक्ष्याप्रमाणे आपण अंतराळात विराजमान आहा. हे शक्तीचे अक्षय्य स्वरूप असलेल्या ऋभुदेवांनो ! आपण अमरत्व प्राप्त केले आहे. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना धन आणि रत्ने प्रदान करावीत ही विनंती. ॥८॥

यत्तृतीयं सवनं रत्नधेयमकृणुध्वं स्वपस्या सुहस्ताः ।
तदृभवः परिषिक्तं व एतत्सं मदेभिरिन्द्रियेभिः पिबध्वम्॥९॥
हे कुशल हातांच्या ऋभुदेवांनो ! आपण उत्तम कर्माच्या परिश्रमाने ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या यज्ञाचा तिसरा विधी केला आहे. आपण आपल्या आनंददायी इंद्रियांनी हा उत्तम प्रकारे सिद्ध केलेला सोमरस प्राशन करावा ही विनंती ॥९ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३६

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** ऋभुगण **छन्द** – जगती ९ त्रिष्टुप्

अनश्वो जातो अनभीशुरुक्थ्यो रथस्त्रिचक्रः परि वर्तते रजः ।
महत्तद्वो देव्यस्य प्रवाचनं द्यामृभवः पृथिवीं यच्च पुष्यथ॥१॥
हे ऋभुदेवांनो ! अश्वांविना आणि लगामाविना चालणारा, तीन चाकांचा आणि स्तुतीस पात्र असा आपला हा अद्भुत रथ सर्व अंतराळात फिरत असतो. आपले हे दैवी सामर्थ्य आणि महान कर्तृत्व खरोखरच प्रशंसनीय आहे, ज्याद्वारे आपण आकाशलोक आणि पृथ्वीलोक या दोघांचेही पोषण करता॥१॥
(असा रथ ऋभुदेवांनी अश्विनीकुमारांना तयार करून दिला होता)

रथं ये चक्रुः सुवृतं सुचेतसोऽविह्वरन्तं मनसस्परि ध्यया ।
ताँ ऊ न्वस्य सवनस्य पीतय आ वो वाजा ऋभवो वेदयामसि॥२ ॥
शुद्ध अंतःकरण असलेल्या, मनाच्या एकाग्र ध्यानाने, अडखळत न चालणारा व सुबक असा तीन चाकी रथ तयार करणाऱ्या, हे वाज आणि ऋभुदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला सोमरस प्राशन करण्यासाठी आमंत्रित करत आहोत ॥२॥

तद्वो वाजा ऋभवः सुप्रवाचनं देवेषु विभ्वो अभवन्महित्वनम् ।
जिव्री यत्सन्ता पितरा सनाजुरा पुनर्युवाना चरथाय तक्षथ॥३ ॥
हे वाज, ऋभु आणि विभ्वदेवांनो !आपले सामर्थ्य आणि महती देवांमध्ये अत्यंत प्रशंसनीय आहे, कारण आपण आपल्या अत्यंत वृद्ध आणि अशक्त झालेल्या माता-पित्यांना पुन्हा तरुण बनवले आणि त्यांना पुन्हा कार्यक्षम केले. ॥३॥

एकं वि चक्र चमसं चतुर्वयं निश्चर्मणो गामरिणीत धीतिभिः ।
अथा देवेष्वमृतत्वमानश श्रुष्टी वाजा ऋभवस्तद्व उक्थ्यम्॥४ ॥
हे वाजदेवांनो आणि ऋभुदेवांनो! आपण एकाच यज्ञपात्राला, चमसाला, आपल्या कौशल्याने चार भागांत विभागले. आपण आपल्या बुद्धीच्या आणि कर्माच्या जोरावर कातडे नसलेल्या गायीला कातडे देऊन मुक्त केले. या महान कार्यामुळे आपल्याला अमरत्व प्राप्त झाले. आपले हे असामान्य कार्य खरोखरच स्तुतीस पात्र आहे ॥४ ॥

ऋभुतो रयिः प्रथमश्रवस्तमो वाजश्रुतासो यमजीजनन्नरः ।
विभ्वतष्टो विदथेषु प्रवाच्यो यं देवासोऽवथा स विचर्षणिः॥५ ॥
ज्या संपत्तीला, त्या सामर्थ्यशाली दिव्य वाजदेवांनी (वाजश्रुतास) उत्पन्न केले आहे आणि त्या संपत्तीला विभ्वदेवांनी अत्यंत कुशलतेने घडवली आहे अशी ऋभुदेवांनी निर्माण केलेली संपत्ती अत्यंत श्रेष्ठ आणि कीर्ती वाढवणारी आहे. ती संपत्ती यज्ञकर्मात सर्वांकडून प्रशंसा मिळवण्यास पात्र आहे. ज्या संपत्तीचे सर्व देव स्वतः रक्षण करतात, ती संपत्ती सर्वद्रष्टा आणि सर्वांना कल्याण प्रदान करणारी आहे.॥५ ॥

स वाज्यर्वा स ऋषिर्वचस्यया स शूरो अस्ता पृतनासु दुष्टरः ।
स रायस्पोषं स सुवीर्यं दधे यं वाजो विभ्वाँ ऋभवो यमाविषुः॥६ ॥
ज्या व्यक्तीला ऋभुदेव, विभ्वादेव आणि वाजदेव यांचे संरक्षण लाभते, अशी व्यक्ती खऱ्या अर्थाने शक्तिशाली (वाजी), शुभगुणांचा प्राप्तकर्ता (अर्वा) आणि तत्त्वद्रष्टा (ऋषी) बनते. ती व्यक्ती आपल्या उत्तम वाणीने आणि स्तुतीने प्रशंसनीय ठरते . अशी व्यक्ती रणांगणात अजेय असून शत्रूंचा नि:पात करणारा वीर योद्धा ठरते. त्या व्यक्तीला धन, दृढता, पुत्र-पौत्र लाभतात. ॥६॥

श्रेष्ठं वः पेशो अधि धायि दर्शतं स्तोमो वाजा ऋभवस्तं जुजुष्टन ।
धीरासो हि ष्ठा कवयो विपश्चितस्तान्व एना ब्रह्मणा वेदयामसि॥७ ॥
हे वाजदेवांनो आणि ऋभुदेवांनो ! आपण धारण केलेले रूप अत्यंत श्रेष्ठ आणि दर्शनीय आहे. आम्ही भक्तगणांनी आपल्यासाठी ही स्तुतियुक्त स्तोत्रे रचली आहेत त्याचा आपण स्वीकार करावा ही विनंती. आपण धैर्यवान, दूरदृष्टी असलेले कवी आणि सत्य-असत्य जाणणारे विद्वान आहात. आम्ही या मंत्रांद्वारे आमची स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्याला ऐकवत आहोत. ॥७॥

यूयमस्मभ्यं धिषणाभ्यस्परि विद्वांसो विश्वा नर्याणि भोजना ।
द्युमन्तं वाजं वृषशुष्ममुत्तममा नो रयिमृभवस्तक्षता वयः॥८ ॥
हे ऋभुदेवांनो ! आमच्या स्तुतीच्या बदल्यात, मानवजातीच्या हिताच्या, सर्व प्रकारच्या सात्त्विक, उपभोग्य वस्तु यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी निर्माण कराव्यात ही विनंती. आम्हाला तेजस्वी सामर्थ्य, सुख देणारे उत्तम ऐश्वर्य आणि उत्कृष्ट दीर्घायुष्य प्रदान करावे ही विनंती॥८॥.

इह प्रजामिह रयिं रराणा इह श्रवो वीरवत्तक्षता नः ।
येन वयं चितयेमात्यन्यान्तं वाजं चित्रमृभवो ददा नः॥९ ॥
हे ऋभुदेवांनो ! आपण आमच्या या यज्ञाने प्रसन्न होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम संतती, विपुल धन आणि शूरवीरांनी युक्त असे यश प्रदान करावे ही विनंती. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अशी अद्भुत आणि वैविध्यपूर्ण शक्ती प्रदान करावी ज्याच्या सहाय्याने आम्ही इतर सर्वांपेक्षा श्रेष्ठ ठरू शकू आणि आमची प्रगती होईल. ॥९॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३७

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** ऋभुगण **छन्द** – त्रिष्टुप् ५-८ अनुष्टुप्

उप नो वाजा अध्वरमृभुक्षा देवा यात पथिभिर्देवयानैः ।
यथा यज्ञं मनुषो विक्ष्वासु दधिध्वे रण्वाः सुदिनेष्वह्नाम् ॥१॥
हे शक्तीसंपन्न वाजदेवांनो आणि ऋभुदेवांनो ! ज्याप्रमाणे देवता शुभदिवसाला वेगवेगळ्या मार्गांनी येतात त्याप्रमाणे आपण विचारशील माणसांच्या, भक्तगणांच्या, (जीवनरूपी) यज्ञात आपल्या देवतांच्या दिव्य मार्गांनी यज्ञस्थानी यावे ही विनंती ॥१॥

ते वो हृदे मनसे सन्तु यज्ञा जुष्टासो अद्य घृतनिर्णिजो गुः ।
प्र वः सुतासो हरयन्त पूर्णाः क्रत्वे दक्षाय हर्षयन्त पीताः॥२॥
हे ऋभुदेवांनो ! आज घृताने संस्कारित केलेला, यज्ञात अर्पण केलेला सोमरस आपल्या हृदयाला आणि मनाला आनंद देवो. चमस पात्रामध्ये काठोकाठ भरलेला सोमरस प्राशन करून आपल्याला आनंद देऊन महान कार्यासाठी बल निर्माण करो. ॥२ ॥

त्र्युदायं देवहितं यथा वः स्तोमो वाजा ऋभुक्षणो ददे वः ।
जुह्वे मनुष्वदुपरासु विक्षु युष्मे सचा बृहद्दिवेषु सोमम्॥३॥
हे वाजदेवांनो आणि ऋभुदेवांनो ! ज्याप्रमाणे यज्ञाच्या तीन विधींमध्ये देवतांना प्रिय असलेली स्तुतियुक्त स्तोत्रे आपल्याला समर्पित केली जातात त्याप्रमाणे श्रेष्ठ मानवांमध्ये तेजस्वी जीवन जगणारे आम्ही भक्तगण आपल्याला हा सोमरस अर्पण करत आहोत. ॥३॥

पीवोअश्वाः शुचद्रथा हि भूतायःशिप्रा वाजिनः सुनिष्काः ।
इन्द्रस्य सूनो शवसो नपातोऽनु वश्चेत्यग्रियं मदाय॥४॥
हे बलवान ऋभुदेवांनो ! आपल्याकडे धष्टपुष्ट अश्व आणि तेजस्वी रस आहेत. आपण लोखंडासारखे कणखर असून सुंदर सुवर्णालंकारांनी सुशोभित आहात. हे इंद्रदेवांच्या पुत्रांनो आणि सामर्थ्यशाली वंशजांनो ! आनंदासाठी केलेले आपले श्रेष्ठ कर्म सर्वांना परिचित आहे ॥४॥

ऋभुमृभुक्षणो रयिं वाजे वाजिन्तमं युजम् ।
इन्द्रस्वन्तं हवामहे सदासातममश्विनम् ॥५॥
हे ऋभुदेवांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, युद्धात साथ देणाऱ्या, अत्यंत शक्तिमान, इंद्रदेवांशी संबंधित, नेहमीच यश मिळवणाऱ्या ऐश्वर्याचे आवाहन करतो. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अश्वांप्रमाणे वेगवान आणि सामर्थ्यशाली शक्तीचे आवाहन करतो. ॥५॥

सेदृभवो यमवथ यूयमिन्द्रश्च मर्त्यम् ।
स धीभिरस्तु सनिता मेधसाता सो अर्वता॥६॥
हे ऋभुदेवांनो ! आपण आणि इंद्रदेव ज्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करता, तो भक्त आपल्या बुद्धीने आणि श्रेष्ठ कर्मांनी धन प्राप्त करणारा होवो आणि यज्ञामध्ये अश्वांनी संपन्न होवो ॥६॥.

वि नो वाजा ऋभुक्षणः पथश्चितन यष्टवे ।
अस्मभ्यं सूरयः स्तुता विश्वा आशास्तरीषणि॥७॥
हे वाजदेवांनो आणि ऋभुदेवांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना यज्ञ करण्याचा मार्ग स्पष्ट करावा ही विनंती. आम्ही भक्तगण करत असलेल्या

स्तुतीमुळे आम्हाला सर्व दिशा (सर्व अडथळे) पार करून जाण्यासाठी समर्थ करावे ही विनंती. ॥७ ॥

तं नो वाजा ऋभुक्षण इन्द्र नासत्या रयिम् ।
समश्वं चर्षणिभ्य आ पुरु शस्त मघत्तये॥८ ॥
हे वाजदेवा, ऋभुदेवांनो, इंद्रदेवा आणि अश्विनीकुमारांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी आणि आम्हाला दानशूर बनविण्यासाठी उत्तम अश्वयुक्त असे विपुल धन आणि ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥८ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३८

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** दधिक्रा; १ द्यावापृथ्वी **छन्द** – त्रिष्टुप्

(दधिक्रा हे प्रामुख्याने पुरू जमातीवर राज्य करणाऱ्या
राजा त्रसदास्यूच्या अश्वमेध यज्ञासाठी निवडलेले दैवी अश्व असल्याचे मानले जाते)

उतो हि वां दात्रा सन्ति पूर्वा या पूरुभ्यस्त्रसदस्युर्नितोशे ।
क्षेत्रासां ददथुरुर्वरासां घनं दस्युभ्यो अभिभूतिमुग्रम् ॥१॥

हे आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता ! आपण पुरु वंशाच्या हितासाठी 'त्रसदस्यु' राजाला शत्रूंच्या नाशासाठी दिलेलीप्राचीन दाने प्रसिद्ध आहेत. आपण 'त्रसदस्यु' राजाला, दस्यूंसाठी भयंकर आणि पराभूत करणारा, भूप्रदेश आणि सुपीक जमिनी जिंकून देणारा असा दधिक्रा नावाचा दिव्य अश्व दिला. ॥१ ॥

उत वाजिनं पुरुनिष्षिध्वानं दधिक्रामु ददथुर्विश्वकृष्टिम् ।
ऋजिप्यं श्येनं प्रुषितप्सुमाशुं चर्कृत्यमर्यो नृपतिं न शूरम् ॥२ ॥

हे आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता ! आपण शत्रूंचा प्रतिकार करणारा, सर्व लोकांचे रक्षण करणारा, सरळ मार्गाने जाणारा, श्येन पक्षाप्रमाणे वेगवान आणि अत्यंत तेजस्वी, वीर राजकुमारासारखा शत्रूंचा नाश करणारा दधिक्रा नावाचा अश्व दिला ॥२॥

यं सीमनु प्रवतेव द्रवन्तं विश्वः पूरुर्मदति हर्षमाणः ।
पड्भिर्गृध्यन्तं मेधयुं न शूरं रथतुरं वातमिव ध्रजन्तम् ॥३॥

ज्याप्रमाणे उतारावरून वेगाने वाहणाऱ्या पाण्याला पाहून सर्व लोक आनंदित होतात, त्याप्रमाणे सर्वजण या वेगाने धावणाऱ्या दधिक्रा अश्वाला पाहून हर्षित

होतात. युद्धासाठी उत्सुक असलेल्या नायकाप्रमाणे पाय रोवून, वाऱ्यासारख्या वेगाने धावणारा आणि रथाला गती देणारा हा दधिक्रा नावाचा अश्व सर्वांना आनंद देणारा आहे. ॥३ ॥

यः स्मारुन्धानो गध्या समत्सु सनुतरश्चरति गोषु गच्छन् ।
आविऋजीको विदथा निचिक्यत्तिरो अरतिं पर्याप आयोः ॥४॥
जो, युद्धांमध्ये शत्रूंना चहुबाजूंनी रोखून धरतो, जो अत्यंत वेगाने भूमीवर संचार करतो, ज्याचे तेज उघड आहे. जो, सर्व काही जाणून शत्रूंच्या विरोधाचा बिमोड करतो असा दधिक्रा नावाचा अश्व यज्ञाचे रक्षण करतो. ॥४ ॥

उत स्मैनं वस्त्रमथिं न तायुमनु क्रोशन्ति क्षितयो भरेषु ।
नीचायमानं जसुरिं न श्येनं श्रवश्चाच्छा पशुमच्च यूथम् ॥५॥
ज्याप्रमाणे वस्त्र चोरणाऱ्या चोराला पाहून लोक ओरडतात, त्याप्रमाणे युद्धाच्या प्रसंगी या दधिक्रा अश्वाला पाहून शत्रू आरडाओरडा करतात . ज्याप्रमाणे एखादा भुकेलेला श्येनपक्षी अन्नाच्या शोधात खाली झेपावतो, त्या प्रमाणे अन्न आणि पशुधन मिळवण्याच्या उद्देशाने दौडणाऱ्या दधिक्राला पाहून सर्व शत्रू पळून जातात ॥५ ॥

उत स्मासु प्रथमः सरिष्यन्नि वेवेति श्रेणिभी रथानाम् ।
स्रजं कृण्वानो जन्यो न शुभ्वा रेणुं रेरिहत्किरणं ददश्वान् ॥६॥
हा दिव्य दधिक्राअश्व रथांच्या रांगांमध्ये सर्वात पुढे धावणारा आहे. ज्याप्रमाणे एखादा मैत्रीपूर्ण माणूस आपल्याला फुलांच्या माळांनी अलंकृत करून घेतो त्याप्रमाणे हा फुलांच्या माळांनी अलंकृत झालेला दधिक्राअश्व वेगाने धूळ उडवत दौडतो. ॥६ ॥

उत स्य वाजी सहुरिऋतावा शुश्रूषमाणस्तन्वा समर्ये ।
तुरं यतीषु तुरयन्नृजिप्योऽधि भ्रुवोः किरते रेणुमृञ्जन् ॥७॥
प्रसिद्ध शक्तिशाली दधिक्रा अश्व, शत्रूंचा पराभव करणारा आणि सत्याचे पालन करणारा आहे. तो युद्धप्रसंगी आपल्या संपूर्ण शक्तीने सेवा करण्यास सज्ज असतो. शीघ्रगतीने धावणाऱ्यांमध्ये तो अधिक वेगवान असून, सरळ मार्गाने झेप घेताना तो आपल्या पायांनी धूळ उडवत पुढे जातो आणि आपल्या तेजाने सर्वांना प्रसन्न करतो. ॥७॥

उत स्मास्य तन्यतोरिव द्योर्ऋघायतो अभियुजो भयन्ते ।
यदा सहस्रमभि षीमयोधीद्दुर्वर्तुः स्मा भवति भीम ऋञ्जन् ॥८॥
आकाशातील गर्जना करणाऱ्या विजेप्रमाणे, जेव्हा दिव्य दधिक्राअश्व शत्रूंचा नाश करण्यासाठी धावतो, तेव्हा आक्रमण करणारे सर्व शत्रू भयभीत होतात. जेव्हा हा अजिंक्य दिव्य दधिक्राअश्व सहस्र शत्रूंशी सर्व बाजूंनी युद्ध करतो, तेव्हा हा शत्रूंसाठी अत्यंत भयंकर भासतो. ॥८॥

उत स्मास्य पनयन्ति जना जूतिं कृष्टिप्रो अभिभूतिमाशोः ।
उतैनमाहुः समिथे वियन्तः परा दधिक्रा असरत्सहस्रैः ॥९॥
मानवजातीच्या इच्छांची पूर्तता करणाऱ्या या दिव्य दधिक्रा अश्वाची सर्वजण प्रशंसा करतात. युद्ध प्रसंगी शत्रू चोहोबाजूला पळतात तेव्हा शत्रू म्हणतात, "हा दिव्य दधिक्रा आपल्या हजारो शक्तींच्या बळावर शत्रूंच्या विरोधात निघाला आहे." ॥९॥

आ दधिक्राः शवसा पञ्च कृष्टीः सूर्य इव ज्योतिषापस्ततान ।
सहस्रसाः शतसा वाज्यर्वा पृणक्तु मध्वा समिमा वचांसि ॥१०॥

ज्याप्रमाणे सूर्यदेव आपल्या प्रकाशाने संपूर्ण जगाला प्रकाशित करतात , त्याप्रमाणे सामर्थ्यशाली दिव्य दधिक्रा आपल्या शक्तीने पाचही कष्टकरी लोकांना (पञ्चकृष्टी) सन्मार्गावर जाण्यास प्रवृत्त करतो. हजारो आणि शेकडो लाभ मिळवून देणारा हा दिव्य दधिक्राअश्व आमच्या प्रार्थनांना मधुरतेने आणि आनंदाने भारावून टाको. ॥१० ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-३९

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** दधिक्रा **छन्द** – त्रिष्टुप् ६ अनुष्टुप्

आशुं दधिक्रां तमु नु ष्टवाम दिवस्पृथिव्या उत चर्किराम ।
उच्छन्तीर्मामुषसः सूदयन्त्वति विश्वानि दुरितानि पर्षन् ॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण शीघ्रगामी दिव्य दधिक्रा अश्वाची स्तुती करतो. आकाश आणि पृथ्वीवर आम्ही त्याचे गुणगान गातो. अंधाराचा नाश करणाऱ्या या उषादेवता आम्हाला मार्ग दाखवोत आणि आम्हाला सर्व संकटांतून व पापांतून सुखरूपपणे पार नेवोत. ॥१ ॥

महश्चर्कर्म्यर्वतः क्रतुप्रा दधिक्राव्णः पुरुवारस्य वृष्णः ।
यं पूरुभ्यो दीदिवांसं नाग्निं ददथुर्मित्रावरुणा ततुरिम् ॥२॥
ज्याप्रमाणे अग्निदेव मनुष्यांना प्रकाश देतो, त्याप्रमाणे मित्रदेवांनी आणि वरुणदेवांनी पुरुवंशातील लोकांसाठी या तेजस्वी आणि संकटातून पार नेणाऱ्या दधिक्रा नामक अश्वाचे दान केले आहे. अशा त्या अत्यंत इच्छित, सामर्थ्यवान आणि महान संकल्प पूर्ण करणाऱ्या दधिक्राची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण वारंवार स्तुती करतो. ॥२॥

यो अश्वस्य दधिक्राव्णो अकारीत्समिद्धे अग्ना उषसो व्युष्टौ ।
अनागसं तमदितिः कृणोतु स मित्रेण वरुणेना सजोषाः ॥३॥
जे यज्ञकर्ते भक्तगण, उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी अग्निदेवांना प्रदीप्त करत अश्वाच्या रूपातील दिव्य दधिक्राची स्तुती करतात त्या भक्तगणांना दधिक्रा, आदिती देवता, मित्रदेव आणि वरुणदेवांबरोबर पापांपासून मुक्त करतात. ॥३॥

दधिक्राव्ण इष ऊर्जो महो यदमन्महि मरुतां नाम भद्रम् ।
स्वस्तये वरुणं मित्रमग्निं हवामह इन्द्रं वज्रबाहुम् ॥४॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण अन्नासाठी आणि महान शक्तीसाठी दिव्य दधिक्राचे आणि मरुद्गणांचे स्मरण करत आहोत. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या कल्याणासाठी वरुणदेव, मित्रदेव, अग्निदेव आणि वज्रधारी इंद्रदेवांचे आवाहन करतो. ॥४ ॥

इन्द्रमिवेदुभये वि ह्वयन्त उदीराणा यज्ञमुपप्रयन्तः ।
दधिक्रामु सूदनं मर्त्याय ददथुर्मित्रावरुणा नो अश्वम् ॥५ ॥
ज्याप्रमाणे युद्धात विजय मिळवण्यासाठी वीर लोक इंद्रदेवांचे आवाहन करतात, त्याचप्रमाणे यज्ञासाठी सज्ज झालेले आणि प्रगतीची इच्छा धरणारे दोन्ही प्रकारचे लोक दिव्य दधिक्राला हाक मारतात. हे मित्रदेवा आणि वरुणदेवा ! आपण आम्हा भक्तगणांना सन्मार्गाची प्रेरणा देणारा आणि शत्रूंचे निवारण करणारा हा दिव्य दधिक्रा अश्व प्रदान केला आहे. ॥५ ॥

दधिक्राव्णो अकारिषं जिष्णोरश्वस्य वाजिनः ।
सुरभि नो मुखा करत्प्र ण आयूंषि तारिषत् ॥६॥
आम्ही भक्तगण त्या जयशील, बलशाली आणि वेगवान, दिव्य अश्वाच्या रूपातील दधिक्राची स्तुती करत आहोत. हे दधिक्रा ! आपण मुखाला आणि सर्व इंद्रियांना आनंदित करावे आणि आमचे आयुष्य दीर्घ करावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४०

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** दधिक्रा ५ सूर्यदेव **छन्द** – जगती, १ त्रिष्टुप्

दधिक्राव्ण इदु नु चर्किराम विश्वा इन्मामुषसः सूदयन्तु ।
अपामग्नेरुषसः सूर्यस्य बृहस्पतेराङ्गिरसस्य जिष्णोः ॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण निश्चयपूर्वक दिव्य दधीक्राची स्तुती करतो. उषादेवतेच्या आगमनाची वेळ आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना शुभकर्म करण्यासाठी प्रेरित करते. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण जलदेवता, अग्निदेव, उषादेवता, सूर्यदेव आणि आङ्गिरस कुळातील विजयी अशा बृहस्पती देवतेची स्तुती करतो. ॥१ ॥

सत्वा भरिषो गविषो दुवन्यसच्छ्रवस्यादिष उषसस्तुरण्यसत् ।
सत्यो द्रवो द्रवरः पतंगरो दधिक्रावेषमूर्जं स्वर्जनत् ॥२॥
अन्नाचा लाभ करून देणारा, गायींची प्राप्ती करून देणारा आणि वेगाने धावणारा दिव्य दधिक्रा अश्व कीर्तीच्या इच्छेने उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी त्वरेने कार्य करतो. सत्यस्वरूप, अतिशय वेगवान आणि पक्ष्यासारखी झेप घेणारा दिव्य दधिक्रा अश्व, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अन्न, ऊर्जा आणि स्वर्गसुख प्रदान करो ॥२ ॥

उत स्मास्य द्रवतस्तुरण्यतः पर्णं न वेरनु वाति प्रगर्धिनः ।
श्येनस्येव ध्रजतो अङ्कसं परि दधिक्राव्णः सहोर्जा तरित्रतः ॥३॥
ज्याप्रमाणे वेगाने झेप घेणाऱ्या श्येनपक्ष्याच्या मागे वारा वाहतो, त्याचप्रमाणे अत्यंत वेगाने धावणाऱ्या आणि आपल्या लक्ष्याकडे झेपावणाऱ्या दिव्य दधिक्रा अश्वाचे भक्तगणांनी अनुसरण केले पाहिजे. दिव्य दधिक्रा अश्व

आपल्या प्रचंड शक्तीने सर्व संकटांना आणि मार्गातील अडथळ्यांना पार करून वेगाने पुढे जातो. ॥३॥

उत स्य वाजी क्षिपणिं तुरण्यति ग्रीवायां बद्धो अपिकक्ष आसनि ।
क्रतुं दधिक्रा अनु संतवीत्वत्पथामङ्कांस्यन्वापनीफणत् ॥४॥
शक्तिशाली दिव्य दधिक्रा आपल्या गळ्यात, बगलेत आणि मुखात वेसण व लगाम लावून बांधलेला असतानाही अत्यंत वेगाने धावतो. बलशाली होऊन दिव्य दधिक्रा यज्ञाच्या मार्गातील वळणांना आणि अडथळ्यांना मागे टाकत आपल्या संकल्पाकडे(क्रतुम्) वेगाने झेपावतो. ॥४॥

हंसः शुचिषद्वसुरन्तरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोणसत् ।
नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजा ऋतजा अद्रिजा ऋतम् ॥५ ॥
निर्मळ आकाशात निवास करणारे सूर्यदेव, सर्वत्र निवास करणारे वायुदेव, यज्ञवेदीमध्ये निवास करणारे आणि अतिथीच्या रूपाने घराघरातील अग्निदेव ही सर्व एकाच परमात्म्याची रूपे आहेत. परमात्मा मानवांमध्ये, श्रेष्ठांमध्ये, सत्यामध्ये आणि आकाशात सर्वत्र आहे. जलातून, पृथ्वीतून, सत्यातून आणि पर्वतातून परमात्मा जन्म घेतात. परमात्मा स्वतःच अंतिम आणि शाश्वत सत्य आहे ॥५ ॥
(हंस हा केवळ एक पक्षी नसून, तो आत्मा, ज्ञान आणि ईश्वराचा प्रतीक, परमात्मा. मानला जातो.)

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४१

ऋषि- वामदेव गौतम, **देवता** इंद्र वरुण **छन्द** –त्रिष्टुप्

इन्द्रा को वां वरुणा सुम्नमाप स्तोमो हविष्माँ अमृतो न होता ।
यो वां हृदि क्रतुमाँ अस्मदुक्तः पस्पर्शदिन्द्रावरुणा नमस्वान् ॥१॥
हे इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपली, आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी हविष्यान्नाची आहुती देत उच्चारलेले, श्रेष्ठ बुद्धीने युक्त आणि अत्यंत नम्रतेने केलेले कोणते स्तोत्र आपल्याला प्रसन्न करेल? ॥१ ॥

इन्द्रा ह यो वरुणा चक्र आपी देवौ मर्तः सख्याय प्रयस्वान् ।
स हन्ति वृत्रा समिथेषु शत्रूनवोभिर्वा महद्भिः स प्र शृण्वे ॥२॥
हे इंद्रदेवा आणि वरुणदेवा ! जे प्रयत्नशील यज्ञकर्ते भक्तगण युद्धप्रसंगी आपल्याला मदतीसाठी बोलवतात. ते भक्तगण संग्राममध्ये आपल्या महान रक्षणकर्त्यांच्या सहाय्याने शत्रूंचा आणि पापांचा नाश करतात. असे भक्तगण, आपल्या पराक्रमामुळे आणि देवतांच्या कृपेमुळे प्रसिद्ध होतात. ॥२ ॥

इन्द्रा ह रत्नं वरुणा धेष्ठेत्था नृभ्यः शशमानेभ्यस्ता ।
यदी सखाया सख्याय सोमैः सुतेभिः सुप्रयसा मादयैते ॥३॥
हे इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! जे यज्ञकर्ते भक्तगण आपली मनःपूर्वक स्तुती करतात, त्यांना आपण मूल्यवान वैभव दान करता. आपण दोघे मैत्रीच्या भावनेने यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेल्या शुद्ध आणि उत्तम सोमरसाने तृप्त होता, तेव्हा आपण भक्तगणांवर आनंदाने धनाचा वर्षाव करता ॥३ ॥

इन्द्रा युवं वरुणा दिद्युमस्मिन्नोजिष्ठमुग्रा नि वधिष्टं वज्रम् ।

यो नो दुरेवो वृकतिर्दभीतिस्तस्मिन्निमाथामभिभूत्योजः ॥४॥
हे भयंकर इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! दुष्ट प्रवृत्तीच्या, लांडग्याप्रमाणे हिंस्र आणि फसवणूक करणाऱ्या शत्रूंवर आपल्या बलवान, तेजस्वी वज्राने प्रहार करावा आणि शत्रूला पराभूत करण्यासाठी आपले सर्वश्रेष्ठ विजयशाली सामर्थ्य आमच्यासाठी प्रकट करावे ही विनंती. ॥४ ॥

इन्द्रा युवं वरुणा भूतमस्या धियः प्रेतारा वृषभेव धेनोः ।
सा नो दुहीयद्यवसेव गत्वी सहस्रधारा पयसा मही गौः ॥५॥
हे इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! ज्याप्रमाणे वृषभ (बैल), गायीला प्रेरणा देतो त्याप्रमाणे आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कर्माला प्रेरणा द्यावी ही विनंती. ज्याप्रमाणे एखादी गाय उत्तम चाऱ्याच्या ठिकाणी जाऊन तृप्त होते आणि हजारो धारांनी दूध देते, त्याप्रमाणे आमची ही बुद्धी आम्हाला हजारो समृद्धीची फळे देवो ही विनंती. ॥५ ॥

तोके हिते तनय उर्वरासु सूरो दृशीके वृषणश्च पौंस्ये ।
इन्द्रा नो अत्र वरुणा स्यातामवोभिर्दस्मा परितक्म्यायाम् ॥६॥
हे इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आम्हाला पुत्र-पौत्रादि संतती देण्यासाठी, सुपीक भूमी देण्यासाठी, प्रजोत्पत्तीची शक्ती देण्यासाठी, दीर्घकाळ सूर्यदेवाला पाहण्यासाठी, आमचे कल्याण करण्यासाठी, आपण आपल्या संरक्षणाच्या साधनांसह आमच्यावर सर्व बाजूंनी येणाऱ्या संकटांचा आणि शत्रूंचा नाश करण्यासाठी आमच्या यज्ञस्थळी उपस्थित रहावे ही विनंती. ॥६ ॥

युवामिद्ध्यवसे पूर्व्याय परि प्रभूती गविषः स्वापी ।
वृणीमहे सख्याय प्रियाय शूरा मंहिष्ठा पितरेव शम्भू ॥७॥

हे इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! गायींची (संपत्तीची) इच्छा करणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, संरक्षणासाठी आणि आपल्या प्रिय मैत्रीची आणि प्रेमाची याचना करतो. हे शूर, अत्यंत दानशूर आणि पुरातन इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण माता-पित्यांप्रमाणे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे कल्याण करणारे, उत्तम बंधु आहा. ॥७॥

ता वां धियोऽवसे वाजयन्तीराजिं न जग्मुर्युवयूः सुदानू ।
श्रिये न गाव उप सोममस्थुरिन्द्रं गिरो वरुणं मे मनीषाः ॥८॥
हे सुंदर फळे देणाऱ्या इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! ज्याप्रमाणे गायी समृद्धीसाठी सोमरसाकडे किंवा दुभत्यासाठी गोठ्याकडे आनंदाने वळतात, त्याचप्रमाणे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची ही शक्तीची इच्छा करणारी स्तुतियुक्त स्तोत्रे आणि बुद्धीतील विचार आपण दोघांकडे वेगाने पोहोचवावेत. ॥८॥

इमा इन्द्रं वरुणं मे मनीषा अग्मन्नुप द्रविणमिच्छमानाः ।
उपेमस्थुर्जोष्टार इव वस्वो रघ्वीरिव श्रवसो भिक्षमाणाः ॥९॥
ज्याप्रमाणे संपत्तीची इच्छा करणारा एखादा आश्रित धनवानाकडे जातो, त्याप्रमाणे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांनी विनम्रपणे केलेली स्तुतियुक्त स्तोत्रे रक्षणाची इच्छा धरून आपल्यापर्यंत पोहोचतात. हविष्यान्नाच्या आहुती देणाऱ्या आम्हा भक्तगणांची ही स्तुती आपल्याला तृप्त आणि प्रसन्न करणारी आहे. ॥९॥

अश्व्यस्य त्मना रथ्यस्य पुष्टेर्नित्यस्य रायः पतयः स्याम ।
ता चक्राणा ऊतिभिर्नव्यसीभिरस्मत्रा रायो नियुतः सचन्ताम् ॥१०॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या स्वतःच्या प्रयत्नांनी आणि सामर्थ्याने अश्व, रथ, सामर्थ्य आणि चिरस्थायी संपत्तीचे स्वामी होण्याची इच्छा करतो. हे इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आपल्या नवनवीन संरक्षणाच्या साधनांसह आम्हाला विपुल धन आणि कायमस्वरूपी ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती ॥१० ॥

आ नो बृहन्ता बृहतीभिरूती इन्द्र यातं वरुण वाजसातौ ।
यद्दिद्यवः पृतनासु प्रक्रीळान्तस्य वां स्याम सनितार आजेः ॥११ ॥
हे अत्यंत सामर्थ्यशाली इंद्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपण आपल्या महान संरक्षण साधनांसह आमच्या या युद्धात सहभागी व्हावे ही विनंती. जेव्हा रणभूमीवर सैन्यामध्ये तेजस्वी शस्त्रास्त्रे चमकत असतात, तेव्हा आपल्या कृपेने आम्ही यज्ञकर्ते भक्तगण त्या युद्धात पराक्रम गाजवणारे आणि विजयी ठरणारे होऊ. ॥११ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४२

ऋषि- त्रसदस्यु पौरुकुत्स्य , **देवता** १-६ आत्मस्तुती, ७-१० इंद्र वरुण **छन्द** –त्रिष्टुप्

त्रसद्दस्यु -ज्याला पाहून दस्यु (शत्रू) भयाने थरथर कापतात.

पौरुकुत्स्य- पुरुकुत्साचा मुलगा. इंद्र आणि वरुण या दोन श्रेष्ठ देवतांच्या शक्तीं असलेला राजा

मम द्विता राष्ट्रं क्षत्रियस्य विश्वायोर्विश्वे अमृता यथा नः ।
क्रतुं सचन्ते वरुणस्य देवा राजामि कृष्टेरुपमस्य वव्रेः ॥१॥

त्रसदस्यु पौरुकुत्स्य आत्मस्तुती करत म्हणतात," माझे हे दुहेरी राज्य एका क्षत्रियाचे आणि संपूर्ण आयुष्य असणाऱ्याचे आहे. सर्व अमरदेवगण, वरुणदेवांच्या संकल्पाचे (क्रतुम्) आणि शक्तीचे अनुकरण करतात. मी वरुणदेव या श्रेष्ठ मानवी प्रजेवर आणि त्यांच्या रूपांवर राज्य करतो." ॥१ ॥

अहं राजा वरुणो मह्यं तान्यसुर्याणि प्रथमा धारयन्त ।
क्रतुं सचन्ते वरुणस्य देवा राजामि कृष्टेरुपमस्य वव्रेः ॥२॥

त्रसदस्यु पौरुकुत्स्य आत्मस्तुती करत म्हणतात, "मी वरुणराजा आहे. माझ्यासाठी देवगणांनी सर्वोच्च दैवीशक्ती (असुर्याणि) सांभाळल्या आहेत. सर्व अमरदेवगण वरुणदेवांच्या संकल्पाचे (क्रतुम्) आणि शक्तीचे अनुकरण करतात. मी वरुणदेव या श्रेष्ठ मानवी प्रजेवर आणि त्यांच्या रूपांवर राज्य करतो." ॥२॥

अहमिन्द्रो वरुणस्ते महित्वोर्वी गभीरे रजसी सुमेके ।
त्वष्टेव विश्वा भुवनानि विद्वान्त्समैरयं रोदसी धारयं च ॥३॥

त्रसदस्यु पौरुकुत्स्य आत्मस्तुती करत म्हणतात,"मीच इंद्रदेव आणि मीच वरुणदेव आहे. माझ्या महिम्याने मी या विस्तीर्ण, गंभीर आणि सुनिर्मित अशा आकाश व पृथ्वीला व्यापले आहे. ज्याप्रमाणे त्वष्टदेव सर्व सृष्टी निर्माण करतो, त्याप्रमाणे मी सर्व लोकांच्या स्वरूपाला ओळखून त्यांना प्रेरित करतो आणि आकाश व पृथ्वीला आधार देतो. ॥३ ॥.

अहमपो अपिन्वमुक्षमाणा धारयं दिवं सदन ऋतस्य ।
ऋतेन पुत्रो अदितेऋतावोत त्रिधातु प्रथयद्वि भूम ॥४॥
त्रसदस्यु पौरुकुत्स्य आत्मस्तुती करत म्हणतात, "मी सिंचन करणाऱ्या जलाला प्रवाहित केले. सत्याच्या अधिष्ठानावर मी आकाशाला आधार दिला. सत्याच्या सामर्थ्याने मी 'अदितीचा पुत्र' आणि सत्याचा रक्षक बनलो, तसेच मी या विस्तीर्ण पृथ्वीला तिन्ही रूपांत विस्तारित केले. " ॥४॥

मां नरः स्वश्वा वाजयन्तो मां वृताः समरणे हवन्ते ।
कृणोम्याजिं मघवाहमिन्द्र इयर्मि रेणुमभिभूत्योजाः ॥५॥
त्रसदस्यु पौरुकुत्स्य आत्मस्तुती करत म्हणतात, "उत्तम अश्व बाळगणारे आणि विजयाची आकांक्षा धरणारे वीर पुरुष रणसंग्रामात मलाच साद घालतात. मी अत्यंत ऐश्वर्यशाली, धनांचा स्वामी आणि खऱ्या संपत्तीवर विजय मिळवून देणारा मघवान (इंद्रदेव) आहे. मीच शत्रूचा पराभव करण्याच्या शक्तीने धुळीचे लोट उडवतो. ॥५ ॥

अहं ता विश्वा चकरं नकिर्मा दैव्यं सहो वरते अप्रतीतम् ।
यन्मा सोमासो ममदन्यदुक्थोभे भयेते रजसी अपारे ॥६॥
त्रसदस्यु पौरुकुत्स्य आत्मस्तुती करत म्हणतात, "मी ती सर्व अद्भुत आणि पराक्रमी कर्मे करतो. असीम आणि अतुलनीय अशा माझ्या दैवी बलाला

कोणीही रोखू शकत नाही. जेव्हा सोमरस आणि पवित्र स्तुतियुक्त स्तोत्रे मला आनंदित व तृप्त करतात, तेव्हा हे अथांग आणि सीमाहीन असलेले दोन्ही स्वर्गलोक आणि पृथ्वीलोक माझ्या भयाने थरथर कापतात." ॥६ ॥

विदुष्टे विश्वा भुवनानि तस्य ता प्र ब्रवीषि वरुणाय वेधः ।
त्वं वृत्राणि शृण्विषे जघन्वान्त्वं वृताँ अरिणा इन्द्र सिन्धून् ॥७॥
हे सर्वज्ञ विधात्या वरुणदेवा ! सर्व लोक आपल्या महान कर्माला जाणतात. आपणच स्वतःच्या दिव्य स्वरूपातील ही सर्व रहस्ये किंवा सत्ये स्पष्टपणे प्रकट करता. हे इंद्रदेवा ! आपण वृत्रासुराचा वध करणारे म्हणून प्रसिद्ध आहात आणि आपणच अडवून ठेवलेल्या नद्यांना पुन्हा प्रवाहित केले. ॥७ ॥

अस्माकमत्र पितरस्त आसन्त्सप्त ऋषयो दौर्गहे बध्यमाने ।
त आयजन्त त्रसदस्युमस्या इन्द्रं न वृत्रतुरमर्धदेवम् ॥८॥
जेव्हा दुर्गहाचा पुत्र पुरुकुत्स बंधनात होता, तेव्हा पूर्वज असलेले सप्तर्षी, रक्षक म्हणून उपस्थित होते. सप्तर्षींनी यज्ञाद्वारे पुरुकुत्साच्या पत्नीपासून, इंद्रदेवांप्रमाणे वृत्रासुराचा नाश करणारा आणि अर्ध-देव (दैवी गुणसंपन्न) त्रसद्दस्युला प्राप्त केले. ॥८ ॥

पुरुकुत्सानी हि वामदाशद्भव्येभिरिन्द्रावरुणा नमोभिः ।
अथा राजानं त्रसदस्युमस्या वृत्रहणं ददथुरर्धदेवम् ॥९॥
हे इंद्रदेवा आणि वरुणदेवा ! पुरुकुत्साच्या पत्नीने नानाविध हविष्यान्नाची आहुती देऊन आपली उपासना केली. त्यानंतर आपण वृत्रासुराचा नाश करणारा आणि अर्ध-देवतेप्रमाणे पराक्रमी त्रसद्दस्यु नावाचा राजपुत्र तिला दिलात. ॥९ ॥

राया वयं ससवांसो मदेम हव्येन देवा यवसेन गावः ।
तां धेनुमिन्द्रावरुणा युवं नो विश्वाहा धत्तमनपस्फुरन्तीम् ॥१० ॥
हे इंद्रदेवा आणि वरुणदेवा ! देवता ज्याप्रमाणे हविष्यान्नाच्या आहुतीने संतुष्ट होतात आणि गायी चांगल्या चाऱ्याने तृप्त होतात, त्याचप्रमाणे आम्ही भक्तगण आपल्या कृपेने मिळालेल्या धनाने सदैव आनंदी व संपन्न राहू. हे इंद्रदेवा आणि वरुणदेवा ! आपण आम्हाला कधीही न संपणारी, सदैव आमचे कल्याण करणारी संपत्ती प्रदान करावी ही विनंती. ॥१० ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४३

ऋषि- पुरुमिळह सौहोत्र आणि अजमीळह सौहोत्र **देवता** अश्विनीकुमार, **छन्द** –त्रिष्टुप्

क उ श्रवत्कतमो यज्ञियानां वन्दारु देवः कतमो जुषाते ।
कस्येमां देवीममृतेषु प्रेष्ठां हृदि श्रेषाम सुष्टुतिं सुहव्याम् ॥१॥
यज्ञास पात्र असलेल्या देवतांपैकी कोणता स्तुतिप्रिय देव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची हाक ऐकेल ? कोणते देव आमच्या प्रार्थनेने प्रसन्न होतील ? अमर देवांमध्ये, अत्यंत सुंदर आणि अत्यंत उत्कृष्ट अशी स्तुती आम्ही कोणत्या देवाच्या प्रीत्यर्थ समर्पित करू? ॥१ ॥

को मृळाति कतम आगमिष्ठो देवानामु कतमः शम्भविष्ठः ।
रथं कमाहुर्द्रवदश्वमाशुं यं सूर्यस्य दुहितावृणीत ॥२ ॥
देवांमध्ये असा कोणता देव आहे जो भक्तगणांना सुख देतो? आम्हा भक्तगणांच्या यज्ञात कोणते देव सर्वप्रथम येतील ? देवांपैकी कोणते देव आपले सर्वात जास्त कल्याण करतील ? ज्या रथाला सूर्यदेवांच्या कन्येने स्वतःसाठी निवडले, तो वेगवान अश्व असलेला आणि शीघ्र गतीचा रथ कोणाचा आहे? ॥२॥

मक्षू हि ष्मा गच्छथ ईवतो द्यूनिन्द्रो न शक्तिं परितक्म्यायाम् ।
दिव आजाता दिव्या सुपर्णा कया शचीनां भवथः शचिष्ठा ॥३॥
हे आकाशातून उत्पन्न झालेल्या आणि सुंदर पंख असलेल्या पक्ष्यांप्रमाणे वेगवान (अश्विनीकुमारांनो) ! ज्याप्रमाणे इंद्रदेव रात्रीच्या वेळी आपल्या

शक्तीचा वापर करतात , त्या प्रमाणे आपण कधी त्वरित धावून येता? आपल्या कोणत्या श्रेष्ठ शक्ती सर्वात जास्त सामर्थ्यवान आहेत ?॥३॥

का वां भूदुपमातिः कया न आश्विना गमथो हूयमाना ।
को वां महश्चित्यजसो अभीक उरुष्यतं माध्वी दस्रा न ऊती ॥४ ॥

हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या दोघांची कोणती स्तुती आपल्याला सर्वाधिक प्रिय झाली आहे? कोणत्या स्तुतीने प्रसन्न होऊन आणि आम्ही आपल्याला बोलावले असता आपण आमच्या कडे कधी याल? हे मधुर गुणांचे धनी, दु:खनाशक अश्विनीकुमारांनो! महान संकटाच्या वेळी आमचे रक्षण कोण करेल? आपण आपल्या अद्भुत शक्तीने आणि रक्षणाने आम्हाला त्या भीतीतून मुक्त करावे ही विनंती. ॥४ ॥

उरु वां रथः परि नक्षति द्यामा यत्समुद्रादभि वर्तते वाम् ।
मध्वा माध्वी मधु वां प्रुषायन्यत्सीं वां पृक्षो भुरजन्त पक्वाः ॥५॥

हे माधुर्य प्रदान करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपला विस्तीर्ण रथ आकाशातून आणि समुद्रातून सहजपणे संचार करत आपल्याकडे येतो. जेव्हा यज्ञकर्ते भक्तगण आपल्यासाठी सिद्ध केलेले हविष्यान्न अर्पण करतात तेव्हा आपण आनंदाचा आणि शक्तीचा वर्षाव करता. ॥५ ॥

सिन्धुर्ह वां रसया सिञ्चदश्वान्घृणा वयोऽरुषासः परि ग्मन् ।
तदू षु वामजिरं चेति यानं येन पती भवथः सूर्यायाः ॥६॥

हे अश्विनीकुमारांनो ! नदी आपल्या जलाने आपल्या अश्वांचे सिंचन करते. आपले तेजस्वी, आरक्त वर्णीय, अश्व पक्ष्यांप्रमाणे चपळतेने सर्व दिशांना संचार करतात. ज्या रथावर आरूढ होऊन आपण सूर्यदेवांच्या कन्येचे पती झालात तो रथ सर्वत्र प्रसिद्ध आहे. ॥६॥

इहेह यद्वां समना पपृक्षे सेयमस्मे सुमतिर्वाजरत्ना ।
उरुष्यतं जरितारं युवं ह श्रितः कामो नासत्या युवद्रिक् ॥७॥

हे समविचारी अश्विनीकुमारांनो ! या यज्ञस्थानी आपली जी उत्तम बुद्धी समाविष्ट झाली आहे, ती बुद्धी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे कल्याण करो ही विनंती. हे सत्यनिष्ठ अश्विनीकुमारांनो ! इच्छा आणि प्रेम केवळ आपल्याकडे वळवून आश्रयाला आलेल्या, आपली स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे आपण रक्षण करावे ही विनंती ॥७॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४४

ऋषि- पुरुमिळह सौहोत्र और अजमीळह सौहोत्र **देवता** अश्विनीकुमार, **छन्द** –त्रिष्टुप्

तं वां रथं वयमद्या हुवेम पृथुज्रयमश्विना संगतिं गोः ।
यः सूर्यां वहति वन्धुरायुर्गिर्वाहसं पुरुतमं वसूयुम् ॥१॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या तीन आसनांनी युक्त, स्तुतियुक्त स्तोत्राद्वारे चालणारा (गिर्वाहसम्), सूर्यदेवांची कन्या विराजमान असलेल्या, आपल्या अत्यंत वेगवान आणि ऐश्वर्य देणाऱ्या रथाचे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आवाहन करतो. हा रथ आम्हा भक्तगणांना ज्ञान प्रदान करो ही विनंती. ॥१ ॥

युवं श्रियमश्विना देवता तां दिवो नपाता वनथः शचीभिः ।
युवोर्वपुरभि पृक्षः सचन्ते वहन्ति यत्ककुहासो रथे वाम् ॥२॥
हे देवस्वरूप, स्वर्गपुत्रांनो, अश्विनीकुमारांनो ! आपण आपल्या दिव्य शक्तीने श्रेष्ठ वैभव मिळवता. जेव्हा आपले महाकाय आणि वेगवान अश्व आपल्या रथाला ओढून नेतात तेव्हा, पोषक अन्नाचा रस आपल्या दोघांचे शरीर पुष्ट करतो. ॥२ ॥

को वामद्या करते रातहव्य ऊतये वा सुतपेयाय वार्कैः ।
ऋतस्य वा वनुषे पूर्व्याय नमो येमानो अश्विना ववर्तत् ॥३॥
हे अश्विनीकुमारांनो ! आज असा कोणता यज्ञकर्ता भक्तगण आहे, जो आपल्याला हविष्यान्नाच्या आहुती प्रदान करून , स्तुतियुक्त स्तोत्राच्या पठणाने स्वतःच्या संरक्षणासाठी, सोमरस प्राशन करण्यासाठी आपले आवाहन करत आहे ? सत्याच्या मार्गावर चालणारा असा कोणता भक्तगण आहे जो प्राचीन

काळापासून चालत आलेल्या परंपरेनुसार नतमस्तक होऊन आपल्याला बोलवतो? ॥३॥

हिरण्ययेन पुरुभू रथेनेमं यज्ञं नासत्योप यातम् ।
पिबाथ इन्मधुनः सोम्यस्य दधथो रत्नं विधते जनाय ॥४॥
हे सर्वांचे पोषण करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आपण आपल्या दिव्य सुवर्णमय रथाने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे, सिद्ध केलेला मधुर सोमरस प्राशन करावा आणि आपली सेवा करणाऱ्या आम्हा भक्तगणांना शुभ व मौल्यवान रत्ने प्रदान करावीत ही विनंती. ॥४॥

आ नो यातं दिवो अच्छा पृथिव्या हिरण्ययेन सुवृता रथेन ।
मा वामन्ये नि यमन्देवयन्तः सं यद्ददे नाभिः पूर्व्या वाम् ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण आपल्या सुवर्णमय आणि सुंदर गतीने चालणाऱ्या रथातून आमच्याकडे यावे ही विनंती. लांडगा किंवा लांडगी आम्हाला त्रास देऊ शकणार नाही. आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे आपल्याशी असलेले अतूट नाते आम्ही भक्तिभावाने स्वीकारतो. ॥५॥

नू नो रयिं पुरुवीरं बृहन्तं दस्रा मिमाथामुभयेष्वस्मे ।
नरो यद्वामश्विना स्तोममावन्त्सधस्तुतिमाजमीळ्हासो अग्मन् ॥६॥
हे दुःखाचा नाश करणाऱ्या अश्विनीकुमारांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना अनेक वीर पुत्रांनी युक्त असे महान ऐश्वर्य लवकर प्रदान करावे ही विनंती. अजमीळहा ऋषींचे सामर्थ्यवान वंशज आपल्या जवळ आले तेव्हा त्यांनी एकत्रितपणे आपल्या स्तुतींचा स्वीकार केला. ॥६॥

इहेह यद्वां समना पपृक्षे सेयमस्मे सुमतिर्वाजरत्ना ।

उरुष्यतं जरितारं युवं ह श्रितः कामो नासत्या युवद्रिक् ॥७॥

हे समविचारी अश्विनीकुमारांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे अन्न आणि समृद्धी देणारे शुभ विचार आपल्यासाठीच आहेत. आपल्या आश्रयाला आलेल्या भक्तगणांचे रक्षण करावे आणि त्यांच्या इच्छा पूर्ण कराव्यात ही विनंती. ॥७॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४५

ऋषि- वामदेव गौतम **देवता** अश्विनीकुमार, **छन्द** – जगती ७ त्रिष्टुप्

एष स्य भानुरुदियर्ति युज्यते रथः परिज्मा दिवो अस्य सानवि.
पृक्षासो अस्मिन्मिथुना अधि त्रयो दृतिस्तुरीयो मधुनो वि रप्शते ॥१॥
प्रसिद्ध सूर्यदेव उगवत आहेत. हे अश्विनीकुमारांनो ! आपला आकाशाच्या शिखरावर सर्वत्र संचार करणारा रथ जोडला जात आहे. या रथामध्ये तीन प्रकारची पोषक धान्ये असून आणि चौथी सोमरसाने भरलेली पिशवी (दृति) रथाची शोभा वाढवत आहे ॥१ ॥

उद्वां पृक्षासो मधुमन्त ईरते रथा अश्वास उषसो व्युष्टिषु ।
अपोर्णुवन्तस्तम आ परीवृतं स्वर्ण शुक्रं तन्वन्त आ रजः॥२॥
हे अश्विनीकुमारांनो ! उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी, आपला अन्नाने समृद्ध आणि सोमरस वाहून नेणारा अश्वांनी ओढलेला रथ प्रगट होत आहे. हा रथ चोहोबाजूला पसरलेला अंध:कार दूर करत सूर्यदेवांप्रमाणे तेजस्वी प्रकाश संपूर्ण विश्वात पसरवतो. ॥२॥

मध्वः पिबतं मधुपेभिरासभिरुत प्रियं मधुने युञ्जाथां रथम्.
आ वर्तनिं मधुना जिन्वथस्पथो दृतिं वहेथे मधुमन्तमश्विना ॥३॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपण आपल्या सोमरस प्राशन करण्यास योग्य अशा मुखांनी या मधुर सोमरसाचे प्राशन करावे ही विनंती. आपण आपल्या आवडत्या रथाला या सोमरसाच्या प्राप्तीसाठी सज्ज करावे आणि यज्ञकर्त्या भक्तगणांच्या घरच्या मार्गावरून (वर्तनिम्) आणावा. आपण आपल्याबरोबर सोमरसाने भरलेली चामड्याची पिशवी वाहून नेता. ॥३॥

हंसासो ये वां मधुमन्तो अस्रिधो हिरण्यपर्णा उहुव उषर्बुधः.
उदप्रुतो मन्दिनो मन्दिनिस्पृशो मध्वो न मक्षः सवनानि गच्छथः ॥४॥
हे अश्विनीकुमारांनो ! आपले अश्व हंसाप्रमाणे वेगवान आणि न थकणारे आहेत, त्यांचे पंख सुवर्णासारखे तेजस्वी आहेत, ते अश्व पहाटे जागृत होतात आणि आपल्याला घेऊन येतात. ज्याप्रमाणे मधमाश्या मधाकडे आकर्षित होतात, त्याचप्रमाणे आनंददायी आणि सुखकारक अश्व आपल्याला आमच्या यज्ञातील सोमरसाचे सेवन करण्यासाठी घेऊन येतात॥४ ॥

स्वध्वरासो मधुमन्तो अग्नय उस्रा जरन्ते प्रति वस्तोरश्विना.
यन्निक्तहस्तस्तरणिर्विचक्षणः सोमं सुषाव मधुमन्तमद्रिभिः ॥५॥
हे अश्विनीकुमारांनो ! उत्तम यज्ञकर्ते, अग्निसारखे तेजस्वी, सकाळच्या प्रकाशात आपली स्तुती करतात. जेव्हा एखादा ज्ञानी, तत्पर आणि शुचिर्भूत (निक्तहस्तः हात स्वच्छ धुवून) भक्तगण पाषाणाच्या भांड्यामध्ये सोमरस सिद्ध करून आपली स्तुती करतो तेव्हा आपण त्याच्यावर प्रसन्न होता. ॥५ ॥

आकेनिपासो अहभिर्दविध्वतः स्व१र्ण शुक्रं तन्वतः आ रजः.
सूरश्चिदश्वान्युयुजान ईयते विश्वाँ अनु स्वधया चेतथस्पथः ॥६॥
ज्याप्रमाणे सूर्यदेव आपल्या किरणांनी अंधकार दूर करून सर्व अंतरिक्षात तेजस्वी प्रकाश पसरवतात, त्याप्रमाणे हे अश्विनीकुमारांनो ! आपल्या रथाद्वारे संपूर्ण अंतरिक्षात संचार करता. सूर्यदेवांप्रमाणे आपण अश्व आपल्या रथाला जुंपून मार्गक्रमण करता आणि आपल्या सामर्थ्याने सर्वांना सन्मार्गाचे ज्ञान करून देता. ॥६ ॥

प्र वामवोचमश्विना धियन्धा रथः स्वश्वो अजरो यो अस्ति.

येन सद्यः परि रजांसि याथो हविष्मन्तं तरिणं भोजमच्छ ॥७ ॥

हे अश्विनीकुमारांनो ! बुद्धी आणि कर्म धारण करणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या अविनाशी सुंदर अश्वांनी जोडलेल्या रथाची स्तुती करतो. या रथावर आरूढ होऊन यज्ञामध्ये हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या सर्व भक्तगणांच्या यज्ञामध्ये संचार करत त्यांना ऐश्वर्य देण्यासाठी आणि संकटातून तारण्यासाठी पोहचतात. ॥७ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४६

ऋषि- वामदेव गौतम **देवता** इंद्र आणि वायु १ वायु , **छन्द** – गायत्री

अग्रं पिबा मधूनां सुतं वायो दिविष्टिषु । त्वं हि पूर्वपा असि ॥१॥
हे वायुदेवा! स्वर्गाची प्राप्ती करून देणाऱ्या या यज्ञामध्ये सिद्ध केलेल्या सोमरसाचे आपण सर्वांच्या आधी प्राशन करावे कारण आपण सर्वांच्या आधी सोमरस प्राशन करणारे आहात. ॥१ ॥

शतेना नो अभिष्टिभिर्नियुत्वाँ इन्द्रसारथिः । वायो सुतस्य तृम्पतम् ॥२॥
हे वायुदेवा ! आपण आपले नियुत नावाचे अश्व जोडून इंद्रदेवांचे सारथी होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. आमच्या अगणित इच्छा पूर्ण करून आपण, इंद्रदेवांच्या सोबत अर्पण केलेल्या सोमरसाचे प्राशन करून तृप्त व्हावे ही विनंती. ॥२ ॥

आ वां सहस्रं हरय इन्द्रवायू अभि प्रयः । वहन्तु सोमपीतये ॥३॥
हे इंद्रदेवा आणि वायुदेवा ! आपले हजारो अश्व आपल्याला या यज्ञातील अर्पण केलेल्या सोमरसाचे प्राशन करण्यासाठी घेऊन येवोत. ॥३ ॥

रथं हिरण्यवन्धुरमिन्द्रवायू स्वध्वरम् । आ हि स्थाथो दिविस्पृशम् ॥४॥
हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा ! आपण आपले सुवर्णाने मढविलेले आसन असलेल्या, आकाशाला स्पर्श करणाऱ्या दिव्य रथावर, उत्तम रीतीने संपन्न होणाऱ्या यज्ञासाठी आरूढ व्हावे ही विनंती. ॥४ ॥

रथेन पृथुपाजसा दाश्वांसमुप गच्छतम् । इन्द्रवायू इहा गतम् ॥५॥

हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा ! आपण आपल्या अत्यंत शक्तिशाली आणि विस्तीर्ण सामर्थ्य असलेल्या रथाने हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥५ ॥

इन्द्रवायू अयं सुतस्तं देवेभिः सजोषसा । पिबतं दाशुषो गृहे ॥६॥
हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा ! दानशूर यज्ञकर्त्या भक्तगणांनी सिद्ध केलेला सोमरस इतर देवतांसह अत्यंत आनंदाने प्राशन करावा ही विनंती. ॥६ ॥

इह प्रयाणमस्तु वामिन्द्रवायू विमोचनम् । इह वां सोमपीतये ॥७ ॥
हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी आपले आगमन व्हावे आणि सोमरस प्राशन करण्यासाठी आपल्या रथाचे अश्व येथे सोडावे ही विनंती. ॥७ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४७

ऋषि- वामदेव गौतम **देवता** इंद्र आणि वायु १ वायु , **छन्द** – अनुष्टुप्

वायो शुक्रो अयामि ते मध्वो अग्रं दिविष्टिषु ।
आ याहि सोमपीतये स्पार्हो देव नियुत्वता ॥१॥

सर्वांना प्रिय असणाऱ्या हे वायुदेवा ! स्वर्गाची इच्छा धरून केलेल्या या यज्ञांमध्ये, आम्ही यज्ञकर्ते भक्तगण शुचिर्भूत होऊन सोमरस प्राशन करण्याचा प्रथम मान आपल्याला देत आहोत. आपण आपल्या नियुत् नावाचे अश्व जुंपलेल्या रथावर आरुढ होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥१॥

इन्द्रश्च वायवेषां सोमानां पीतिमर्हथः ।
युवां हि यन्तीन्दवो निम्नमापो न सध्र्यक् ॥२॥

हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा! आपण दोघेही या सोमरसाचे प्राशन करण्यास पात्र आहात. ज्याप्रमाणे पाणी एकाच वेळी सखल भागाकडे प्रवाहित होते त्या प्रमाणे हा सोमरस आपल्या दोघांकडे प्रवाहित होत आहे॥२॥

वायविन्द्रश्च शुष्मिणा सरथं शवसस्पती ।
नियुत्वन्ता न ऊतय आ यातं सोमपीतये ॥३॥

अत्यंत सामर्थ्यशाली आणि शक्तीचे स्वामी असलेल्या हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा! आपण दोघेही एकाच रथावर आरुढ होऊन आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी आणि सोमरस प्राशन करण्यासाठी येथे यावे ही विनंती ॥३॥

या वां सन्ति पुरुस्पृहो नियुतो दाशुषे नरा ।
अस्मे ता यज्ञवाहसेन्द्रवायू नि यच्छतम् ॥४ ॥

हे, इंद्रदेवा आणि वायुदेवा ! आपल्याकडे अनेकांसाठी भूषणावह असे नियुत् नावाचे अश्व आहेत. हे पराक्रमी वीरांनो ! आपण ते अश्व आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करावे ही विनंती ॥४ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४८

ऋषि- वामदेव गौतम **देवता** -वायु , **छन्द** – अनुष्टुप्

विहि होत्रा अवीता विपो न रायो अर्यः ।
वायवा चन्द्रेण रथेन याहि सुतस्य पीतये ॥१॥

हे वायुदेवा ! ज्याप्रमाणे एखादा बुद्धिमान सम्राट आपल्या संपत्तीचे रक्षण करतो, त्याप्रमाणे आपण आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी अर्पण केलेल्या आणि इतरांनी स्पर्श न केलेल्या (अवीत) अशा या सोमरसाचा स्वीकार करावा ही विनंती. आमच्याद्वारे अर्पण केलेल्या सोमरसाच्या प्राशनासाठी आपण आपल्या सुवर्णमय रथावर आरुढ होऊन यावे ही विनंती. ॥१॥

निर्युवाणो अशस्तीर्नियुत्वाँ इन्द्रसारथिः ।
वायवा चन्द्रेण रथेन याहि सुतस्य पीतये ॥२॥

हे सर्व प्रकारची निंदा, अपकीर्ती आणि वाईट प्रवृत्तींपासून दूर असणाऱ्या, स्तुतीने परिपूर्ण वायुदेवा ! आपण आपल्या चमकदार, अश्व जुंपलेल्या, इंद्रदेव सारथी असलेल्या रथावर आरुढ होऊन सोमरस प्राशन करण्यास यावे ही विनंती. ॥२॥

अनु कृष्णे वसुधिती येमाते विश्वपेशसा ।
वायवा चन्द्रेण रथेन याहि सुतस्य पीतये ॥३॥

हे वायुदेवा ! कृष्णवर्णीय ऐश्वर्यसंपन्न आणि अनेक रूपे धारण करणारे आकाश आणि पृथ्वी आपल्या नियमांचे पालन करतात. आपण आपल्या

तेजस्वी रथातून सोमपान करण्यासाठी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती ॥३॥

वहन्तु त्वा मनोयुजो युक्तासो नवतिर्नव ।
वायवा चन्द्रेण रथेन याहि सुतस्य पीतये ॥४॥

हे वायुदेवा ! मनाप्रमाणे चपळ, समान वेगाने धावणारे नव्व्याण्णव अश्व असलेला प्रकाशमान रथ, आपल्याला सोमरस प्राशन करण्यासाठी आमच्या यज्ञस्थळी घेऊन योवो. ॥४॥

वायो शतं हरीणां युवस्व पोष्याणाम् ।
उत वा ते सहस्रिणो रथ आ यातु पाजसा ॥५॥

हे वायुदेवा ! आपण आपल्या रथाला उत्तमरीत्या जोपासलेले शेकडो अश्व जुंपावेत ही विनंती. शेकडो अश्व असलेला रथ, आमच्या यज्ञस्थळी वेगाने येवो. ॥५॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-४९

ऋषि- वामदेव गौतम **देवता** -इंद्र आणि बृहस्पति, **छन्द** – गायत्री

इदं वामास्ये हविः प्रियमिन्द्राबृहस्पती । उक्थं मदश्च शस्यते ॥१॥
हे इंद्रदेवा आणि बृहस्पते ! आपल्या दोघांच्या मुखात ही प्रिय हविष्यान्नाची आहुती अर्पण केली जात असताना आपल्याला आनंद देणाऱ्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण केले जात आहे ॥१ ॥

अयं वां परि षिच्यते सोम इन्द्राबृहस्पती । चारुर्मदाय पीतये ॥२॥
हे इंद्रदेवा आणि बृहस्पते ! सिद्ध झालेला सोमरस प्राशन करण्यासाठी आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपले आवाहन करत आहोत. ॥२ ॥

आ न इन्द्राबृहस्पती गृहमिन्द्रश्च गच्छतम् । सोमपा सोमपीतये ॥३॥
सोमरस प्राशन करणाऱ्या हे, इंद्रदेवा आणि बृहस्पते ! आपण दोघेही सोमरस प्राशन करण्याकरता आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. ॥३ ॥

अस्मे इन्द्राबृहस्पती रयिं धत्तं शतग्विनम् । अश्वावन्तं सहस्रिणम् ॥४॥
हे इंद्रदेवा आणि बृहस्पते ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना शेकडो गायी आणि हजारो अश्वांनी युक्त असलेले महान ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥४ ॥

इन्द्राबृहस्पती वयं सुते गीर्भिर्हवामहे । अस्य सोमस्य पीतये ॥५॥

हे इंद्रदेवा आणि बृहस्पते ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण स्तुतियुक्त स्तोत्रांच्या पठणाने आपल्याला अर्पण केलेल्या सोमरसाचे प्राशन करण्यासाठी बोलावतो. ॥५ ॥

सोममिन्द्राबृहस्पती पिबतं दाशुषो गृहे । मादयेथां तदोकसा ॥६॥
हे इंद्रदेवा आणि बृहस्पते ! आपण दोघे दान देणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञस्थळी सोमरस प्राशन करावा आणि त्या स्थळी येऊन तृप्त व्हावे ही विनंती. ॥६ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५०

ऋषि- वामदेव गौतम **देवता** - बृहस्पति १०-११इंद्र आणि बृहस्पति,
छन्द – त्रिष्टुप् १० गायत्री

यस्तस्तम्भ सहसा वि ज्मो अन्तान्बृहस्पतिस्त्रिषधस्थो रवेण ।
तं प्रत्नास ऋषयो दीध्यानाः पुरो विप्रा दधिरे मन्द्रजिह्वम् ॥१॥
तिन्ही लोकांमध्ये निवास करणाऱ्या, आपल्या शक्तीने पृथ्वीच्या सर्व दाही दिशांना स्थिर करणाऱ्या, वाणीच्या गर्जनेने (रवेण), मधुर वाणी असलेल्या(मन्द्रजिह्व) बृहस्पतीदेवांना, प्राचीन आणि ज्ञानी ऋषींनी ध्यान मग्न होऊन सर्वश्रेष्ठ स्थानी प्रस्थापित केले आहे. ॥१ ॥

धुनेतयः सुप्रकेतं मदन्तो बृहस्पते अभि ये नस्ततस्रे ।
पृषन्तं सृप्रमदब्धमूर्वं बृहस्पते रक्षतादस्य योनिम् ॥२॥
फळ देणाऱ्या, समृद्धी देणाऱ्या, अहिंसक, हे बृहस्पतीदेवा ! शत्रूंना भयभीत करणारे, उत्तम ज्ञान प्राप्त झालेले यज्ञकर्ते भक्तगण आनंदाने आपल्यासाठी यज्ञ करतात. अशा भक्तगणांच्या प्रवाही, कोणाकडूनही नष्ट न होणाऱ्या, महान यज्ञस्थळाचे आपण रक्षण करता. ॥२॥

बृहस्पते या परमा परावदत आ त ऋतस्पृशो नि षेदुः ।
तुभ्यं खाता अवता अद्रिदुग्धा मध्वः श्चोतन्त्यभितो विरप्शम् ॥३॥
हे बृहस्पतीदेवा ! सत्याला स्पर्श करणारे श्रेष्ठ ज्ञानी यज्ञकर्ते भक्तगण सर्वोच्च आणि दूरस्थ स्थानावरून यज्ञासाठी येऊन बसले आहेत. ज्याप्रमाणे खोदलेल्या विहिरीच्या सर्व बाजूंनी झरे वाहतात, त्याचप्रमाणे दगडांच्या पात्रांमध्ये पिळून सिद्ध केलेला हा मधुर सोमरस सर्व बाजूंनी वाहत आहे. ॥३ ॥

बृहस्पतिः प्रथमं जायमानो महो ज्योतिषः परमे व्योमन् ।
सप्तास्यस्तुविजातो रवेण वि सप्तरश्मिरधमत्तमांसि ॥४ ॥
सर्वोच्च आकाशातील महान दिव्य प्रकाशातून सर्वप्रथम प्रकट होणाऱ्या, सात मुखे असलेल्या आणि सात किरणांनी युक्त अशा पराक्रमी बृहस्पतीदेवांनी आपल्या महान मंत्र गर्जनेने अज्ञानाचा अंध:कार नष्ट केला आहे. ॥४ ॥

स सुष्टुभा स ऋक्वता गणेन वलं रुरोज फलिगं रवेण ।
बृहस्पतिरुस्रिया हव्यसूदः कनिक्रदद्वावशतीरुदाजत् ॥५ ॥
बृहस्पतीदेवांनी उत्तम स्तुती करणाऱ्या आणि ऋचांचे गायन करणाऱ्या (ऋषींच्या) समूहाच्या सोबतीने, आपल्या मंत्रघोषाच्या गर्जनेने 'वल' असुराचा आणि त्याच्या गुहेचा नाश केला. गर्जना करणाऱ्या बृहस्पतीदेवांनी , हविष्यान्नाच्या आहुती साठी दूध प्रदान करणाऱ्या आणि स्वतः मुक्त होण्याची तीव्र इच्छा बाळगणाऱ्या त्या गायींना (उस्रिया) अंधारातून बाहेर काढले. ॥५ ॥.

एवा पित्रे विश्वदेवाय वृष्णे यज्ञैर्विधेम नमसा हविर्भिः ।
बृहस्पते सुप्रजा वीरवन्तो वयं स्याम पतयो रयीणाम् ॥६॥
सर्व देवांचे स्वामी असलेल्या, सामर्थ्यशाली आणि पालनकर्त्या बृहस्पतिदेवांची आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, नतमस्तक होऊन हविष्यान्नाच्या आहुती अर्पण करून पूजा करतो . हे बृहस्पतिदेवा ! आपल्या कृपेने आम्हा भक्तगणांना उत्तम संतती आणि पराक्रमी पुत्रांनी युक्त असे ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती. ॥६ ॥

स इद्राजा प्रतिजन्यानि विश्वा शुष्मेण तस्थावभि वीर्येण ।
बृहस्पतिं यः सुभृतं बिभर्ति वल्गूयति वन्दते पूर्वभाजम् ॥७॥

जो राजा, ज्ञानी बृहस्पतिदेवांच्या दैवी मार्गदर्शनाचा आदर करतो, तो राजा आपल्या स्वतःच्या गृहात अत्यंत सुख आणि सुरक्षिततेने निवास करतो. त्याच्यासाठी ही पृथ्वी सर्व ऋतूंमध्ये समृद्धी प्रदान करते आणि त्याची प्रजा स्वतःहूनच त्याच्यासमोर नतमस्तक होऊन त्याची आज्ञा मान्य करते. ॥७॥

स इत्क्षेति सुधित ओकसि स्वे तस्मा इळा पिन्वते विश्वदानीम् ।
तस्मै विशः स्वयमेवा नमन्ते यस्मिन्ब्रह्मा राजनि पूर्व एति ॥८॥
ज्या राजाचा राजकारभार बृहस्पतिदेवांच्या दैवी मार्गदर्शनानुसार होत असतो, तो राजा आपल्या स्वतःच्या भवनात सुखाने आणि सुरक्षितपणे निवास करतो, पृथ्वी त्याला नेहमी अन्नाने समृद्ध करते आणि त्याची प्रजा स्वतःहून त्याच्यासमोर नतमस्तक होते. ॥८ ॥

अप्रतीतो जयति सं धनानि प्रतिजन्यान्युत या सजन्या ।
अवस्यवे यो वरिवः कृणोति ब्रह्मणे राजा तमवन्ति देवाः ॥९ ॥
जो राजा बृहस्पतिदेवांना आदरपूर्वक वंदन करतो, त्यांची मनापासून स्तुती करतो असा राजा अजेय बनतो. तो राजा आपल्या प्रचंड सामर्थ्याने शत्रूंच्या सर्व सैन्यांवर आणि त्यांच्या मनावरही विजय मिळवतो. ॥९ ॥

इन्द्रश्च सोमं पिबतं बृहस्पतेऽस्मिन्यज्ञे मन्दसाना वृषण्वसू ।
आ वां विशन्त्विन्दवः स्वाभुवोऽस्मे रयिं सर्ववीरं नि यच्छतम् ॥१० ॥
हे बृहस्पतीदेवा आणि इंद्रदेवा ! भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारे धन देणारे आपण दोघे, या यज्ञामध्ये आनंदित होऊन सोमरसाचे प्राशन करावे ही विनंती. हा सुखदायक सोमरस आपल्या शरीरात तृप्तीसाठी प्रवेश करू देत आणि आपण आम्हा भक्तगणांना सर्व वीर पुत्रांनी व पराक्रमाने युक्त असे ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती.॥१ ०॥

बृहस्पत इन्द्र वर्धतं नः सचा सा वां सुमतिर्भूत्वस्मे ।
अविष्टं धियो जिगृतं पुरंधीर्जजस्तमर्यो वनुषामरातीः ॥११॥

हे बृहस्पती आणि हे इंद्रदेवा ! आपण दोघेही एकत्रितपणे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची प्रगती करावी ही विनंती. आपल्या दोघांची ती श्रेष्ठ आणि कल्याणकारी बुद्धी आम्हा भक्तगणांना प्राप्त होवो. आपण आमच्या बुद्धीचे आणि सत्कर्मांचे रक्षण करावे, त्यांना जागृत करावे आणि जे लोक आम्हा भक्तगणांचे शत्रू आहेत, त्यांना आपण पराभूत करून आमचे रक्षण करावे ही विनंती ॥१ १ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५१

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – उषा , **छन्द** – त्रिष्टुप्

इदमु त्यत्पुरुतमं पुरस्ताज्ज्योतिस्तमसो वयुनावदस्थात् ।
नूनं दिवो दुहितरो विभातीर्गातुं कृणवन्नुषसो जनाय ॥१॥
अंधाराचा नाश करून, पूर्व दिशेला सर्वांना व्यापणारे अत्यंत स्पष्ट असे दिव्यतेज खरोखर प्रकट झाले आहे. प्रकाशाने न्हाऊन निघालेली सूर्यदेवांची कन्या, तेजस्वी उषादेवता सर्व यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी दैनंदिन कर्माचा मार्ग प्रशस्त करत आहे. ॥१ ॥

अस्थुरु चित्रा उषसः पुरस्तान्मिता इव स्वरवोऽध्वरेषु ।
व्यू व्रजस्य तमसो द्वारोच्छन्तीरव्रञ्छुचयः पावकाः ॥२॥
ज्याप्रमाणे यज्ञाच्या ठिकाणी रंगबिरंगी सुंदर यज्ञस्तंभ ओळीने उभे केले जातात, त्याप्रमाणे या आश्चर्यकारक आणि विविधरंगी उषादेवता पूर्व दिशेला प्रकट झाल्या आहेत. प्रकाश पसरवत आणि सर्वांना पवित्र करत, या दीप्तिमान उषादेवतेने अंध:काराचे बंद दरवाजे उघडून टाकले आहेत. ॥२ ॥

उच्छन्तीरद्य चितयन्त भोजाव्राधोदेयायोषसो मघोनीः ।
अचित्रे अन्तः पणयः ससन्त्वबुध्यमानास्तमसो विमध्ये ॥३ ॥
अंधाराचा नाश करणारी आणि धनसंपन्न उषादेवता अन्नदान करणाऱ्यांना समृद्धी प्रदान करण्यासाठी जागृत करते. परंतु वाईट वृत्तीच्या, कंजूष पणींनी दान करण्यास नकार दिला, ते मात्र त्या चैतन्यहीन अंधाराच्या गर्तेत गाढ निद्रिस्त राहिले आहेत. ॥३ ॥

कुवित्स देवीः सनयो नवो वा यामो बभूयादुषसो वो अद्य ।
येना नवग्वे अङ्गिरे दशग्वे सप्तास्ये रेवती रेवदूष ॥४ ॥
हे प्रकाशमान उषादेवते ! आपला तो सनातन आणि नित्यताचा मार्ग, ज्या मार्गाने आपण नऊ -दहा प्रकारची आणि सात प्रकारच्या छंद युक्त स्तोत्रांनी स्तुती करणाऱ्या आङ्गिरस ऋषींसाठी ऐश्वर्याचा प्रकाश आणला होता, त्याच मार्गाने आम्हा भक्तगणांना ऐश्वर्य प्रदान करून आम्हाला प्रकाशमान करावे ही विनंती. ॥४ ॥

यूयं हि देवीऋतयुग्भिरश्वैः परिप्रयाथ भुवनानि सद्यः ।
प्रबोधयन्तीरुषसः ससन्तं द्विपाच्चतुष्पाच्चरथाय जीवम् ॥५ ॥
हे प्रकाशमान उषादेवते ! सृष्टीच्या नियमांचे पालन करणाऱ्या, अश्व जोडलेल्या आपल्या रथाने संपूर्ण विश्वाचे आपण भ्रमण करता. आपण निद्रिस्त मनुष्य आणि पशु या सर्व सजीवांना गतिशील होण्यासाठी जागृत करावे ही विनंती. ॥५ ॥

क्व स्विदासां कतमा पुराणी यया विधाना विदधुऋभूणाम् ।
शुभं यच्छुभ्रा उषसश्चरन्ति न वि ज्ञायन्ते सदृशीरजुर्याः ॥६ ॥
ज्यांना ऋभूंनी कार्य करण्यास सिद्ध केले त्या पुरातन उषादेवता कुठे आहेत? जेव्हा तेजस्वी उषदेवता आपले सौंदर्य प्रकट करते, तेव्हा त्या नेहमीच नवीन वाटतात आणि म्हणूनच, नवीन उषादेवता आणि जुनी उषादेवता यांच्यामधील भेद करणे अशक्य होते.॥६॥

ता घा ता भद्रा उषसः पुरासुरभिष्टिद्युम्ना ऋतजातसत्याः ।
यास्वीजानः शशमान उक्थैः स्तुवञ्छंसन्द्रविणं सद्य आप ॥७ ॥

त्या मंगलमय उषादेवता प्राचीन काळापासून इच्छित फळ देणाऱ्या तेजाने युक्त आणि सत्यातून उत्पन्न झाल्या . उषादेवतेंच्या आगमनाच्या वेळी स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांना त्वरित ऐश्वर्य प्राप्ती होते. ॥७॥

ता आ चरन्ति समना पुरस्तात्समानतः समना पप्रथानाः ।
ऋतस्य देवीः सदसो बुधाना गवां न सर्गा उषसो जरन्ते ॥८ ॥
समान रूप असलेल्या, सर्वत्र संचार करणाऱ्या, विस्तार पावणाऱ्या त्या दिव्य उषादेवाता एकाच पूर्व दिशेला प्रकट होतात. यज्ञावेदीमध्ये जागृत होणाऱ्या प्रकाशमान उषादेवता गोठ्यातून सुटलेल्या गायींच्या कळपांप्रमाणे (गवां न सर्गा) स्वतःहून प्रकट होतात. ॥८ ॥

ता इन्वेव समना समानीरमीतवर्णा उषसश्चरन्ति ।
गूहन्तीरभ्वमसितं रुशद्भिः शुक्रास्तनूभिः शुचयो रुचानाः ॥९ ॥
एकस्वरूप असलेल्या, समान आणि अगणित रंगांनी युक्त अशा उषादेवाता आपल्या तेजस्वी शरीराने प्रकाश पसरवत आणि आपल्या चमचमणाऱ्या किरणांनी अफाट काळ्या अंध:काराचा नाश करत सर्वत्र संचार करतात. ॥९ ॥

रयिं दिवो दुहितरो विभातीः प्रजावन्तं यच्छतास्मासु देवीः ।
स्योनादा वः प्रतिबुध्यमानाः सुवीर्यस्य पतयः स्याम ॥१०॥
हे आकाशलोकाच्या कन्यांनो, उषादेवतांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना पुत्र-पौत्रांसहित संपत्ती प्रदान करावी ही विनंती. सुखप्राप्तीसाठी आपल्याला जागृत करणारे आम्ही भक्तगण उत्तम सामर्थ्याचे व पराक्रमाचे स्वामी होऊ॥१० ॥

तद्वो दिवो दुहितरो विभातीरुप ब्रुव उषसो यज्ञकेतुः ।

वयं स्याम यशसो जनेषु तद्द्यौश्च धत्तां पृथिवी च देवी ॥११॥

हे प्रकाशमान होणाऱ्या आणि आकाशलोकाच्या कन्यांनो, उषादेवतांनो ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला ही स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करतो. आम्ही यशस्वी आणि कीर्तिवान होऊ. दिव्य आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता आमची स्तुतियुक्त स्तोत्रे श्रवण करून आम्हा भक्तगणांना यश आणि सौभाग्य प्रदान करोत ही विनंती. ॥११॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५२

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – उषा , **छन्द** – गायत्री

प्रति ष्या सूनरी जनी व्युच्छन्ती परि स्वसुः । दिवो अदर्शि दुहिता ॥१॥
आकाशाची कन्या, जिच्या आगमनाने सर्वांना आनंद होणारी (सूनरी), उत्तम फळ देणारी, उषादेवता आपल्या भगिनीला, रात्रीला दूर सारून आपल्यासमोर प्रगट झाली आहे ॥१ ॥

अश्वेव चित्रारुषी माता गवामृतावरी । सखाभूदश्विनोरुषाः ॥२॥
एखाद्या सुंदर अश्वाप्रमाणे वैभवशाली, लालसर छटा असलेली, किरणांची जननी आणि सृष्टीच्या नियमांचे पालन करणारी अशी ही उषादेवाता अश्विनीकुमारांची सखी आहे. ॥२ ॥

उत सखास्यश्विनोरुत माता गवामसि । उतोषो वस्व ईशिषे ॥३॥
हे उषादेवते ! आपण अश्विनिकुमारांची सखी, प्रकाशकिरणांची माता, सर्व प्रकारच्या ऐश्वर्याची स्वामिनी आहात . ॥३ ॥

यावयद्द्वेषसं त्वा चिकित्वित्सूनृतावरि । प्रति स्तोमैरभुत्स्महि ॥४॥
प्रज्ञावान, सत्यवाणीने युक्त, आम्हा भक्तगणांचा द्वेष करणाऱ्या शक्तींना दूर करणाऱ्या हे उषादेवते ! आपले स्वागत करण्यासाठी स्तुतियुक्त स्तोत्रांसह आम्ही जागृत झालो आहोत. ॥४ ॥

प्रति भद्रा अदृक्षत गवां सर्गा न रश्मयः । ओषा अप्रा उरु ज्रयः ॥५॥

गायींच्या कळपांप्रमाणे उषादेवतेच्या आगमनाच्या वेळी मंगलमय किरणे सर्वत्र दिसू लागली आहेत. उषादेवतेने आपल्या तेजाने विस्तीर्ण अशा अंतराळाला व्यापून टाकले आहे. ॥५॥

आपप्रुषी विभावरि व्यावर्ज्योतिषा तमः । उषो अनु स्वधामव ॥६॥
हे तेजस्वी कांतिशालिनी उषादेवते ! आपण आपल्या प्रकाशाने या संपूर्ण जगाला व्यापून टाकले आहे, अंध:काराचा नाश केला आहे. त्यानंतर आमच्या हविष्यान्नाच्या आहुतीचे रक्षण करावे ही विनंती. ॥६॥

आ द्यां तनोषि रश्मिभिरान्तरिक्षमुरु प्रियम् । उषः शुक्रेण शोचिषा ॥७॥
दर्शनी उषादेवता आपल्या मंगलमयी किरणांनी आकाश आणि पृथ्वी या दोन्ही विशाल क्षेत्रांना व्यापून टाकते. ॥७॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५३

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – सविता , **छन्द** – जगती

तद्देवस्य सवितुर्वार्यं महद्वृणीमहे असुरस्य प्रचेतसः ।
छर्दिर्येन दाशुषे यच्छति त्मना तन्नो महाँ उदयान्देवो अक्तुभिः ॥१॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, दिव्य गुणांनी युक्त, शक्तिशाली आणि श्रेष्ठ ज्ञानसंपन्न सवितादेवांच्या त्या महान आणि स्वीकारण्यास श्रेष्ठ (वार्यम्) शक्तीचा स्वीकार करतो. सवितादेव हविष्यान्नाची आहुती अर्पण करणाऱ्या भक्ताला शरणस्थान (छर्दि) प्रदान करतात. तेच सवितादेव आपल्या किरणांसह प्रकट होऊन आमचे रक्षण करोत ही विनंती. ॥१ ॥

दिवो धर्ता भुवनस्य प्रजापतिः पिशङ्गं द्रापिं प्रति मुञ्चते कविः ।
विचक्षणः प्रथयन्नापृणन्नुर्वजीजनत्सविता सुम्नमुक्थ्यम् ॥२॥
आकाशाला आधार देणारे आणि संपूर्ण जगाचे पालनकर्ते असलेले ज्ञानी सवितादेव आपल्या सोनेरी प्रकाशाचे कवच परिधान करतात. सर्व काही पाहणारे सवितादेव आपल्या प्रकाशाचा विस्तार करून आणि संपूर्ण सृष्टीला तेजाने उजळवत, स्तुती करण्यायोग्य अशा सुखाला निर्माण करतात. ॥२ ॥

आप्रा रजांसि दिव्यानि पार्थिवा श्लोकं देवः कृणुते स्वाय धर्मणे ।
प्र बाहू अस्राक्सविता सवीमनि निवेशयन्प्रसुवन्नक्तुभिर्जगत् ॥३॥
प्रकाशमान सवितादेवांनी आपले क्षेत्र आकाशलोक आणि पृथ्वीलोकापर्यंत पूर्णपणे पसरवले आहे. सवितादेव स्वतःच्या धर्माने स्वतःचे यश प्रस्थापित करतात. सर्वांचे प्रेरक सवितादेव रात्रीच्या वेळी विश्रांती (निवेशयन्) घेणाऱ्या

या सृष्टीमध्ये आपली किरणे पसरवतात संपूर्ण चराचर सृष्टीला कर्तव्यासाठी प्रेरित करतात. ॥३ ॥

अदाभ्यो भुवनानि प्रचाकशद्व्रतानि देवः सविताभि रक्षते ।
प्रास्राग्बाहू भुवनस्य प्रजाभ्यो धृतव्रतो महो अज्मस्य राजति ॥४॥
अविनाशी आणि दिव्य प्रकाशमान सवितादेव आपल्या प्रकाशाने सर्व जगाला प्रकाशित करतात आणि भक्तगणांच्या व्रतांचे रक्षण करतात. या जगातील प्रजेच्या हितासाठी, महान नियमांचे पालन (धृतव्रतः) करणारे सवितादेव आपले बाहू (किरणे) सर्वत्र पसरतात ॥४ ॥

त्रिरन्तरिक्षं सविता महित्वना त्री रजांसि परिभुस्त्रीणि रोचना ।
तिस्रो दिवः पृथिवीस्तिस्र इन्वति त्रिभिर्व्रतैरभि नो रक्षति त्मना ॥५॥
सवितादेव आपल्या अफाट महिम्याने तीनही अंतरिक्षांना आणि तीनही जगांना व्यापून टाकतात. हे सवितादेवा ! आपण तीन प्रकाशमान प्रदेशांचे स्वामी आहात .आपण तीन आकाश आणि तीन पृथ्वींना आपल्या सत्तेने व्यापता आणि आपल्या त्रिविध नियमांद्वारे स्वतः आम्हा भक्तगणांचे रक्षण करता. ॥५ ॥
तीन अंतरिक्ष १) खालचे अंतरिक्ष: जिथे ढग निर्माण होतात, पाऊस पडतो आणि पक्षी उडतात. हे पृथ्वीच्या वातावरणाशी संबंधित आहे. २) मध्यम अंतरिक्ष: जिथे वायू आणि विद्युत यांचा प्रभाव असतो ३) तिसरे अंतरिक्ष: जिथे गंधर्व आणि अप्सरांचा निवास मानला जातो
तीन पृथ्वी: १) पहिली पृथ्वी जिथे सजीव सृष्टी वास करते. २) दुसरी पृथ्वी जिथे वनस्पती आणि डोळ्यांना दिसत नाही असे सूक्ष्म जीवसृष्टी ३) तिसरी पृथ्वी हा सर्वात खालचा स्तर असून तो स्थिरतेचे प्रतीक मानला जातो.

तीन नियम १) पृथ्वीवरील नियम: भौतिक सृष्टीचे पोषण करणे. २) अंतरिक्षातील नियम: वायु, वृष्टी (पाऊस) आणि ऊर्जेचे संतुलन राखणे ३) आकाश लोकातील नियम ग्रहांची गती आणि दैवी प्रकाशाचे नियमन करणे

बृहत्सुम्नः प्रसवीता निवेशनो जगतः स्थातुरुभयस्य यो वशी ।
स नो देवः सविता शर्म यच्छत्वस्मे क्षयाय त्रिवरूथमंहसः ॥६॥
महान सुखाचे स्वामी, सर्व उत्तम कर्मांना प्रेरणा देणारे, आश्रय देणारे, सजीव तसेच निर्जीव या दोन्ही सृष्टीवर नियंत्रण ठेवणारे सवितादेव, आम्हा भक्तगणांना पापांपासून वाचवणारे तिहेरी संरक्षण आणि तिन्ही लोकांचे सुख प्रदान करोत ही विनंती. ॥६॥

आगन्देव ऋतुभिर्वर्धतु क्षयं दधातु नः सविता सुप्रजामिषम् ।
स नः क्षपाभिरहभिश्च जिन्वतु प्रजावन्तं रयिमस्मे समिन्वतु ॥७॥
दिव्य सवितादेव ऋतूंनुसार (योग्य वेळी) आम्हा भक्तगणांकडे येऊन आमच्या निवासस्थानाची भरभराट करोत आणि आम्हाला उत्तम संतती व मुबलक अन्न प्रदान करोत ही विनंती. ॥७॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५४

ऋषि- वामदेव गौतम **देवता** –सविता, **छन्द** – जगती ६ त्रिष्टुप्

अभूद्देवः सविता वन्द्यो नु न इदानीमह्न उपवाच्यो नृभिः ।
वि यो रत्ना भजति मानवेभ्यः श्रेष्ठं नो अत्र द्रविणं यथा दधत् ॥१॥
दिव्य, प्रकाशमान आणि प्रगट होणारे (उगवणारे) सवितादेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी दिवसाच्या या समयी वंदन करण्यास आणि स्तुती करण्यास योग्य आहेत. विचारशील मनुष्यांना मौल्यवान रत्ने आणि धन प्रदान करणारे सवितादेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम आणि श्रेष्ठ धन प्रदान करोत ही विनंती ॥१ ॥

देवेभ्यो हि प्रथमं यज्ञियेभ्योऽमृतत्वं सुवसि भागमुत्तमम् ।
आदिद्दामानं सवितर्व्यूर्णुषेऽनूचीना जीविता मानुषेभ्यः ॥२॥
हे सवितादेवा !आपण खरोखर सर्वप्रथम यज्ञाला योग्य असलेल्या देवतांना अमरत्व (अमृतत्वम्) प्रदान करता. त्यानंतर, आपण यज्ञकर्त्या भक्तगणांना वैभव देता आणि मानवांना पिता, पुत्र, पौत्र अशा क्रमाने चालणारे दीर्घायुष्य प्रदान करता. ॥२॥

अचित्ती यच्चकृमा दैव्ये जने दीनैर्दक्षैः प्रभूती पूरुषत्वता ।
देवेषु च सवितर्मानुषेषु च त्वं नो अत्र सुवतादनागसः ॥३॥
हे सवितादेवा ! मानवी स्वभावानुसार आमच्याकडून अज्ञानाने, क्षमतेच्या अभावामुळे किंवा गर्वापोटी देवतांच्या किंवा माणसांच्या बाबतीत जे काही अपराध घडले असतील, त्यातून आम्हाला सर्व दृष्टीने दोषमुक्त करावे ही विनंती. ॥३ ॥

न प्रमिये सवितुर्दैव्यस्य तद्यथा विश्वं भुवनं धारयिष्यति ।
यत्पृथिव्या वरिमन्ना स्वङ्गुरिर्वर्ष्मन्दिवः सुवति सत्यमस्य तत् ॥४॥
संपूर्ण विश्वाचा सांभाळ करणाऱ्या सवितादेवांच्या सामर्थ्याला कोणीही बाधा आणू शकत नाही. सुंदर किरणरूपी हात असलेले सवितादेव पृथ्वी आणि आकाशाला विस्तारण्याची प्रेरणा देतात. हे सवितादेवांचे सामर्थ्यशील कर्म त्रिकालाबाधित सत्य आहे.॥४॥

इन्द्रज्येष्ठान्बृहद्भ्यः पर्वतेभ्यः क्षयाँ एभ्यः सुवसि पस्त्यावतः ।
यथायथा पतयन्तो वियेमिर एवैव तस्थुः सवितः सवाय ते ॥५॥
हे सवितादेवा ! अत्यंत श्रीमंत इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना पूजनीय आहेत. जे भक्तगण विशाल आणि सामर्थ्यवान अशा मार्गावर चालून स्वतःला पर्वतांप्रमाणे परिपूर्ण करतात, त्यांच्यासाठी आपण उत्तम आणि सुखसोयींनी युक्त अशा निवासस्थानांची निर्मिती करता. ते भक्तगण आपल्या नियंत्रणाखाली राहून आपल्या आज्ञेचे पालन करतात. ॥५ ॥

ये ते त्रिरहन्त्सवितः सवासो दिवेदिवे सौभगमासुवन्ति ।
इन्द्रो द्यावापृथिवी सिन्धुरद्भिरादित्यैर्नो अदितिः शर्म यंसत् ॥६ ॥
हे सवितादेवा ! आपल्या, दिवसातून तीन वेळा प्रेरणादायी स्तोत्रांच्या पठणामुळे, आम्हा भक्तगणांना दररोज सौभाग्य मिळते. इंद्रदेव, आकाशदेवता, पृथ्वीदेवता, आदित्य आणि माता आदिती आम्हा भक्तगणांना शाश्वत सुख प्रदान करोत ही विनंती. ॥६ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५५

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – विश्वेदेव **छन्द** – त्रिष्टुप् ८-१० गायत्री

को वस्त्राता वसवः को वरूता द्यावाभूमी अदिते त्रासीथां नः ।
सहीयसो वरुण मित्र मर्तात्को वोऽध्वरे वरिवो धाति देवाः ॥१॥

हे वसुदेवांनो ! आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षक कोण आहेत? आमचे संकट निवारण करणारे कोण आहेत? हे आकाशदेवते , पृथ्वीदेवते आणि आदितीदेवते ,आपण आमचे रक्षण करावे . हे वरुणदेवा आणि मित्रदेवा! आपण शक्तिमान शत्रूंपासून आमचे रक्षण करावे. हे देवतांनो ! आमच्या या यज्ञात आम्हाला ऐश्वर्य कोण प्रदान करेल ? ॥१ ॥

पुराणात ८ वसु प्रसिद्ध आहेत . १ पृथ्वी: भूमी किंवा स्थिरतेचे प्रतीक.२. अनिल (वायू): वारा किंवा प्राणाचे प्रतीक.३. अनल (अग्नी): ऊर्जा आणि प्रकाशाचे प्रतीक.४. आप (जल): पाणी किंवा जीवनाचे प्रतीक.५. प्रत्युष (प्रकाश/सूर्य): पहाट किंवा नवीन आशेचे प्रतीक६. प्रभास (आकाश/नक्षत्र): तेज किंवा अवकाशाचे प्रतीक.७. सोम (चंद्र): मन आणि ओषधींचे प्रतीक. ८. ध्रुव (नक्षत्र): स्थिरता आणि मार्गदर्शनाचे प्रतीक.

प्र ये धामानि पूर्व्याण्यर्चान्वि यदुच्छान्वियोतारो अमूराः ।
विधातारो वि ते दधुरजस्रा ऋतधीतयो रुरुचन्त दस्माः ॥२ ॥

जे देव आपल्या यज्ञकर्त्या भक्तगणांना प्राचीन कार्यक्षेत्रे प्राप्त करून देतात, जे स्वतः बुद्धिमान असून मानवांच्या अंधकाराला (दुःखाला) दूर करतात, तेच जगाचे संचालन करणारे असून आपली सर्व कार्ये सिद्ध करतात. सत्यकर्माचे पालन करणारे ते देव आपल्या दिव्य सामर्थ्याने सर्वत्र शोभायमान होतात॥२॥

प्र पस्त्यामदितिं सिन्धुमर्कैः स्वस्तिमीळे सख्याय देवीम् ।
उभे यथा नो अहनी निपात उषासानक्ता करतामदब्धे ॥३ ॥
उत्तम निवासाचे रक्षण करणाऱ्या, देवमाता अदितीदेवींची , सिंधू नदी आणि कल्याणकारी स्वस्ती देवींची मैत्री प्राप्त करण्यासाठी आम्ही यज्ञकर्ते भक्तगण मंत्रांच्या पठणाने स्तुती करतो. ज्याप्रमाणे दिवस आणि रात्र (अहनी) दोन्ही आमचे रक्षण करतात, त्याप्रमाणे त्या अविनाशी पहाट आणि रात्र (उषासानक्ता) आम्हा भक्तगणांच्या इच्छा पूर्ण करोत. ॥३ ॥ .

व्यर्यमा वरुणश्चेति पन्थामिषस्पतिः सुवितं गातुमग्निः ।
इन्द्राविष्णू नृवदु षु स्तवाना शर्म नो यन्तममवद्वरूथम् ॥४ ॥
अर्यमा आणि वरुणदेव आम्हा भक्तगणांच्या यज्ञाचा मार्ग प्रशस्त करतात. अन्नाचे स्वामी असलेले अग्निदेव आम्हा भक्तगणांना कल्याणकारी मार्ग दाखवोत. इंद्रदेव आणि विष्णुदेव आम्हा भक्तगणांची स्तुतियुक्त स्तोत्रे श्रवण करून आम्हाला पुत्र-पौत्रांचे परम सुख, धन आणि सामर्थ्य प्रदान करोत ही विनंती. ॥४ ॥

आ पर्वतस्य मरुतामवांसि देवस्य त्रातुरव्रि भगस्य ।
पात्पतिर्जन्यादंहसो नो मित्रो मित्रियादुत न उरुष्येत् ॥५ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण पर्वत, मरुद्गण आणि रक्षणकर्ते भगदेव यांच्याकडून मिळणाऱ्या संरक्षणाचे आवाहन करतो. जगाचे अधिपति वरुणदेव आम्हा भक्तगणांना मनुष्यांच्या पापी व्यवहारापासून वाचवोत आणि आमचे सखा असलेले मित्रदेव आमचे रक्षण करोत. ॥५ ॥

नू रोदसी अहिना बुध्न्येन स्तुवीत देवी अप्येभिरिष्टैः ।
समुद्रं न संचरणे सनिष्यवो घर्मस्वरसो नद्यो अप व्रन् ॥६ ॥

ज्याप्रमाणे संपत्तीची इच्छा असलेले लोक समुद्र पार करण्यासाठी किंवा त्यात प्रवेश करण्यासाठी प्रार्थना करतात, त्याचप्रमाणे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या इच्छित कार्यांच्या पूर्ततेसाठी अहिर्बुध्न्य देवतेसह आकाश आणि पृथ्वी ह्यांची स्तुती करतो. ज्याप्रमाणे नद्या, आपले मार्ग मोकळे करून समुद्राकडे धावतात, त्याप्रमाणे या देवता आमच्यासाठी प्रगतीचे मार्ग मोकळे करोत. ॥६ ॥

देवैर्नो देव्यदितिर्नि पातु देवस्त्राता त्रायतामप्रयुच्छन् ।
नहि मित्रस्य वरुणस्य धासिमर्हामसि प्रमियं सान्वग्नेः ॥७ ॥
दिव्य आदितीदेवी इतर देवतांसहित आमचे रक्षण करो. रक्षणकर्ते इंद्रदेव आम्हा भक्तगणांचे पालनपोषण करोत. मित्रदेव, वरुणदेव आणि अग्निदेव यांनी दिलेल्या पोषण करणाऱ्या अन्नाची आम्ही भक्तगण हानी न करता त्याच्यामध्ये वृद्धी करू. ॥७ ॥

अग्निरीशे वसव्यस्याग्निर्महः सौभगस्य । तान्यस्मभ्यं रासते ॥८ ॥
अग्निदेव सर्व प्रकारच्या धनाचे स्वामी आणि सौभाग्याचे (समृद्धीचे) अधिपति आहेत. अग्निदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सर्व संपत्ती आणि समृद्धी प्रदान करोत.॥८ ॥

उषो मघोन्या वह सूनृते वार्या पुरु । अस्मभ्यं वाजिनीवति ॥९ ॥
हे ऐश्वर्यसंपन्न, मधुरभाषिणी आणि अन्नवती उषादेवते! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना पुष्कळ प्रमाणात स्वीकारण्यायोग्य श्रेष्ठ धन प्रदान करावे ही विनंती. ॥९ ॥ .

तत्सु नः सविता भगो वरुणो मित्रो अर्यमा । इन्द्रो नो राधसा गमत्॥१०॥

सवितादेवता , भगदेव , वरुणदेव , मित्रदेव आणि अर्यमादेवता हे सर्वजण जे ऐश्वर्य घेऊन येतात ते सर्व ऐश्वर्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करोत ही विनंती. ॥१ ० ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५६

ऋषि- वामदेव गौतम देवता –आकाश आणि पृथ्वी छन्द – त्रिष्टुप् ५-७ गायत्री

मही द्यावापृथिवी इह ज्येष्ठे रुचा भवतां शुचयद्भिरर्कैः ।
यत्सीं वरिष्ठे बृहती विमिन्वन्नृवद्धोक्षा पप्रथानेभिरेवैः ॥१॥
हे महान आणि विशाल आकाशदेवते आणि पृथ्वीदेवते ! आपण या यज्ञाच्या ठिकाणी आमच्या पवित्र करणाऱ्या स्तुतियुक्त स्तोत्रांच्या श्रवणाने आणि तेजाने अत्यंत श्रेष्ठ म्हणून विराजमान व्हावे ही विनंती. आपल्याला विस्तारणाऱ्या, गती निर्माण झालेल्या, गर्जना करणाऱ्या, वर्षाव करणाऱ्या पावसाने आच्छादित केले आहे ॥१ ॥

देवी देवेभिर्यजते यजत्रैरमिनती तस्थतुरुक्षमाणे ।
ऋतावरी अद्रुहा देवपुत्रे यज्ञस्य नेत्री शुचयद्भिरर्कैः ॥२॥
कोणालाही इजा न पोहोचवणाऱ्या आणि जगाला सुख-समृद्धीचा वर्षाव करून तृप्त करणाऱ्या दैवीशक्तींनी युक्त आकाशदेवता आणि पृथ्वीदेवता, यज्ञाला पात्र असलेल्या इतर देवतांसह विराजमान आहेत. सत्याचे पालन करणाऱ्या, कोणाशीही द्रोह न करणाऱ्या आणि ज्यांचे पुत्र, देव आहेत अशा आपण दोघी, पवित्र स्तुतिमंत्रांच्या साहाय्याने यज्ञाचे मार्गदर्शन करता. ॥२ ॥

स इत्स्वपा भुवनेष्वास य इमे द्यावापृथिवी जजान ।
उर्वी गभीरे रजसी सुमेके अवंशे धीरः शच्या समैरत् ॥३ ॥
ज्याने या विस्तीर्ण आणि अगाध अशा आकाशदेवतेला आणि पृथ्वीदेवतेला उत्पन्न केले तेच, या सर्व विश्वात उत्तम कर्म करणारे कुशल शिल्पकार आहेत.

त्या धैर्यवान आणि बुद्धिमान निर्मात्याने आपल्या अफाट शक्तीने, गहन, सुंदर आणि निराधार पृथ्वी व आकाशाला योग्य रीतीने प्रस्थापित केले आहे. ॥३ ॥

नू रोदसी बृहद्भिर्नो वरूथैः पत्नीवद्भिरिषयन्ती सजोषाः ।
उरूची विश्वे यजते नि पातं धिया स्याम रथ्यः सदासाः ॥४ ॥
हे विशाल प्रदेशांचे धारक आणि सर्वांकडून पूजनीय आकाशदेवते आणि पृथ्वीदेवते ! अन्न देण्यास इच्छुक आपण दोघींनी प्रेमाने एकत्र यावे ही विनंती. आपण पत्नीयुक्त अशा महान संरक्षणात्मक साधनांनी आमचे रक्षण करावे ही विनंती. आम्हाला उत्तम अन्न आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती. आपल्या कृपेने आम्ही भक्तगण रथ आणि सेवकांचे स्वामी होऊ॥४॥

प्र वां महि द्यवी अभ्युपस्तुतिं भरामहे । शुची उप प्रशस्तये ॥५ ॥
हे विस्तीर्ण आणि महान अशा आकाशदेवते आणि पृथ्वीदेवते ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या प्रशंसेसाठी आणि गौरवासाठी पवित्र स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करतो. ॥५॥

पुनाने तन्वा मिथः स्वेन दक्षेण राजथः । ऊह्याथे सनादृतम् ॥६ ॥
हे आकाशदेवते आणि पृथ्वीदेवते ! आपण आपल्या दिव्य स्वरूपाने आणि सामर्थ्याने एकमेकांना पवित्र करता. आपण दोघी अनादिकालापासून वैश्विक सत्याच्या नैसर्गिक नियमाचे पालन करता. ॥६ ॥

मही मित्रस्य साधथस्तरन्ती पिप्रती ऋतम् । परि यज्ञं नि षेदथुः ॥७ ॥
हे महान आकाशदेवते आणि पृथ्वीदेवते ! आपण आपल्या यज्ञकर्त्या सख्याची इच्छा पूर्ण करता. आपण भक्तगणांना अन्न आणि पोषण देऊन त्यांचे दुःख दूर करता. आपण भक्तगणांच्या यज्ञामध्ये चहूबाजूंनी स्थिर होऊन विराजमान व्हावे ही विनंती. ॥७ ॥.

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५७

ऋषि- वामदेव गौतम **देवता** – १- ३ क्षेत्रपति ४ शुन: शेती आणि त्याशी संबंधित घटक

५, ८ शुनासीर: शेतीला समृद्ध करणारी निसर्गाची जोडशक्ती इंद्र-वायू आणि सूर्य

६-७ सीता: नांगराच्या फाळाने जमिनीवर पडणारी रेघ किंवा भूमी देवता

छन्द – अनुष्टुप् ५ पुरउष्णिक् २,३, ८ त्रिष्टुप्

क्षेत्रस्य पतिना वयं हितेनेव जयामसि ।
गामश्वं पोषयित्न्वा स नो मृळातीदृशे ॥१॥

आम्ही भक्तगण एखाद्या हितचिंतक मित्राच्या मदतीने, क्षेत्राच्या (शेती किंवा भूमीच्या) स्वामीच्या (क्षेत्रपतीच्या) साहाय्याने,विजय मिळवतो. ते क्षेत्रपति आमच्या गायी आणि आश्वांचे पालन पोषण करून आम्हाला सुखी ठेवोत॥१॥

क्षेत्रस्य पते मधुमन्तमूर्मिं धेनुरिव पयो अस्मासु धुक्ष्व ।
मधुश्चुतं घृतमिव सुपूतमृतस्य नः पतयो मृळयन्तु ॥२॥

हे क्षेत्रपते! ज्याप्रमाणे गाय दूध देते, त्याप्रमाणे आपण आम्हा गणांसाठी मधासारखा गोडवा असलेल्या मधुर जलाची वृष्टी करावी ही विनंती. घृताप्रमाणे अत्यंत पवित्र आणि मधुर असा आशीर्वाद आम्हाला प्राप्त करूनद्यावा. त्या सत्याचे पालन करणारे सर्व स्वामी आम्हाला सुखी करोत॥२॥

मधुमतीरोषधीर्द्याव आपो मधुमन्नो भवत्वन्तरिक्षम् ।
क्षेत्रस्य पतिर्मधुमान्नो अस्त्वरिष्यन्तो अन्वेनं चरेम ॥३ ॥

हे क्षेत्रपते ! वनस्पती, आकाशलोक, जल आणि अंतरिक्ष आमच्यासाठी मधुर होवोत. हे क्षेत्रपते !आम्ही यज्ञकर्ते भक्तगण कोणत्याही हिंसेपासून सुरक्षित राहून त्याचे अनुसरण (वागू) करू .॥३ ॥

शुनं वाहाः शुनं नरः शुनं कृषतु लाङ्गलम् ।
शुनं वरत्रा बध्यन्तां शुनमष्ट्रामुदिङ्गय ॥४॥
आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे बैल सुखाने काम करोत, शेतकरी आनंदाने कष्ट करोत, आणि नांगर जमिनीची मशागत सुखाने (सहजपणे) करो. नांगराचे दोर आनंदाने बांधले जावोत, चाबूक आनंदाने वापरला जावो. ॥४ ॥

शुनासीराविमां वाचं जुषेथां यद्दिवि चक्रथुः पयः ।
तेनेमामुप सिञ्चतम् ॥५॥
हे शुनासीर ! आपण आमच्या प्रार्थनेचा स्वीकार करावा ही विनंति. आपण जे पाणी आकाशामध्ये निर्माण केले आहे त्या पाण्याने या भूमीचे चांगल्या प्रकारे सिंचित करावे ही विनंती. ॥५ ॥
(शुनासीर : शेतीला समृद्ध करणारी निसर्गाची जोडशक्ती इंद्र-वायू आणि सूर्य)

अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे त्वा ।
यथा नः सुभगाससि यथा नः सुफलाससि ॥६॥
हे सौभाग्यशाली सीते ! आम्ही आपल्याला वंदन करतो. आपण आमच्यावर प्रसन्न व्हावे, आपण आमच्यासाठी सौभाग्य देणारी व्हावे आणि आम्हांला भरपूर फळ देणारी व्हावे ही विनंती. ॥६ ॥
सीते :नांगराच्या फाळाने जमिनीवर पडणारी रेघ किंवा भूमी देवता

इन्द्रः सीतां नि गृह्णातु तां पूषानु यच्छतु ।

सा नः पयस्वती दुहामुत्तरामुत्तरां समाम् ॥७॥

इंद्रदेव या नांगरलेल्या भूमीला (सीतेला) स्वीकारोत आणि पूषन् देव तिचे रक्षण व पोषण करोत. ही भूमी पाण्याने समृद्ध होऊन आम्हा भक्तगणांना येणाऱ्या अनेक वर्षांपर्यंत भरपूर पीक आणि समृद्धी प्रदान करो ही विनंती॥७॥

शुनं नः फाला वि कृषन्तु भूमिं शुनं कीनाशा अभि यन्तु वाहैः ।
शुनं पर्जन्यो मधुना पयोभिः शुनासीरा शुनमस्मासु धत्तम् ॥८ ॥

आम्हा भक्तगणांच्या नांगराचे फाळ जमिनीला सुखपूर्वक नांगरोत. शेतकरी त्यांच्या बैलांसह आनंदाने आणि उत्साहाने पुढे जावोत. ढग आपल्या मधुर आणि पौष्टिक जलाचा वर्षाव करो. हे शुनासीर !आपण आम्हा भक्तगणांना सुख आणि समृद्धी प्रदान करावी ही विनंती. ॥८ ॥

।। अथ चतुर्थ मण्डलम् ।।

सूक्त-५८

ऋषि- वामदेव गौतम देवता – अग्नि , सूर्य, आप (जल) , गौएँ (गायी), घृत

छन्द – त्रिष्टुप् ११ जगती

समुद्रादूर्मिर्मधुमाँ उदारदुपांशुना सममृतत्वमानट् ।
घृतस्य नाम गुह्यं यदस्ति जिह्वा देवानाममृतस्य नाभिः ॥१॥
समुद्रातून मधुर लाट उगम पावली आहे . सूक्ष्म प्रक्रियेद्वारे तिला अमरत्व प्राप्त होते. घृताचे (तुपाचे) गूढ स्वरूप म्हणजे देवतांची जिह्वा आहे आणि अमरत्वाचे मूळ केंद्र आहे. ॥१ ॥

वयं नाम प्र ब्रवामा घृतस्यास्मिन्यज्ञे धारयामा नमोभिः ।
उप ब्रह्मा शृणवच्छस्यमानं चतुःशृङ्गोऽवमीद्गौर एतत् ॥२ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण यज्ञात घृताचे नाव मोठ्या आदराने नम्रतापूर्वक स्वीकारतो. आम्हा भक्तगणांचे हे स्तुतियुक्त स्तोत्र, वेद जाणणारा ज्ञानी पुरुष (ब्रह्मा)श्रवण करो. चार शिंगे असलेला (चार वेदांचे प्रतीक) गौर-वृषभाने (परमात्म्याने) हे ज्ञान प्रकट केले आहे. ॥२ ॥

चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य ।
त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्याँ आ विवेश ॥३ ॥
या यज्ञदेवतेला, वृषभाला, चार शिंगे, तीन पाय, दोन डोकी आणि सात हात आहेत. तो तीन ठिकाणी बांधलेला असून मोठ्याने गर्जना करत आहे. ही महान देवता सर्व मर्त्य मनुष्यांच्या अंतरंगात प्रविष्ट झाली आहे. ॥३ ॥

त्रिधा हितं पणिभिर्गुह्यमानं गवि देवासो घृतमन्वविन्दन् ।
इन्द्र एकं सूर्य एकं जजान वेनादेकं स्वधया निष्टतक्षुः॥४ ॥
पणींनी गायींमध्ये तीन प्रकारे लपवून ठेवलेले घृत देवतांनी शोधून काढले. त्यापैकी एका अंशाला इंद्रदेवाने उत्पन्न केले, दुसऱ्या अंशाला सूर्यदेवाने निर्माण केले आणि तिसऱ्या अंशाला विद्वानांनी स्वतःच्या सामर्थ्याने निर्माण केले॥४॥

एता अर्षन्ति हृद्यात्समुद्राच्छतव्रजा रिपुणा नावचक्षे ।
घृतस्य धारा अभि चाकशीमि हिरण्ययो वेतसो मध्य आसाम् ॥५ ॥
आम्ही यज्ञकर्ते भक्तगण सागरात प्रकट होणाऱ्या शेकडो मार्गांनी प्रवाहित होणाऱ्या घृताच्या प्रवाहाला पाहतो. शत्रूंना ते प्रवाह दिसत नाहीत. या दिव्य प्रवाहांच्या मध्यभागी सुवर्णमय अग्निदेव विराजमान आहेत. ॥५ ॥

सम्यक्स्रवन्ति सरितो न धेना अन्तर्हृदा मनसा पूयमानाः ।
एते अर्षन्त्यूर्मयो घृतस्य मृगा इव क्षिपणोरीषमाणाः॥६ ॥
ज्याप्रमाणे नद्या वेगाने वाहतात, त्याप्रमाणे घृताचे पवित्र प्रवाह अंतःकरणातील शुद्ध विचारांनी पवित्र होऊन प्रवाहित होत आहेत. ज्याप्रमाणे पारध्याच्या भयाने हरणे वेगाने धावतात, त्याचप्रमाणे हे घृताचे प्रवाह अत्यंत वेगाने वाहत आहेत.॥६ ॥

सिन्धोरिव प्राध्वने शूघनासो वातप्रमियः पतयन्ति यह्वाः ।
घृतस्य धारा अरुषो न वाजी काष्ठा भिन्दन्नूर्मिभिः पिन्वमानः॥७ ॥
ज्याप्रमाणे नदीचे पाणी उताराच्या दिशेने अत्यंत वेगाने वाहते, त्याचप्रमाणे वाऱ्याच्या वेगालाही मागे टाकणाऱ्या घृताच्या या महान धारा वेगाने प्रवाहित होत आहेत. एखाद्या तेजःपुंज आणि वेगवान अश्वाप्रमाणे, या धारा सर्व मर्यादा ओलांडून आपल्या लाटांना तृप्त करत जात आहेत. ॥७ ॥

अभि प्रवन्त समनेव योषाः कल्याण्यः स्मयमानासो अग्निम् ।
घृतस्य धाराः समिधो नसन्त ता जुषाणो हर्यति जातवेदाः॥८ ॥
ज्याप्रमाणे समान विचारी, कल्याणकारी आणि स्मितहास्य करणाऱ्या स्त्रिया आपल्या पतीकडे वेगाने धावतात, त्याप्रमाणे या घृताच्याधारा अग्निदेवांकडे धावत आहेत. ते सर्वज्ञ जातवेद अग्निदेव समिधांचा आणि घृतांच्या धारांचा प्रेमाने स्वीकार करतात. ॥८ ॥

कन्या इव वहतुमेतवा उ अञ्ज्यञ्जाना अभि चाकशीमि ।
यत्र सोमः सूयते यत्र यज्ञो घृतस्य धारा अभि तत्पवन्ते ॥९ ॥
ज्याप्रमाणे स्त्रिया आपल्या पतीकडे जाण्यासाठी स्वतःला अलंकारांनी सजवतात, त्याचप्रमाणे आम्ही भक्तगण घृताच्या धारांना सजवून वाहताना पाहतो. ज्या ठिकाणी सोमरस सिद्ध केला जातो आणि जिथे यज्ञकार्य चालू आहे अशा, पवित्र स्थानी या घृताच्या धारा उत्साहाने प्रवाहित होतात. ॥९ ॥

अभ्यर्षत सुष्टुतिं गव्यमाजिमस्मासु भद्रा द्रविणानि धत्त ।
इमं यज्ञं नयत देवता नो घृतस्य धारा मधुमत्पवन्ते॥१० ॥
हे देवतांनो, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या उत्तम स्तुतीचा स्वीकार करावा आणि आम्हाला गायींनी समृद्ध असे कल्याणकारी वैभव प्राप्त करून द्यावे विनंती. हे देवतांनो ! आमच्या या यज्ञाला श्रेष्ठ गती द्यावी कारण घृताच्या (तुपाच्या) मधुर धारा पवित्रपणे प्रवाहित होत आहेत ॥१० ॥

धामन्ते विश्वं भुवनमधि श्रितमन्तः समुद्रे हृद्यन्तरायुषि ।
अपामनीके समिथे य आभृतस्तमश्याम मधुमन्तं त ऊर्मिम्॥११ ॥

हे परमेश्वरा ! समान स्वरुपाचे संपूर्ण विश्व आपले आश्रित आहे. आपण आकाशात हृदयात पाण्यात आणि युद्धात अग्निच्या रूपात वास करता. आम्ही भक्तगण आपल्या माधुर्यपूर्ण ज्ञानलहरींना सदैव प्राप्त करू. ॥११॥

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.
प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे चौदावे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६३ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६३ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५),

अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), **आसावरी काकडे** (१४), **श्याम कुलकर्णी - मूळ वाल्मिकी रामायण(३२)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१४ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१३)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅ, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी

रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’ई’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)

आधीचे मंडल
वाचण्यासाठी
इथे क्लिक करा



ऋग्वेद

मराठी
अनुवाद

श्रीपाद काळे

प्रथम मंडलम्